***तुम्हाला माहिती असू द्या:*** *कुतूबमिनार हा भारतातील अत्यंत उंच मनोरा असून ऐबकने बांधकाम सुरू केलेला हा मनोरा इल्तमशने बांधून पूर्ण केला याची उंची 225 फूट असून या मनोऱ्यावर सुंदर बारीक कलाकुसर केलेली आहे.*

### गुलाम वंश:

कुतुबुद्दिन ऐबकने भारतात मुस्लीम सत्तेचा पाया दृढ केला. ऐबक आणि त्यांचे वारसदार गुलाम असल्यामुळे त्यांच्या घराण्याला गुलाम म्हटले जाते.

### कुतुबुद्दिन ऐबक:

ऐबकने मुस्लीम सत्तेचा पाया दृढ केला. तो अफगाण मधील तुर्की वंशाचा होता. लहानपणीच त्याच्या आईवडीलांनी त्याला निशापूरच्या काझीला विकले. काझीचा गुलाम असल्यामुळे ऐबकने घोडेस्वारी, धनुर्विद्या, युद्ध कौशल्याबरोबरच पार्शियन आणि अरेबिक भाषा आत्मसात केली. या पुढे गझनीचा राज्यकर्ता महम्मद घोरीने ऐबकला खरेदी केले गझनीमध्ये असताना त्याच्या विद्वता आणि शौर्यामुळे तो महम्मद घोरीच्या खूप जवळ आला. घोरीच्या दुसऱ्य लढाईनंतर घोरीच्या भारतावरील स्वाऱ्यांचा प्रतिनिधी बनला. घोरीच्या हयातीत तो उत्तर भारताचा अधिपती बनला. अधिकार मिळताच त्याने आपले स्थान प्रबळ करण्यास सुरुवात केली. इल्तमशा, नासुरुद्दिन कुब्जा (यल्तुज) आणि जयुद्दीन यल्तुज यांच्याशी त्याने वैवाहीक नातेसंबंध स्थापन केले. इल्तमशा हा ऐबकचा गुलाम होता. ऐबकने भारतावर चार वर्षे राज्य केले.

त्याने दिल्लीच्या कुतूबमीनार जवळ कुवत-अल-इस्लाम ही मशीद बांधली. पाक-इ. मुदबिर यासारखा विद्वानांना त्याने आश्रय दिला, ताज-उल-मासीर या साहित्यकृतीत ऐबकबद्दल माहिती आढळून येते.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

**इल्तमश :**

तुर्कस्तानच्या इलबारी तुर्की समुहातून इल्तमश ऐबकचा गुलाम होता. तो ग्वाल्हेरचा राज्यकर्ता होता. अधिकार प्राप्त होताच त्याला दिल्लीचा अमिर गझनीचा एल्तुज नासिरुद्दीन कुब्जा याच्या विरोधाला तोंड द्यावे लागले, एल्तुज आणि नासिरुद्दीनचे बंड त्याने यशस्वीरित्या मोडून आपले सिंहान भक्कम केले. त्यानंतर रणथंबोर, मांडोरा, भिलसा, अजमेर बनारस, कनोज जिंकले मंगोलियनांनी चेंगीज खानाच्या नेतृत्वाखाली भारतावर आक्रमन केले. पण इल्तमशने तो यशस्वीपणे लढा परतवुन लावला. या त्याच्या कार्याबद्दल बगदादच्या खलिफाने त्याला सुल्तान - ए- आझम किताबासह अधिकार प्रदान केले.

इल्तमश चाणाक्ष राज्यकर्ता होता. त्याने आपले राज्य अनेक इख्त (प्रांत) मध्ये विभागले आणि त्यावर देखरेख करण्यासाठी इख्तेदारांची नेमणूक केली स्वत:ला मदत करण्यासाठी त्यांनी चाळीस गुलांमाची एक समिती नेमली होती. प्रधानमंत्री आणि न्यायाधिश सुलतानाला सल्ला देत असत. त्याने कुतुबमिनारचे बांधकाम पूर्ण केले. त्याचबरोबर अजमेर येथे भव्य मशिद बांधली.

**रझिया सुलतान:**

इल्तमशाचा मुलगा रूकुद्दिन फिरोज हा दुर्बल आणि अकार्यक्षम असल्यामुळे दिल्लीच्या सिंहासनावर त्याची मुलगी रझिया सुलतानपदी बसली. ती हुशार आणि न्यायप्रिय होती कायद्याची रक्षणकर्ती होती. स्वत:ला पुरुषाइतके सामर्थ्य सिद्ध करण्यास तिला अनेक लढाया लढाव्या लागल्या. ती स्वतः घोड्यावर स्वार होऊन सैन्याचे नेतृत्व करीत असे. स्वतः तीला सुलतान म्हटले जात असे. तीने सिंध पासुन बंगालपर्यंतच्या विशाल प्रदेशावर आपला दबदबा निमार्ण केला.

**गियास-उद्दिन- बल्बन:**

बल्बन हा तुर्कस्तानामधील तल्बारी कुळातील होता. तो लहान असतानाच मंगोलियांनी त्याला पकडून बसरा येथील जमालुद्दीन ख्वाजा यास गुलाम म्हणून विकले आणि नंतर त्यांने दिल्लीच्या इल्तमशाला विकले. त्याचा प्रामाणिकपणा आणि धैर्यामुळे इल्तमशच्या 40 गुलामात त्याला स्थान मिळाले रझिया सुलतानच्या दरबारात तो आमिर-ए- शिकारी या स्थानावर होता नंतर नासिरुद्दिनच्या काळात तो प्रधानमंत्री झाला.

त्याने सर्व तुर्की सरदारांना स्वतःच्या नियंत्रणाखाली आणून राज्यात शांतता निमार्ण केली. त्याने मंगोलियनांच्या आक्रमणाला रोखले त्याने न्यायपद्धतीमध्ये बदल करून पार्शियन कायदे कानून अंमलात आणले. त्याने स्वतः ला देवाचा अंश म्हणून घोषित केले. बल्बन पारंपारिक पर्शियन वेशभूषा करीत असे. विश्वासू आणि अनुभवी सरदारांच्या नेतृत्वाखाली त्याने सैन्याची पुनर्रचना केली. त्याने जहागिरदारी पद्धत बंद केली.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

मंगोलियनांची आक्रमणे रोखण्यास वायव्येकडील सीमाभागात किल्ले बांधले. त्यांच्या मृत्युनंतर कैकबाद सुलतान झाला पण त्याच्याच वजीराने कैकबादाचा खून केल्यामुळे भारताच्या इतिहासात गुलाम घराण्याचा शेवट झाला.

**खिलजी घराणे (1290-1320):**

जलालुद्दिन खिलजी हा या घराण्याचा संस्थापक होय. त्याने राज्यविस्ताराबरोबच अनेक राजकिय सुधारणा घडवून आणल्या मुळात जलालुद्दिन हा धार्मिक आणि शांतप्रिय वृत्तीचा होता. त्याच्यामध्ये क्षमाशिलता हा गुण होता. त्याला सरदारांच्या कपटी कारस्थानी वृतीचा सुगावा लागला नाही. सरदारानी स्वतःची ताकतवाढविली पुढे त्याचा पुतण्या अल्लाउद्दीन खिलजी याने जलालुरुद्दीनला ठार मारून दिल्लीचे सुलतान पद बळकावले.

**अल्लाउद्दिन खिलजी :**

याचे बालपण जलालुद्दिनच्या आश्रयाखाली गेले. शौर्याच्या बळावर तो राज्यपाल आणि पुढे सेनापती झाला. अलाउद्दिन याने उत्तर आणि दक्षिणेकडील अनेक राजांचा पराभव करून राज्याच्या विस्तारा बरोबर अतोनात संपत्ती लुटली. गुजरातचा रजपूत राजा दुसऱ्या कर्णदेवाला पराभुत केले, माळवा, जालोर, बूंदी, मंडोर आणि टोंक जिंकले आपला पोषणकर्ता जलालुउद्दीनचा खून करून तो दिल्लीचा सुलतान झाला.

त्याने संपूर्ण दक्षिणेवर विजय मिळविला त्याने दक्षिणेकडील देवगिरी वारंगल व्दारसमुद्र आणि मदुराई या हिंदु राज्याचा ऱ्हास केला. त्याने ही राज्ये फक्त जिंकलीच नाहीत तर येथील अमर्याद संपती लुटून दिल्लीला नेली.

अल्लाउद्दिनचे शेवटचे दिवस खूप दुःखात गेले. त्याच्या मृत्यूनंतर त्याचा तिसरा मुलगा कुतुबुद्दिन मुबारक गादीवर आला 4 वर्षाच्या कारभारानंतर खुस्त्रु नावाच्या सैनिकाने त्याला ठार मारले खुस्त्रुला गाझी मलिकने ठार मारुन तुघलक घराण्याची स्थापना केली.

> ***तुम्हाला माहीत असूद्या***
> ***दो-आबः*** *दोन नद्यांच्या मधल्या प्रदेशाला दो-आब असे म्हटले जाते. उदाः गंगा-यमुना*

**राजकिय सुधारणाः**

अल्लाउद्दिन खिलजीने अनेक राजकिय सुधारणा केल्या धार्मिक देणग्या, ईनाम किंवा जमिनी बहाल करण्याची पद्धत त्याने रद्द केली. त्याने गुप्तहेरांची संघटना निमार्ण केली. दारू आणि नशिल्या सेवनावर बंदी घातली आंतरजातिय विवाह, सरदारांच्या सभा, सर्वसामान्यांचे सभासमारंभ यावर बंदी घातली प्रजेकडून अतिरिक्त कर गोळा करण्याचा हुकूम दिला.

NOT TO BE REPUBLISHED © KTBS

**लष्करी सुधारणाः**

मंगोलियन आक्रमणांला रोखण्यासाठी त्याने सक्षम खडे सैन्य उभे केले. योग्य सैनिकांची भरती करण्यासाठी, सैनिकांना हत्यारांची आणि घोड्यांची निवड आणि वापर करण्याचे शिक्षण देण्यासाठी वेगवेगळ्या मंत्र्यांची नेमणूक केली. त्यांना रोख पगार दिला जात असे. या सगळ्या गोष्टी आणि सैनिकांची माहिती ठेवण्यासाठी नोंदवही ठेवली जात होती. त्याला 'हुलीय' पध्दत असे म्हणत. त्याने घोड्यावर शिक्का मारण्याची पध्दत सुरू केली.

**आर्थिक सुधारणाः**

त्याने बाजारपेठेतील वस्तूंच्या दरावर नियंत्रण आणले. धान्याचे दर निश्चित केले आणि त्याच दराने विक्री करण्याची व्यापाऱ्याना सक्ती केली. यामुळे सरकारचा दर्जा उंचावला. त्याने बाजरपेठेवर नियंत्रण आणि देखरेख ठेवण्यासाठी शहाणा-इ-मंडी या अधिकाऱ्याची नियुक्ती केली.

**तुघलक घराणे (1320 - 1399):**

तुघलक घराण्याची स्थापना गियासुद्दिन तुघलक याने केली. महम्मद बीन तुघलक हा घराण्यातील महत्वाचा राजा होय. गियासुद्दिन याने आपल्या उदार अंतः करणाच्या स्वभावाने दिल्ली आणि आजुबाजूच्या प्रदेशात कायदा आणि सुव्यवस्था निर्माण केली. मंगोलियन आक्रमण रोखण्यासाठी सरहद बळकट केली. त्याने पाणी पुरवठ्यासाठी तलावांची निर्मिती केली करांची रक्कम कमी केली. त्याने पोष्ट सेवा अंमलात आणली. त्याने दिल्लीजवळील तुघलकाबादचा किल्ला बांधला. त्याने वारंगल, मदुरायी, गुजरात, बंगाल जिंकून तेथे कडक अंमल प्रस्थापित केले.

**महम्मद बीन- तुघलकः**

याचे वर्णन आदर्शवादी असे केले जाते. तो पर्शियन आणि अरेबीक भाषेचा विव्दान होता. गणित, भौतिकशास्त्र आणि जोतिषशास्त्र यात पारंगत होता. त्याच्या डोक्यात उत्तमोतम योजना व कल्पना असत. त्याने अशा सुधारणांचा आंगीकार केला पण चुकिच्या मार्गाने अंमलात आणल्यामुळे चांगल्या योजना अयशस्वी झाल्या.

**राजकिय सुधारणाः** या काळात त्याने साम्राज्याला मिळणाऱ्या सगळ्या जमिन महसुलाची नोंद ठेवण्यासाठी नोंदवही ठेवण्याचे आदेश दिले. पडिक जमिनी मशागतीखाली आणून कृषी व्यवसायाचा विकास केला शेतकऱ्यांना आर्थिक मदत दिली. दो- आब प्रदेशातील जमिनीवर कर वाढविला.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

**राजधानीचे स्थलांतर:** महम्मद - बिन तुघलकाने दिल्लीची राजधानी हलवून साम्राज्याच्या मध्यभागी असलेल्या देवगिरी येथे हलविण्याचे आदेश दिले. त्याचा हेतु होता कि राजधानी मध्यभागी आणि मोंघल शत्रूच्या आक्रमणापासून सुरक्षित असावी पण राजधानीचे स्थलांतर करताना योग पावले उचलली गेली नाहीत. ही योजना असफल होण्यास महम्मदाचा लहरीपणा कारणीभूत ठरला.

**नाण्यांची टांकसाळ:** सुलतानाने नाणेपद्धत बदल घडवून आणले. त्याने दिनार हे सोन्याचे आणि अघेली हे चांदीचे नाणे अंमलात आणले काही वर्षाने त्याने तांबे आणि पितळेची नाणी अंमलात आणली पण मोठे नुकसान, दुष्काळ, राजधाणीचे स्थलांतर आणि चुकीच्या आर्थिक योजनांमुळे राज्याचा खजिना रिकामा झाला.

**दख्खननिती (धोरण):** तुघलकाने दक्षिणेकडे जिंकलेल्या भागावर आपल्या अधिकाराची पुनर्स्थापना केली. त्याने होयसळांची राजधानी व्दारसमुद्र, वारंगलच्या काकतीयांच्याकडून हस्तगत केली आणि लुटली. मदुराईच्या राजाचा पराभव करून ती बळकावली व जलालुद्दीन हसनशहा याला त्याचा राज्यपाल म्हणून नियुक्त केले. महम्मद हा दिल्लीच्या सुलतानापैकी पहिला सुलतान होता त्याचा साम्राज्यामध्ये दक्षिण आणि उत्तर भारताचा बराचसा भाग समाविष्ट होता. दूरदृष्टीचा अभाव असलेल्या महम्मदाने प्रचंड सैनिकांची भरती करून त्यांना रोख पगार दिला पण बराचकाल एकही सैनिकी मोहिम हाती घेतली नाही. त्यामुळे राज्याच्या तिजोरीवर मोठा भार पडला.

खोराचीनच्या स्वारीदम्यान बरेचसे सैन्य तेथील खराब वातावरणामुळे मारले गेले. त्याला अनेक दक्षिणेकडील बंडांना तोंड द्यावे लागले. ज्यामुळे विजयनगर आणि बहामनी साम्राज्य उदयाला आले.

महम्मद बिन तुघलका नंतर फिरोजशहा तुघलक दिल्लीचा सुलतान बनला. त्याने अनेक लोकोपयोगी सुधारणा केल्या प्रजेला मदत करण्यासाठी कर्ज सुविधा दिल्या त्याने वेगवेगळे कर रद्द केले. याच्या कारकिर्दीत अनेक नगरे, मशिदी, मदरसा, धरणे आणि कालवे यांची निर्मिती झाली. जोनपुर, फतेबाद, हिस्सार, फिरोजपूर आणि फिरोजाबाद यासारखी महत्वाची शहरे याच्या कारकिर्दीन वसवली गेली, जौनपूर हे त्याकाळातील महत्त्वाचे शैक्षणिक केंद्र होते. प्रवाशांच्या सोयीसाठी अनेक धर्मशाळांची निर्मिती केली.

**सय्यद घराणे (1414-1451):**

मुलतानचा राज्यपाल खिज्रखान सय्यद याने दिल्ली जिंकुन दो-आब, बियास आणि ग्वाल्हेर सय्यद या घराण्याचे वर्चस्व प्रस्थापित केले. त्याने अनेक बंडे मोडून काढली व

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

कायदा आणि सुव्यवस्था प्रस्थापित केली. महम्मदशहा, अल्लाउद्दीन आणि शाहआलम सय्यद घराण्यातील महत्वाचे राज्यकर्ते होते. शहाआलम याला बहलूल लोदी याने पराभूत करून सय्यद घराण्याचा शेवट केला.

**लोदी घराणे (1451-1526):**

दिल्लीवर राज्य केलेल्या घराण्यापैकी लोदी घराणे एक होय बहलोल लोदी सिकंदर लोदी आणि इब्राहिम लोदी हे या घराण्यातील प्रमुख राज्यकर्ते होय. बिहार बंगाल धौलपूर जिंकून सिकंदर लोदीने शातंता प्रस्थापित केली.

त्याचा राज्यपाल आलमखान आणि दौलतखान इब्राहिम लोदीच्या विरोधात लढण्यासाठी अफगाण्यांना आमंत्रित केले. काबुलचा राजा बाबर याने भारतावर स्वारी करून इ.स 1526 मध्ये पानिपतच्या पहिल्या लढाईत इब्राहिम लोदीला पराभूत करून भारतामध्ये मुघल सत्तेचा पाया घातला. पानिपतच्या लढाईत दिल्लीच्या सुलतानशाहीचा शेवट झाला.

**दिल्लीच्या सुलतानाचे योगदानः**

**राज्यकारभारः** दिल्लीचे सुलतान क्रुर हुकूमशहा होते. सुलतान हा सर्वोच्च सैन्य प्रमुख आणि मुख्य न्यायाधिश असे. कुराणातील कायद्याप्रमाणे राज्यकारभार चालत असे. सरदार, उमराव आणि उलेमा याचा राज्यकारभारात मोठा प्रभाव होता, केंद्रीय राज्यकारभारात संरक्षण विभाग आणि परराष्ट्र खाते अस्तित्वात होते. शिकदार, अमिन आणि चौकिदार राज्यव्यवस्थेतील मुख्य घटक होते. कर गोळा करणे कायदा आणि सुव्यवस्था राखणे, शिक्षण पुरविणे आणि स्वच्छता राखणे इ. त्यांची प्रमुख कर्तव्ये होती. वेगवेगळे कर हे राजाच्या उत्पन्नाचे प्रमुख साधन होते. खरज, (जमिनीवरील कर), जकात जिझीया या व्यतिरिक्त खमस (युद्धामध्ये लुटलेल्या संपतीवरील कर), वारसदार नसलेल्या संपतीवर कर, आयात कर, घरफाळा इ. कर घेतले जात.

**सामाजिक व्यवस्थाः** सुलतानांच्या राजवटीत हिंदू व मुस्लीम परंपरागत धार्मिक आचरण करीत होते. जुन्या समाज व्यवस्थेत हिंदु संतांनी व मुस्लीम समाजातील सूफी संतानी सुधारणा घडवून आणल्या, सुलतानाने मुस्लिम धर्मांतरीत सुशिक्षितांना व हिंदुंना उच्च पदावर नेमले जात असे.

गुलामगिरी पद्धत अस्तित्वात होती. युद्धातील कैद्यांना गुलामाची वागणूक दिली जात होती. राजवाड्यात अनेक महिला गुलाम असत. समाजात स्त्रियांना कमी दर्जा दिला जाई.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

पडदा व बालविवाह पद्धत अस्तित्वात होती. उच्चवर्गीय महिलां ललितकला मध्ये भाग घेत असत. ग्रामीण महिला मात्र कृषी व्यवसाय व घरगुतीकामात व्यस्त असत.

**आर्थिक व्यवस्था:** लोकांवर प्रचंड कर आकारला गेला. वाहतूक सुविधा चागंली नव्हती, कर एक समान नव्हते शेती मुख्य होती व उत्पन्नाचा स्त्रोत्र होता, दिल्लीत सुलतानांचे कारखाने होते. त्यामध्ये सोन्याचांदीचे अलंकार, रेशमी वस्त्रे, कापड आणि रंगकाम हे प्रमुख उद्योग होते.

**साहित्य:** अनेक देशीविदेशी लेखक, साहित्य आणि इतिहास तज्ञांना सुलतानांच्या काळात आश्रय दिला गेला. त्यांनी अरेबिक आणि पर्शियन भाषेत साहित्यिक रचना केल्या. महम्मद गझनीच्या दरबारात अलबरौनी हा प्रसिद्ध विव्दान होता. तो तत्वज्ञ, गणितज्ञ आणि इतिहासकार होता. महम्मदाच्या भारतावरिल स्वाऱ्यांदरम्यान तो त्याच्याबरोबर असताना अलबरौनीने तारीख-अल-हिंद लिहिले। ज्यामध्ये भारताच्या आर्थिक, सामाजिक आणि धार्मिक परिस्थीतीची समग्र माहिती मिळते. अबु-उत्बीचे तारिक-इ-यामिनी, मिनाज सिराजचे तबखत-इ-नासिरी, हसन निजामीचे ताजुल मसिक, मिन्हाज - उस - सिराजये तबलका -ए-नासिरी. अमीर खुस्त्रो याने सहा प्रमुख ग्रंथ रचून हिंदू-मुस्लिम संस्कृतीची माहिती दिली. त्याला भारताचा पोपट असे म्हटले जाते. जीयाउद्दीन बरौनी चे 'तारिख-ई-फीरोजशाही तसेच फीरोज तुघलकचे फुतूहत-ई-फीरोजशाही या ग्रंथांची रचना केली.



अलाई दरवाजा



कुवत-अल-इस्लाम मशीद

**कला आणि वास्तु शिल्पकला:** दिल्लीच्या सुलतानांनी भारतामध्ये 'इंडो- सिरॅमीक' (इंडो-इस्लाम) शैलीचा प्रारंभ केला. उंचकमानी, घुमट. मीनार ही या शैलीची मुख्य वैशिष्ट्ये होती. दिल्लीच्या सुलतांनी किल्ले. महाल सार्वजनिक इमारती, मदरसा, धर्मशाला यांची निर्मिती केली. इंडो- इस्लाम बाधंकाम शैलीची उत्तम उदाहरणे म्हणजे दिलीची कुवत अल- इस्लाम ही मशिद, कुतुबमिनार, अलाई दरवाजा, जमैन खाना मशिद इत्यादी.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

## स्वाध्याय

**I. रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.**

1. प्रतिहाराच्या गुर्जर घराण्याची स्थापना ______ यांनी केली.
2. पृथ्वीराज चौहानने ______ याला तरायनच्या पहिल्या लढाईत पराभुत केले.
3. ______ हा महम्मद घोरीचा सेनापती होता.
4. ______ ही दिल्लीच्या सुलतानदी बसलेली पहिली स्त्री राज्यकर्ती होती.
5. खिलजी घराण्यातील ______ हा प्रसिद्ध राज्यकर्ताहोय.
6. तुघलकांच्या काळात राजधानी दिल्लीचे स्थालांतर ______ येथे केले.

**II. खालिल प्रश्नांची उत्तरे लिहा.**

7. राजपूतांनी साहित्याच्या क्षेत्रात घातलेली भर याबद्दल थोडक्यात लिहा.
8. कार्कोटा घराण्याचा प्रमुख राजा कोण ? त्याने आपल्या साम्राज्याचा विस्तार कसा केला.
9. इल्तमशच्या राज्यव्यवस्थेचे वर्णन करा?
10. अलाउद्दिन खिलजीच्या राजकिय सुधारणा कोणत्या.?
11. महमंद बीन तुघकाने केलेल्या राजकिय सुधारणा कोणत्या ?
12. दिल्लीच्या सुलतानाने कला आणि शिल्पकला क्षेत्रात कोणती भर घातली ?
13. पानिपतच्या पहिल्या युद्धाचे परिणाम काय झाले?

**III. उपक्रम**

1. भारताच्या नकाशात रजपून राज्ये दाखवा.

**IV. योजना प्रकल्प**

1. तुमच्या शिक्षकांच्या सल्लयानुसार दिलीच्या सुलतानांची चित्रे आणि स्मारकांची माहिति गोळा करून अल्बम तयार करा.

***

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

प्रकरण - 3

# भारतीय धर्म सुधारक

X1C1B3

**या प्रकरणातून आपण पुढील गोष्टी शिकू**

- *भारतीय धर्म सुधारक, त्यांचे तत्वज्ञान आणि शिकवण.*
- *द्वैत, अद्वैत, विशिष्टाद्वैत आणि इतर तत्वज्ञान*

भारताच्या सामाजिक आणि धार्मिक इतिहासात 8 व्या शतकापासून ते 13 व्या शतकाच्या पूर्वार्धापर्यंतचा काळ हा सर्वात महत्वाचा आहे. याच काळात आचार्य शंकराचार्यांनी तिन्ही वैदिक पंथाचे पालणपोषण केले. शंकराचार्य मध्वाचार्य आणि रामानुजाचार्य यानी कन्नडभूमीमध्ये धार्मिक व सामाजिक कार्य केले. वेदांच्या तीन मुख्य शाखा-अव्दैत, द्वैत आणि विशीष्टाद्वैत सिध्दांत देखील प्रसिध्द झाले. तसेच बसवेश्वरांनी जात आणि लिंग आधारित असमानतेला विरोध करुन कल्याणकारी सामाजिक क्रांती केली. त्यांनी उपदेश केलेली तत्वे केवळ अध्यात्मिक शिकवण नसून वैचारिकदृष्टया समान आणि धर्म सुधारणेसाठी उपयोगी आहे. हे ध्येय साध्य करण्यासाठी आचार्यानी आणि बसवेश्वरांनी भक्तीमार्गाद्वारे समाजात धर्माची पुर्नस्थापना केली. तसेच सर्व वर्गातील लोकांना जात, पंथ आणि लिंग पर्वा नकरता देवाला शरण जाण्यास शिकवले.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

**शंकराचार्य :**

शंकराचार्यांचा जन्म केरळ राज्यातील कलादी या गावी नंबुद्रि ब्राम्हण कुटुंबात शिवगुरु आणि आर्यंबा या दांपत्याच्या पोटी झाला. शंकराचार्य अतिशय बुद्धीमान होते. वयाच्या सातव्या वर्षी त्यांनी सर्व शास्त्रांवर प्रभुत्व मिळवले होते. त्यांनी वेद आणि पुराणे त्यांचे गुरु गोविंद भागवतपद यांच्याकडून शिकूण घेतली.



शंकराचार्य

शंकराचार्यानी उपनिषदे आणि ब्रम्हसूत्रांचा सखोल अभ्यास करून अद्वैत तत्वज्ञानाचा प्रचार केला. यानुसार ब्रम्ह हे परम सत्य आहे, बाकीचे जग असत्य आहे. आत्मा ब्रम्हाशी एक आहे आणि जीव ब्रम्हापासून वेगळा नाही. जग माया आहे, भ्रम आहे. ब्रम्ह हे परम सत्य आहे. एकमेव सत्य आहे. याचीही जाणीव नाही. म्हणून आपण ज्ञानाच्या मार्गावर जावून जगाचे स्वरूप जाणले पाहिजे. शेवटी आपण आपला आत्मा, परमसत्य ब्रम्हामध्ये विलीन केला पाहिजे. तरच आपण मोक्ष (मुक्ति) प्राप्त करू शकतो. अशा प्रकारे शंकराचार्यांनी ज्ञानमार्ग शिकविला.

मानवी आत्म्याला वेगळे अस्तित्व नाही आणि हे सत्य त्यांनी 'अहं-ब्रम्हास्मि' या वाक्यात व्यक्त केले. ब्रम्ह हे सत्य असल्याचे त्यांनी जाहीर केले. त्यात कोणतेही गुण नाहीत, वैशिष्ठये नाहीत आणि आकारही नाही.

शंकरभाष्य, सौदर्यलहरी, शिवानंदलहरी, विवेक चुडामणी प्रबुद्ध सुधारक आणि दक्षिणमूर्ती स्त्रोत्र इ. ग्रंथांची रचना त्यानी केली. शंकराचार्यानी रचलेले 'भजगोविद्म' स्त्रोत्र अत्यंत जनप्रिय आहे.

शंकराचार्यांनी काश्मीर ते कन्याकुमारी असा भारतभर प्रवास करून आपल्या अद्वैत तत्वज्ञानाचा प्रचार केला. अद्वैत तत्वज्ञानाचा संदेश पसरवण्यासाठी त्यांनी चारही दिशांना पिठे (संस्था) स्थापन केली.

***चार पिठे तुम्हाला माहित असू दे***

| | | | |
|---|---|---|---|
| *1. बद्रीनाथ* | *- ज्योर्तिपिठ* | *2. द्वारका* | *- कालिकापिठ* |
| *3. पुरी* | *- गोवर्धनपिठ* | *4. श्रृंगेरी* | *- शारदापिठ* |

शंकराचार्यांनी भारतीय विचारसरणीला नवी दिशा आणि प्रेरणा दिली.

**रामानुजाचार्य :**


**रामानुजाचार्य**

रामानुजाचार्यांचा जन्म चेन्नई (मद्रास) जवळील श्रीपेरंबुदूर या खेड्यात झाला. केशव सोमयाजी व कांतीमती हे त्यांचे मातापिता होते. प्रसिद्ध शैक्षणिक केंद्र कांची येथे त्यांनी यादवप्रकाश यांच्या मार्गदर्शनाखाली वेद-उपनिषदांचा सखोल अभ्यास केला. श्रीरंगम येथील गुरूपिठावर त्यांची मठाधिपती म्हणून नियुक्ती करण्यात आली. शैव धर्म स्विकारलेल्या चोळ

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

राजाने रामानुजाचार्यांचा अपमान केल्यामुळे, ते पुढे कर्नाटकात आले कर्नाटकचा राजा विष्णुवर्धनाने त्यांचा यथोचित सत्कार केला. पुढे त्यांनी मेलुकोटेच्या चेलुवनारायण देवालयाची स्थापना केली. रामानुजाचार्यांना जनसामान्यांना मुक्तीचा मार्ग दाखविण्याची तळमळ लागली होती. श्रीरंगमला असताना शास्त्राभ्यास करून त्यांनी अनेक ग्रंथाचे लेखन केले. वेदांत संग्रह, वेदांतसार, वेदांत दिपिका, श्रीभाष्य असे लेखन केले. आणि 'गीताभाष्य' या त्यांच्या प्रसिद्ध ग्रंथात त्यांनी भक्तीचे महत्व सांगितले.

रामानुजाचार्यांच्या तत्वज्ञानाला 'विशिष्टाद्वैत' आणि त्यांनी प्रसारित केलेल्या धर्माला 'श्रीवैष्णव' असे म्हणतात. म्हणूनच त्यांच्या अनुयायाना 'श्रीवैष्णवपंथीय' असे म्हणतात. माणूस आणि निसर्ग हे ब्रम्हावर अवलंबून आहेत. आत्मा (व्यक्ती) किंवा परमात्मा (देव) हे एकच किंवा एकसारखे नाहीत असा सिद्धांत रामानुजाचार्यांनी मांडला.

त्यांनी सुचविलेले मार्ग म्हणजे भक्ती (तीव्र निष्ठा) आणि प्रपाती (देवाला शरण जाणे) हे होय. जातीभेद त्यांना मान्य नव्हता. त्यांनी सर्व जाती धर्माच्या लोकांना सामाजिक दर्जा मिळवून दिला. देवाला निरपेक्षपणे शरण गेल्यास भक्तीमार्गाने मुक्ती प्राप्त होते. असे त्यांनी सांगितले. रामानुजाचार्यांनी शास्त्रांचा अभ्यास करून अनेक कृतीची रचना केली आहे. वेदांत संग्रह, वेदांतसार, वेदांत दिपीका, श्रीभाष्य, गीताभाष्य इ. ग्रंथामधून त्यांनी भक्तीचा प्रसार केला.

उत्तर भारतातील संत रामदास आणि रामानंद यांच्या तत्वज्ञानाने प्रभावित होऊन उत्तर भारतात त्यांनी भक्तीमार्गाच्या चळवळीचा प्रसार केला. विजयनगरचे तुळुव आणि अरविंदु राज्यकर्ते त्यांच्या शिकवणीने प्रभावित होऊन श्रीवैष्णव धर्माचे अनुयायी बनले.

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

### तुम्हाला माहित असू दे

### दक्षिण भारतातील काही प्रसिद्ध वैष्णव मठ

1. यतिराज मठ - मेलुकोटे आणि श्रीपेरंबुदूर
2. परकाल (ब्रम्हतंत्र) मठ - म्हैसूर
3. अहोबल मठ - अहोबल (कर्नूल जिल्हा-आंध्रप्रदेश)
4. अंदवन मठ - श्रीरंगम
5. वामैमलै मठ - सुचिंद्रम

**मध्वाचार्य :**



मध्वाचार्य

कर्नाटकातील उडपीजवळील पाजक या गावी मध्वाचार्यांचा जन्म झाला. मद्यगेहा नारायण भट्ट आणि वेदवती हे त्यांचे मातापिता. मध्वाचार्य विष्णुभक्त होते. त्यांनी गुरु अच्युतप्रकाश यांच्या मार्गदर्शनाखाली वेद आणि उपनिषदांचा अभ्यास केला. त्यांनी इतके ज्ञान प्राप्त केले की धर्मशास्त्रावरील वादविवादात देखील आपल्या गुरूवर मात केली. त्यांनी द्वैत तत्वज्ञानाचा प्रसार केला. त्यांच्या मतानुसार ब्रम्ह (परमेश्वर) व माणूस वेगळा आहे.

आपल्या तत्वज्ञानाचा प्रसार करण्यासाठी मध्वाचार्य विविध ठिकाणी फिरून धर्मशास्त्रावरील चर्चेत सहभाग घेत. गोपीचंदना नावाच्या चिखलाच्या टेकडीमध्ये लपलेली भगवान श्रीकृष्णाची मूर्ती त्यानी आणली आणि उडपी मध्ये स्थापित केली. तसेच कृष्णभक्तीचा प्रसार करण्यासाठी त्यांनी एकूण 8 मठांची स्थापना केली.

मध्वाचार्यांच्या तत्वानुसार जग हे मिथ्या नाही तर ते ब्रम्हचैतन्याने भरलेले आहे. देवाचे स्वरूप हे स्वतंत्र्य अस्तित्व आहे. मानवजात ही देवावर अवलंबून आहे. त्यांना स्वतंत्र्य अस्तित्व नाही. देव आणि मानव यामध्ये देव हा मालक आणि माणूस हा देवाचा दास आहे असे त्यांचे नाते आहे. भगवान विष्णु अथवा नारायण हा सर्वोच्च आत्मा ( सर्वश्रेष्ठ) आहे असे त्यांचे मत होते. विष्णुची तीव्र भक्ती करण्याने मुक्ती मिळते अशी शिकवण त्यांनी दिली.

**साहित्य रचना :**

गीताभाष्य, गीतातात्पर्य निर्णय, महाभारत तात्पर्य निर्णय, विष्णुतत्व निर्णय, भागवत तात्पर्य निर्णय, सूत्रभाष्य, मायावाद खंडण या त्यांच्या साहित्यिक रचना आहेत.

पद्मनाथ तीर्थ, नरहरी तीर्थ, विजयेंद्र तीर्थ आणि वादीराजतीर्थ यांनी मध्वाचार्यांच्या द्वैत तत्वज्ञानाचा प्रसार केला.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**विश्वगुरू बसवण्णाः सांस्कृतिक नेता :**



विश्वगुरू बसवण्णा कर्नाटकाचे सांस्कृतीक नेता

बसवण्णा हे कर्नाटकातील 12 व्या शतकातील सर्वात प्रमुख धार्मिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि सांस्कृतिक सुधारक होते. त्यांचे वडील मादरस आणि आई मादलंबिका. त्यांचा जन्म सध्याच्या विजयपूर जिल्ह्यातील बसवण बागेवाडी येथे झाला. ब्राह्मणांच्या प्रथेप्रमाणे आई, बहीण आणि मित्रांसाठी उपनयन समारंभ नसल्यामुळे बसवण्णानी लहानपणी उपनयन समारंभात पवित्र धागा नाकारला व बसवण बागेवाडी सोडले आणि कुडलसंगमाकडे निघाले. कुडलसंगम येथे शिक्षण घेतले आणि मंगळवेढचा राजा बिज्जल यांच्या हाताखाली अर्थमंत्री झाले. प्रामाणिकपणा, समर्पण, कर्तव्यनिष्ठा, दूरदृष्टी आणि जनतेची काळजी यामुळे पुढे ते कल्याण राज्याचे प्रधान झाले. त्यावेळच्या समाजातील प्रथा, वाईट रुढी-परंपरा, अंधश्रद्धा यांचा त्यांनी निषेध केला. समाजात आर्थिक, सामाजिक आणि धार्मिक सुधारणा घडवून आणण्यात त्यांचा मोलाचा वाटा होता. त्यांनी सध्याच्या बिदर जिल्ह्यातील बसवकल्याण येथे जगातील पहिली संसद म्हणून ओळखल्या जाणाऱ्या 'अनुभव मंडप' ची स्थापना केली. बसवण्णांनी समाज सुधारणेसह आत्म्याच्या सुधारणेसाठी कार्य केले. बसवण्णांनी ज्ञानालाच गुरू मानून ईष्ट लिंगाच्या परिकल्पनेसह 'शरीर हेच मंदिर' मानून मंदिराना नाकारले व एकेश्वराचा पुरस्कार केला.

'दया हेच धर्माचे मूळ आहे' या अहिंसेच्या तत्त्वावर त्यांनी भर दिला. कर्म, दासोह आणि ईष्टलिंग या नावीन्यपूर्ण संकल्पना बसवण्णा यांनी राबविल्या आहेत. त्यांच्याद्वारे बसवण्णा यांनी जाती, लिंग विरहित कल्याणकारी समाजाची स्थापना केली.

बसवेश्वरानी जाती व्यवस्थेला विरोध केला कुडल संगम येथे ध्यान साधना करून वचन साहित्य रचले. 'कायकवे कैलास'(काम हीच पूजा) असे म्हणून बसवण्णानी कर्मावर भर देत कार्य संस्कृतीच्या तत्त्वांचे समर्थन केले. कामात श्रेष्ठत्व किंवा कनिष्ठता

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

नसल्याचेही त्यांनी जाहीर केले. शिवभक्ती पेक्षा कोणीही श्रेष्ठ नाही अशी त्यांची श्रद्धा होती. म्हणून ते सर्व मानवांचे सदैव कल्याण करत होते. 'दासोह' या तत्त्वाद्वारे त्यांनी संपत्ती संग्रह प्रवृत्तीचा तिरस्कार केला. त्यांचे सामाजिक, धार्मिक विचार आणि ते आचरणात आणण्याची पद्धत अद्वितीय अशी होती. त्यांनी स्त्री स्वातंत्र्य आणि समानतेचा प्रचार केला.

विश्वातील सर्व लोक समान आहेत आणि कोणीही जन्माने अस्पृश्य नाही असे बसवण्णा यांनी घोषित केले. अध्यात्मिक वाढ आणि लोककल्याणाच्या पार्श्वभूमीवर त्यांनी वचने लिहिली आहेत, ही त्यांची वचने कन्नड साहित्यातील अद्वितीय योगदान आहे. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर, 'संविधान' म्हणून वचनाचे जगासाठीचे योगदान मानले जाऊ शकते. वचनांच्या माध्यमातून वचनकारांनी समाजातील दोष दाखवून लोकांमध्ये जागृती निर्माण केली. वचन चळवळ बसवण्णांच्या अनुयायानी त्यांची जात, वर्ण, वर्ग, लिंग विचारात न घेता एकत्र आणली. त्यापैकी प्रमुख वचनकार सत्यक्का, आयदक्की लक्कम्मा, सिद्धराम, चन्न बसवण्णा, मोळीगे मारय्या, अंबिगर चौडय्या, मडीवाळ माचय्या, मदारा चिन्नय्या, समगार हरळय्या, किन्नरी बोम्मय्या आणि इतर. त्याचे अमुल्य योगदान लक्षात घेऊन कर्नाटक सरकारणे 13 फेब्रुवरी 2024 रोजी त्यांना कर्नाटकाचे संस्कृतीक नेते म्हणुन घोषीत केले.

**तुम्हाला माहित आहे का ? (एक वचन)**

चोरी करू नका, खून करू नका, खोटे बोलू नका, लोभी होऊ नका, इतरांचा तिरस्कार करू नका, स्वतःला बदलू नका, इतरांची निंदा करू नका, हीच अंतरिक शुद्धता आहे, हीच बाह्य शुद्धता आहे, हीच आमची कुडल संगमदेवाला विनंती आहे.

**ನಿಮಗಿದು ತಿಳಿದಿರಲಿ: (ಒಂದು ವಚನ)**

ಕಳಬೇಡ, ಕೊಲಬೇಡ, ಹುಸಿಯ ನುಡಿಯಲು ಬೇಡ
ಮುನಿಯಬೇಡ, ಅನ್ಯರಿಗೆ ಅಸಹ್ಯಪಡಬೇಡ
ತನ್ನ ಬಣ್ಣಿಸಬೇಡ, ಇದಿರ ಹಳಿಯಲು ಬೇಡ,
ಇದೇ ಅಂತರಂಗ ಶುದ್ಧಿ, ಇದೇ ಬಹಿರಂಗ ಶುದ್ಧಿ
ಇದೇ ನಮ್ಮ ಕೂಡ ಸಂಗಮದೇವನೊಲಿಸುವ ಪರಿ.

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

## स्वाध्याय

**I. योग्य शब्दांसह रिक्त जागा भरा :**

1. शंकराचार्यांचा जन्म केरळ राज्यातील ______________ येथे झाला.
2. जग हे मिथ्या आणि ब्रम्ह हे सत्य असे ______________ यानी प्रतिपादन केले होते.
3. रामानुजाचार्यांच्या अनुयायांना ______________ असे म्हणतात.
4. द्वैत सिद्धांताचे प्रतिपादन ______________ यांनी केले.

**II. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :**

5. अद्वैत तत्वज्ञानाचा पुरस्कर्ता कोण आहे.
6. रामानुजाचार्यांनी कोणता सिद्धांत मांडला ? त्यांच्या धर्माला काय म्हणतात ?
7. रामानुजाचार्य यांनी रचलेल्या ग्रंथांची नावे लिहा.
8. मध्वाचार्यांनी कोणते सिद्धांत मांडले आहेत.
9. बसवेश्वरानी सांगीतलेल्या 'कायकवे कैलास' या तत्वाबद्दल माहिती लिहा.
10. बसवेश्वरानी केलेली काल्याणकारी कार्ये कोणती ?
11. शंकराचार्यांनी रचलेल्या ग्रंथांची नावे लिहा.
12. वचन चळवळीच्या प्रसारात बसवेश्वरांच्या सोबत अनुयायी कोणे होते.

**III. उपक्रम :**

1. वेगवेगळी वचने संग्रहीत करून त्यांचे सामुदायिक वाचन करून त्यांच्या अर्थावर चर्चा करा.
2. बसवेश्वरांच्या प्रमाणे इतर वचनकारांची चित्रे गोळा करा.
3. वचनगायण पठण स्पर्धा आयोजित करा.

**IV. प्रकल्प :**

1. तुमच्या शिक्षकांच्या मदतीने द्वैत आणि अद्वैत तत्वज्ञानावर निबंध लिहा.
2. स्थानिक वचन गायकाना शाळेत बोलावून विविध वचनांचे वाचन करा.

***

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

W6J7A3

## प्रकरण - 4

# विजयनगर साम्राज्य आणि बहामनी राज्य

***या प्रस्तूत प्रकरणात खालील गोष्टी जाणून घ्याल***

- *विजयनगर साम्राज्य आणि बहामनी राज्यांची स्थापना.*
- *विजयनगर साम्राज्य आणि बहामनी राज्याची राज्य घराणी.*
- *कृष्णदेवरायांचे कार्य आणि योगदान.*
- *विजयनगर साम्राज्याची सांस्कृतिक देणगी.*
- *बहामनी राज्याची सांस्कृतिक देणगी.*

विजयनगर साम्राज्याची स्थापना म्हणजे भारतीय इतिहासातील युगप्रवर्तक घटना होय. दक्षिण भारतातील राजघराण्यापैकी देवगिरीचे यादव, वारंगळचे काकतीय, मदुराईचे पांडय, व्दारसमुद्राचे (हळेबिडू) होयसळ आणि तंजावरचे चोळ हे अल्लाउद्दिनच्या क्रूर आक्रमणाला बळी पडले. सततचा गोंधळ, राजकिय अस्थिरता, भीती धार्मिक असुरक्षितता सगळीकडे पसरली होती. अशा परिस्थितीत विजयनगर साम्राज्याचा उदय झाला.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

हरिहर आणि बुक्क यांनी 1336 मध्ये तुंगभद्रा नदीच्या दक्षिण किनाऱ्यावर हंपी येथे विजयनगर साम्राज्याची स्थापना केली, हंपी ही विजयनगर साम्राज्याची राजधानी होती.

**विजयनगर साम्राज्यावर राज्य केलेली चार घराणी**

- संगम
- साळूव
- तुळुव
- अरविंदू

**संगम घराण्यातील (1336-1486):** प्रसिद्ध राज्यकर्ते म्हणजे पहिला हरिहर, बुक्क, दुसरा हरिहर आणि प्रौढ देवराय. पहिल्या हरिहराने विजयनगर साम्राज्याचा पाया घातला, आणि टेकडी प्रदेशात विजयनगर या नूतन राजधानीचा विकास केला.

**बुक्कराय :**

मदुराईच्या सुलतानाला पदच्युत करून बुक्काचा मुलगा कंपनाने साम्राज्याचा विस्तार केला. गंगादेवीने लिहिलेली संस्कृत रचना श्रीमधुराविजयम (वीर कंपण्णाराय विजयम) या सस्कृत या विजयाबद्दल अधिक माहिती आहे. बुक्कानी कोडविंदूच्या रेड्डीचा पराभव करून पेनुगोंडा प्रदेश आपल्या राज्यात समाविष्ट केला, श्रवणबेळगोळ येथे आढळलेल्या शिलालेखामध्ये श्री वैष्णव आणि जैन यांच्यातील धार्मिक मतभेद दूर करून सर्वधर्म समन्वय साधला याचा उल्लेख आढळतो. राजधानीच्या ठिकाणी किल्ले आणि मंदिरे बांधण्यात आली. कृषीव्यवसायाला त्यांनी उत्तेजन दिले. चीन देशातील मिंग वंशाच्या सम्राटाच्या दरबारी बुक्करायाने राजदूत पाठविला होता.

**दुसरा हरिहर :**

बुक्करायाचा मुलगा दुसरा हरिहर यांच्या 27 वर्षाच्या कारकिर्दित विजयनगर साम्राज्याचा बराच विस्तार झाला. त्याने कोंडविंदू, कुरतुर, नेल्लोर आणि इतर ठिकाणाचे किल्ले जिंकले. बहामनी सुलतान मुजाहिदच्या मृत्युनंतर हरिहराने आपले राज्य गोवा ते उत्तरेकडील कोकण किनाऱ्यापर्यंत विस्तार केला, कृष्णेच्या उत्तर किनाऱ्यावर असलेला पांगळ किल्ला 1398 मध्ये जिंकला.

**_तुम्हाला माहिती असू द्या_**

*निकोलो काँटी या इटालियन प्रवाशाने विजयनगर साम्राज्याला भेट देऊन विजयनगर बद्दल विस्तृत माहिती दिली आहे. राजधानीचे क्षेत्र 60 मैलाच्या परिघात विस्तारले आहे. असा त्याने उल्लेख केला.*

NOT TO BE REPUBLISHED © KTBS

**दुसरा देवराय (प्रौढदेवराय) :**

संगम घराण्यातील राजकर्त्यांपैकी दुसरा देवराय हा महान राज्यकर्ता होता. त्याला प्रौढ देवराय असेही म्हटले जात असे. त्यांना गजशिकारी (Elephant Hunter) ही पदवी दिली होती. त्यांनी ओडिशा (ओरिसा) चा गजपती वंशाचा कपिलेंद्राचा पराभव करून तो प्रदेश जिंकला. सीमावर्ती प्रदेशतील नायकांचा पराभव करून ईशान्यकडे कृष्णानदी पर्यंत राज्यविस्तार केला.

**_तुम्हाला माहिती असू द्या_**

*अब्दूल रझाक (1443) या पर्शियन राजदूताने विजयनगर साम्राज्याचे वर्णन 'न भूतो, न भविष्यती' म्हणजेच जगात विजयनगर सारखे शहर पाहिले नाही आणि पहायला मिळणार नाही असे वर्णन केले.*

त्यानंतर केरळ आणि श्रीलंका जिंकून त्यांच्याकडून खंडणी वसूल केली म्हणून त्यांना 'दक्षिण पथ चक्रवर्ती' असे संबोधले गेले. या विजयानंतर विजयनगर साम्राज्य श्रीलंका ते गुलबर्गा पर्शियन आणि तेलंगणा ते मलबार पर्यंत विस्तारले त्याने आपला पारंपारिक शत्रु बहामनी सुलतान अहमदशहाचा विजापूर पर्यंत पाठलाग करून मुदगल आणि बंकापूर आपल्या ताब्यात घेतले. दुसऱ्या देवरायाचा सेनापती दंडेश याने नौका विजय यात्रा हाती घेउन साम्राज्याचा विस्तार केला.



राजमुद्रा वराह

दुसरा देवराय हा धार्मिक सहिष्णुवृत्तीचा होता. त्याने जैन, वैष्णव देवळे आणि मशिद राजधानीच्या ठिकाणी बांधली. तो स्वतः कवी होता. त्याच्या काळात संस्कृत कवी दिंडिम, कन्नड कवी लकन्ना दंडेश हे त्याच्या दरबारात होते. देवरायाच्या काळात वीरशैव संप्रदाय आणि साहित्याचे पुनरुज्जीवन झाले. 1446 मध्ये दुसऱ्या देवरायाच्या मृत्युनंतर दुर्बल राज्यकर्ते असल्यामुळे संगम वंशाची कारकिर्द संपुष्टात आली.

1485 ते 1505 पर्यंत साळूव घरण्याने विजयनगर साम्राज्यावर राज्य केले. या वंशाचा प्रसिद्ध राजा सांळुव नरसिंह हा होता.

**कृष्णदेवराय (1509-1529) :**



कृष्णदेवराय

तुळुव वंशातील नरसनायकांची दुसरी पत्नी नागलांबिकाच्या पोटी कृष्णदेवरायाचा जन्म झाला. हा विजयनगर साम्राज्याचा सर्वश्रेष्ठ राज्यकर्ता होय. यांच्या कारकिर्दित साम्राज्याची किर्ती गगनाला पोहचली. कृष्णदेवरायांची तुलना जगप्रसिद्ध सम्राट अशोक, समुद्रगुप्त आणि हर्षवर्धन यांच्या बरोबरीने केली जाते. त्याने जवळ जवळ 20 वर्षे राज्य केले. त्याने ज्यावेळी राज्याची सुत्रे हाती घेतली त्यावेळी त्याला राज्यांतर्गत आणि राज्याबाहेरील अनेक जटिल समस्यांना तोंड द्यावे लागले, त्याम्हणजे नवीन

जलमार्गाने भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर पोहचलेल्या युरोपियनांनी आपले वर्चस्व आणि संस्कृती पसरविण्यास सुरुवात केली होती. उत्तरे कडील मोघल दक्षिणेकडे राज्य विस्ताराच्या प्रयत्नात होते. बहामनी राज्याचे पाच शाहीसुलतान कृष्णदेवरायाच्या विरोधात युद्धाच्या तयारीत होते. याच बरोबर उमत्तूर आणि ओडिशाचे राज्यकर्ते विजयनगर साम्राज्याकडे मत्सराने पहात होते.

**कृष्णदेवरायाची लष्करी कामगिरी :**

'रॉबर्ट सीवेल' यांच्या मताप्रमाणे कृष्णदेवराय हा एक असामान्य पराक्रमी, चतुर सेनानी व कुशल राजा होता. त्याने सर्व युद्धामध्ये विजय मिळवून दक्षिणेत विजयनगर साम्राज्याचा विस्तार केला. उमत्तूरचा मांडलिक गंगराजाचा पराभव करून (शिवनसमुद्र) श्रीरंगपट्टणाचा किल्ला जिंकला नंतर रायचूरचे किल्ले ताब्यात घेतले. गोवा- विजापूरच्या सुलतानाकडुन मिळविण्यासाठी पोर्तुगीजांना आश्रय देऊन त्यांच्याबरोबर व्यापारी संबध वाढविले. उदयगिरिचा किल्ला ताब्यात घेतला. उदयगिरीचा किल्ला जिंकते वेळी कृष्णदेवराय म्हणाले ''मी जिंकू शकणार नाही असा मजबूत किल्ला आहे का? आता एका दिवसात हा किल्ला जिंकल्याशिवाय राहणार नाही'' यावरून कृष्णदेवरायांच्यात असलेले कार्यशील गुण दिसून येतात. कलिंगची राजधानी कटकवर विजय मिळवून गजपती प्रतापरुद्राचा पराभव केला, आणि शांतीचा करार झाला.

कृष्णदेवरायाने बिजापूर (आत्ताचे विजयपूर) आदिलशाहीचा पराभव करून रायचूर जिंकले. रायचूरच्या आक्रमणावेळी कृष्णदेवरायांनी सैनिकांना उद्देशुन ''या जगात सर्वांना मरण आहेच, युद्धामध्ये मरण म्हणजे वीरस्वर्ग, जिंकलो तर विजयलक्ष्मी, त्याकरिता सर्वजन माझ्या बरोबर या, घाबरू नका'' असे त्यांना उत्तेजित केले.

रायचूर, बिदर आणि कलबुर्गीचे किल्ले ताब्यात घेतले. कृष्णदेवरायांने बहामनी राजाचा प्रधान कासिम बरीदचा पराभव केला आणि तुरुंगात असलेल्या बहामनी राजपुत्राला बिदरमध्ये बहामनीच्या सिंहासनावर प्रतिष्ठापन करून ''यवन राज्य प्रतिष्ठापनाचार्य'' ही पदवी मिळविली. यांच्या कारकिर्दित विजयनगर साम्राज्य अत्यंत विशाल आणि चोहो दिशांनी विस्तारले होते.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS




कृष्णदेवराय कुशल प्रशासक व युद्धात निपुण होता. राज्यकारभाराबद्दलचे त्यांचे विचार व त्यांचे व्यवहार ज्ञान हे त्यांनी लिहिलेल्या 'आमुक्त माल्यदा' या तेलगु कृतीवरून समजते. त्याने शेतीचा विस्तार व विकासासाठी पाणीपुरवठयाची सोय करून दिली. पोर्तुगीजांबरोबर सलोख्याचे संबंध ठेऊन विदेशी व्यापार वाढविला. विवाहावरील कर रद्द केला. तो कला व साहित्याचा भोक्ता होता व धर्माचा पाठीराखा होता, त्याच्या दरबारात 'अष्ट दिंगज' म्हणून ओळखले जाणारे तेलगुकवी होते. कृष्णदेवराय स्वतः उत्तम कवी होता. त्याने 'जांबवती कल्याण' नावाचे संस्कृत नाटक लिहिले. अल्लासणी पेद्दण्णा, नंदी तिम्मण्णा, दुर्जटी, तेनाली रामकृष्ण इत्यादी त्याच्या दरबारातील तेलगुकवी होते.

**उपक्रम**

*तेनाली रामकृष्णांच्या चातुर्य कथा वाचन करा.*

कृष्णदेवरायाने हंपी येथे श्रीकृष्णदेवालय बांधले, इतर मंदिरे बांधली. हंपीच्या विरुपाक्ष देवालया समोर महारंगभवन बांधले त्यांच्या कारकिर्दीत सर्व धर्माचे लोक स्वतंत्र होते असे मत पोर्तुगीज प्रवासी पायेस व बर्बोसा यांनी मांडले आहे. त्यांनी कृष्णदेवरायांची प्रतिष्ठा व सामर्थ्यांची प्रशंसा केली आहे.

©KTBS
NOT TO BE REPUBLISHED

## विजयनगर साम्राज्याचा -हास

कृष्णदेवरायांच्या नंतर अच्युतराय आणि सदाशिवरायानी राज्य केले. त्याच्या कालावधीत राज्यकारभाराची सुत्रे कृष्णदेवरायाचा जावई अरविंद् घराण्याचा रामरायाच्या हाती आली. आपल्या 23 वर्षाच्या कारकिर्दीत रामरायाने विजयनगर साम्राज्याला वैभवाच्या शिखरावर पोहचविले. त्यामुळे त्याचे अनेक शत्रु निर्माण झाले.

दक्षिणेकडील सुलतानांच्या सततच्या आक्रमणामुळे आणि रामरायाने विजायपूर आणि गोवळकोंडा ताब्यात घेतल्यामुळे सुलतान आणि राम राया यांच्यात शत्रुत्व निर्माण झाले. विजयनगर साम्राज्याच्या वैभवामुळे / प्रगती मुळे हे सुलतान त्यांचा व्देष करू लागले दक्षिणेकडील पाचही सुलतानानी धर्माच्या नावणे आपल्यातील राजकिय वैमनस्य बाजूला ठेऊन विजयनगर विरोधात हातमिळवणी केली.

> ***तुम्हाला माहिति असुद्या***
>
> *पेनुगोंडा, चंद्र गिरी, पट्टेबिड़, तिरुवाडी (तिरुवांकूर) मुळवाई (मुळबागीलू) सांतळीगे (शिमोग) आणि मंगळूरु हे विजयनगर साम्राज्यातील प्रमुख प्रांत होते.*

1565 मध्ये पाचही सुलतानानी विजयनगर साम्राज्यावर आक्रमण करून रक्कसतांगडी (ताळीकोटे) येथील लढाईत रामरायाला पराभूत करून क्रूरपणे ठार मारले. विजयी झालेल्या सुलतानानी भव्य विजयनगर साम्राज्याची लुटालूट करून विजयनगरला कायम चे भग्न करून टाकले. राजधानी हंपी उध्वस्त केली. पुढे अरविंदू घराण्याने 1646 पर्यंत पेनुगोंडा, चंद्रगिरि आणि वेल्लूरवरती काही काळ राज्य केले. कर्नाटकातील म्हैसुरचे वडेयर, केळदीचे नायक आणि चित्रदुर्गचे पाळेगार येथील मांडलिक स्वतंत्र झाले.

## विजयनगर साम्राज्याचे सांस्कृतिक योगदान

**राज्यकारभार:** विजयनगर साम्राज्याचा राज्यकारभार पारंपारिक पद्धतीने चालत असे. राजा आपल्या जेष्ठ पुत्राला (युवराज) आपला उत्तराधिकारी म्हणून घोषित करत असे. अधिकाराचे विकेंद्रिकरण असलेले समर्थ केंद्रिय कारभार पहात होते.

> ***हे तुम्हाला माहिती आहे का ?***
>
> - *होन्नम्मा ही स्त्री दुसऱ्या देवरायांच्या दरबारात वर्दीकार (राजच्या आगमनाची माहिती देणारी /वर्दी देणारी) होती.*
> - *विजयनगर साम्राज्यात कुस्ती हा लोकप्रिय क्रिडा प्रकार होता. हरिअक्का ही त्या काळातील प्रसिद्ध महिला कुस्तीपटू होती.*

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

यामध्ये मंत्रीमंडळ सैन्याचे प्रभुत्व, प्रांतीय मांडलिक अथवा राजा एका नायकाला किंवा पाळेगाराला सैनिक सेवेच्या शर्तीवर जमीन बहाल करत असे राज्यमंडळ, नायक, ग्राममंडळ या पद्धतीने राज्यकारभार चालत असे. तिम्मरस हा कृष्णरायाच्या कालावधीत पंतप्रधान होता. साम्राज्याची राज्य, नाडू आणि ग्राम अशा घटकामध्ये विभागणी केली होती.

**उपक्रम**

*ग्राम-पंचायतीला भेट देऊन ग्राम सभे बद्दल माहिती संग्रह करा.*

राजाला सर्वोच्च न्यायाधिश म्हणून अधिकार. प्रांतामध्ये प्रांताधिकारी न्यायनिवाडा करीत असत, कठोर शिक्षा दिल्या जात असे. खेडे हा राज्यकारभाराचा सर्वात लहान घटक होता. ग्रामसभा खेड्यातील राज्यकारभार पाहात असे. गौडा, करणिक, तळवार हे खेड्याच्या राज्यकारभारामध्ये मदत करीत असत. नाडू म्हणजे सध्याचे जिल्हाचे स्वरूप नाडगौडा त्याचे प्रमुख असत. तर, शहरांचा राज्यकारभार पट्टणस्वामी पहात असत.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

**लष्करी व्यवस्थाः**

विजयनगर साम्राज्याचे सैन्य सामर्थ्यशाली होते. कायमची तुकडी. मांडलिकांची सैन्य तुकडी आणि सुसज्ज सैन्य (हे राजाचे रक्षणा घटक) असे तीन विभाग होते. सैन्यात पायदळ, गजदळ, अश्वदल आणि फिरंगीदळ असे विभाग होते. 1368 च्या लढाई पासून फिरंगीदळाचा वापर केला गेला, त्यात हत्तीचा प्रमुख सहभाग होता. विजयनगरच्या सैन्यात अरबी घोडे हे प्रमुख आकर्षण होते. आरमारही होते, कोणत्याही जाती धर्माच्या व्यक्तीस योग्यतेच्या बळावर सैन्यात स्थान दिले जात असे. मुस्लीम, शेतकरी आणि बेरड समाज हे युद्धाच्या वेळी किल्ले पहारेदार म्हणून काम करत असत. नायक आणि पाळेगार युद्धाच्या वेळी प्रमुख भूमिका बजावयाचे.

**सामाजिक व्यवस्थाः** अनेक व्यवसायावर आधारित जातीपद्धत अस्तित्वात होती. कुशल कलाकार, भांडी तयार करणारे, सोनार लोहार, विणकर, चर्मकार (चांभार) यांची संख्या लक्षणीय होती. सती, बालविवाह आणि देवदासी पध्दत अस्तित्वात होती. सामान्यपणे एकपत्नित्व पध्दत रूढ होती. राजे आणि श्रीमंतामध्ये बहुपत्नित्व पद्धत प्रचलित होती. स्त्रियांना मानाचे स्थान होते. राजवाड्याचे पहारेकरी म्हणून स्त्री कुस्तीपटुना नियुक्ती केले जात असे. होळी, दसरा आणि दिपावली हे सण मोठ्या प्रमाणात साजरे करत असत. दसरा सण फार मोठ्या प्रमाणात आणि दिमाखाने राजकिय छत्रछायेखाली साजरा होत असे. नृत्य आणि संगीत खूप लोकप्रिय होते.

**आर्थिक व्यवस्था:** विजयनगर साम्राज्याची आर्थिक स्थिती भक्कम होती. जमिनीवरील कर हा राज्याच्या उत्पन्नाचे प्रमुख साधन होते. शेतकरी आपल्या उत्पन्नाचा ¼ भाग कराच्या स्वरुपात देत असत. व्यवसाय कर, घरफाळा, वाहतूक कर बाजार कर, वाणिज्यकर, आयात कर, निर्यात कर, मांडलिकांच्याकडून मिळणारी खंडणी ही उत्पन्नाची इतर साधने होती. कृषीव्यवसाय हा अर्थव्यवस्थेचा कणा होता. शेतकरी वर्षामध्ये रब्बी आणि खरीप अशी दोन पिके घेत असत, मक्का, गहू, नाचणा, भात, व्दीदल धान्ये, तीळ, डाळी, बाजरी, शेंगा, कापूस, ऊस, नारळ आणि म साल्याचे पदार्थ ही मुख्य पिके होती. केळी आणि भाजीपाला यांची लागवड केली जात होती. विजयनगरच्या राज्यकर्त्यांनी शेतीला उत्तेजन देण्यासाठी विहिरी. तलाव आणि कालवे बांधून पाणीपुरवठ्याची सोय केली. त्यांच्या काळात गेणी, गुत्तीगे, सिद्धाय, वर आणि गडी इ. जमीनधारणेच्या पद्धती अस्तित्वात होत्या.

**उपक्रम**

*विजयनगर कालातील दसरा आणि आताचा म्हैसूर दसरा यांची तुलना करा*

विजयनगर साम्राज्याच्या काळात व्यापार आणि उद्योगधंद्यात प्रचंड प्रगती झाली होती. मिरी, लवंग, वेलदोडा इ. मसाल्याचे पदार्थ खडीसाखर, कस्तुरी, कच्चे लोखंड, हिरे, चंदन, सुगंधी अत्तरे निर्यात केली जात असत वस्त्रोद्योग अस्तित्वात होता. सोन्याचे वराह, गद्यान, पगोड, चांदीच्या तारा, तांब्याच्या तारा, अल्युमिनियमचा दुड्डू आणि कासू ही नाणी चलनात होती.

**उपक्रम**

*दुड्डु, कासू अथवा इतर नाणी किंवा यांची चित्रे संग्रह करा.*

भटकळ, होन्नावर, मंगळूर ही विजयनगर साम्राज्यातील प्रमुख बंदरे होत. अरब राष्ट्रे, चीन, पोर्तुगाल, इ. देशांशी साम्राज्याचे व्यापारी संबंध होते.

**धार्मिक व्यवस्था:** विजयनगर साम्राज्य सर्व धर्मांना संरक्षण आणि प्रोत्साहन दिल्यामुळे प्रसिद्धीस पात्र ठरले. या काळात श्रीवैष्णव आणि जैन यांच्यातील धार्मिक मतभेद मिटले जाऊन ते गुण्यागोविंदयाने राहु लागले. प्रारंभीचे विजयनगरचे राज्यकर्ते शैव आणि वीरशैव धर्म मानत असत. नंतरचे राज्यकर्ते वैष्णव धर्माला मानू लागले.

**तुम्हाला माहिती असु द्या**

*ख्रिश्चन, यहुदी, मुस्लीम अथवा हिंदू कोणीही असो या राज्यात शांतीमय जीवन जगू शकतात.*
*बार्बेस - विदेशी प्रवासी*

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

विजयनगर साम्राज्यात मुस्लीमासाठी मशिदी आणि दर्गे बांधले गेले, विजयनगरच्या राज्यकर्त्यांनी ख्रिश्चन धर्माला प्रोत्साहन देऊन राज्यात चर्च बांधण्यास परवानगी दिली.

**साहित्यः** साम्राज्यात असलेल्या शांती, सुव्यवस्था आणि धार्मिक प्रगतीमुळे साहित्याच्या भरभराटीला वाव मिळाला. कन्नड, संस्कृत, तेलगू आणि तामिळ भाषेत साहित्य रचना केल्या गेल्या.

रत्नकरवर्णी ने 'भरतेश वैभव', चामरसाने 'प्रभूलिंगलिले', कुमार व्यासाचे 'गदुगिन भारत' या कन्नड भाषेतील प्रमुख रचना होत्या. सोमनाथाच्या तेलगू कृतीचे भीमकवीने कन्नडमध्ये बसवपुराण असे भाषांतर केले. बसवादी शिवरारणांची वचने संकलित करण्यात आली. 'शुन्य संपादने' या कृतीत बसवचने अंतर्भूत आहेत. लकन्ना दंडेशाचे शिवतत्व चिंतामणी याशिवाय कन्नडमध्ये वैद्यशास्त्र, पशुचिकित्सक शास्त्र, काव्यशास्त्र, ज्योतिष्य, पाकशास्त्र, हस्तरेखा ज्योतिष्य या विषयावरील ग्रंथ रचना केल्या गेल्या. पुरंदरदास, कनकदास, श्रीपादराय, व्यासराय इत्यादीनी दास साहित्यामध्ये भर टाकली. कनकदासांची 'मोहन तरंगीनी' 'नळचरित', हरि भक्तसार आणि 'रामध्यानचरित्र' या काही महत्वाच्या कृती आहेत.

संस्कृतमध्ये विद्यारण्यानी शंकर विजय, आणि 'सर्वदर्शन संग्रह' या साहित्यकृती लिहिल्या. विद्यारण्यांचे बंधू सायनाचार्य यांनी 'वेदार्थप्रकाश' नावाचे वेदावर भाष्य, आयुर्वेद सुधानिधी पुरुषार्थ सुधानिधी इ. साहित्य कृतीची रचना केली. कंपन्न रायांची पत्नी गंगादेवीने 'मधुराविजयम' लिहिले. यामध्ये कंपन्नाच्या दिग्वीजयांचे वर्णन आहे.

दुसऱ्या देवरायाच्या दरबारातील तेलगू कवी श्रीनाथ याला 'कवी चक्रवर्ती' अशी पदवी दिली गेली. अल्लासणी पेद्दणाचे 'मनुचरित' तिमण्णाचे परिजात अपहरणम' तेनाली रामकृष्णाचे उभटाराध्य चरित या काळातील प्रसिद्ध रचना आहेत.

तामिळ कवि परमज्योतियर, वीरराघव, मंडल पुरुष, ज्ञान प्रकाश, हरिहर इत्यादी कृष्णदेवरायांच्या दरबारी होते. परमज्योतीय्यर कवीनी तिरुवळ्यादल पुराण ही रचना केली. विजयनगरच्या काळात संस्कृत कन्नड, तेलगू, तामिळ भाषेत साहित्य रचना करण्यास प्रोत्साहन देण्यात आले.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

## कला आणि वास्तूशिल्पकला

विजयनगर साम्राज्याचे कलेच्या क्षेत्रातील योगदान अविस्मरणीय आहे. ते कलेचे भोक्ते होते. यांच्या काळात देवालये राजवाडे, किल्ले, मनोरे, महामंटप, सार्वजनिक इमारती, तलाव कालवे आणि अनेक इमारती बांधण्यात आल्या.

**विजयनगर कलेची मुख्य वैशिष्ट्ये:** विजयनगर साम्राज्याच्या राजकर्त्यांनी होयसळ, चोळ आणि चालुक्यांच्या शिल्पकलेची शैली पुढे चालू ठेवली. यांच्या शैलीचे मुख्य वैशिष्ट्ये म्हणजे अनेक खांबानी मिळून तयार झालेला विशाल सभामंटप किंवा कल्याणमंटप, देवळांची उंच गोपुरे (रायगोपुर), पूर्णाकृती कमानी आणि मंटप आहेत. कोरीव काम, भव्यता, सौंदर्याबरोबरच मूर्तीमध्ये गंभीर आणि उग्र भावनांना महत्वाचे स्थान दिले आहे. बाधकामात खडीचा वापर ही या शैलीची इतर वैशिष्टये होती.

***उपक्रम:***

*हंपीला भेट देऊन तेथील देवळे आणि बांधकामाची चित्रे व माहिती संग्रह करा.*

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

## महत्वाची मंदिरे

विजयनगर साम्राज्याच्या कालावधीत हंपी, श्रृंगेरी, तिरुपती, काँची, लेपाक्षी, कारकळ, मूडबिद्री, भटकळ, चिदंबरम, काळहस्ती, नंदी, श्रीशैल, कोलार इत्यादी ठिकाणी मंदिरे बांधण्यात आली.

श्रृंगेरी येथील विद्याशंकर देवालय हे विजयनगर साम्राज्याच्या सुरुवातीला बांधण्यात आलेले प्रमुख देवालय होय. या देवळातील नक्षीकाम अपूर्व सौंदर्याचा नमुना आहे. विजयनगर काळातील अत्यंत प्राचीन देवालय म्हणजे हंपीचे विरुपाक्ष देवालय आहे. विशाल प्रांगण, कोरीव खांब आणि कलाकुसरीने सजलेले छत हे या देवळाचे वैशिष्ट्य आहे.

***तुम्हाला माहिती असू द्या:*** *यांच्या काळात बांधली गेलेली देवळे बांधकाम, शिल्पे मूर्ती यांचा उल्लेख प्रसिद्ध इतिहासकार आणि वास्तुशिल्पतज्ञ 'पर्सिब्राऊन' हे विजयनगरची वास्तुशिल्पकला म्हणजे 'द्रविड बांधकाम शैलीचे श्रेष्ठ आणि विकसित रूप' असे वर्णन केले.*



विजय विठ्ठल देवालय



हंपी विरुपाक्ष देवालय

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

हंपीमध्ये असणारे विजय विठ्ठल देवालय श्रृंगारमय कलाकुसरीसाठी प्रसिद्ध आहे. सप्तस्वर निर्माण होणारे खांब, विशाल कल्याण मंटप दगडात कोरलेले रथ हे सगळे या देवालयाच्या सौंदर्यात भर टाकतात.

कृष्णदेवरायांनी बांधविलेल्या महानवमी टेकडी (महानवमी दिब्ब) या ठिकाणी नवरात्रोत्सव साजरा केला जात असे. पर्शियन राजदूत अब्दूल रजाक यांच्या वर्णनानुसार मांडलिक राजे, जमिनदार दुरवरून चक्रवर्तीच्या (राजा) आज्ञेनुसार या ठिकाणी जमत असत. कमल महल, गजशाळा, राणीचे स्नानगृह इ. इमारती इंडो-सिरॅमिक बांधकाम शैलीची उत्तम उदाहरणे आहेत. लक्ष्मी नरसिंह, कडलेकाळ गणेश, सासवेकाळू गणेश, विरभद्राची मूर्ती इ. खूप आकर्षक आहेत. विजयनगर साम्राज्याची राजधानी हंपी अभेद किल्यानी वेढलेली होती. सध्या यापैकी चारच अस्तित्वात आहेत.

**संगीत आणि नृत्य:** विजयनगर साम्राज्यातील राजकर्त्यांनी संगीत, नृत्य, नाटक या ललीतकलांना उत्तेजन दिले, गायक, वादक आणि इतर कलाकारांना दरबार आणि देवालयात सन्मान दिला जात असे. पुरंदरदास आणि कनकदास



दगडी रथ

यांनी आपल्या कीर्तनाच्या माध्यमातून कर्नाटक संगीतात भर टाकली. नर्तकी अलंकृत होऊन देवालय आणि दरबारात नृत्य प्रदर्शन करीत असत.

## बहामनी राज्य

14 व्या शतकातील दिसून आलेला दुसरा महत्त्वाचा बदल म्हणजे बहामनी राज्याचा उदय. 1347 मध्ये अल्लाउद्दीन हसन गंगू बहमन शहा याने बहामनी राज्याचा पाया घातला. 1347 पासून 1686 पर्यंत बहामनी आणि शाही राजघराण्यानी राज्य केले. या घराण्यातील पहिला महम्मद शहा दुसरा महम्मद शहा, फिरोजशहा, महम्मद गवाण, युसुफ आदिल शहा, पहिला इब्राहिम आदिल शहा, दुसरा ईब्राहिम आदिल शहा हे महत्वाचे राज्यकर्ते होते. अल्लाउद्दिन हसनगंगूचा मुलगा महम्मद शहाने 1367 मध्ये कलबुर्गी येथे प्रसिद्ध जामिया मशिद बांधली. फिरोजशहाने फिरोजाबाद नावाची राजधानी वसविली, हा स्वतः विव्दान होता. त्याने फिरोजाबाद मध्ये वेधशाळा स्थापन केली.

**महम्मद गवाण (1411-1481) :** 1347-1426 पर्यंत कलबुर्गी ही बहामनीची राजधानी होती. या काळात महम्मद गवाणाची निष्ठा, निस्वार्थ सेवा, उत्कृष्ठ राज्यकारभार यामुळे त्याने प्रधानमंत्री म्हणून राज्याला उत्कर्षाच्या शिखरावर नेऊन पोहचविले. इजिप्तमधील कैरो येथे राहून त्याने इस्लाम धर्मशास्त्र आणि कायदयाचा अभ्यास केला, त्याने अरेबियन आणि पर्शियन भाषेत पांडित्य मिळविले. त्याने बहामनी सुलतान हुमायून, निझामशाहा आणि तिसरा महम्मद शहा यांच्या कारकीर्दीत मंत्री आणि प्रधान मंत्री म्हणून कार्य केले. आपल्या सुव्यवस्थित राज्यकारभाराने आणि विजयाने त्याने बहामनी राज्याला नाव प्राप्त करून दिले. गवाणने कोकण, गोवा आणि बेळगांव काबीज केले. त्यानंतर आरिसावर आक्रमण करून तेथील कोंडविंदू प्रदेश ही जिंकला.

1481 मध्ये कांचीवर आक्रमण करून तेथील अपार संपत्ती लुटली. बहामनी राज्याच्या सर्वांगीण प्रगतीला कारणीभूत ठरलेल्या गवाण विरोधात शत्रुनी कारस्थान करून त्याच्यावर राजद्रोहाचा आरोप ठेवून त्याचा शिरच्छेद केला. नंतर बहामनी राज्य दुबळे होऊन पाच भागात विभागले गेले.

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

**बहामनी राज्याचा नकाशा**




@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

**बहामनी राज्याचे पाच भागात विभागणी (1518)**

↓

| अहमद नगर | विजयपूर | वऱ्हाड | बिदर | गोवलकोंड |
|---|---|---|---|---|
| (निजामशाही) | (आदिलशाही) | (इमादशाही) | (बेरीदशाही) | (कुतुबशाही) |

**दुसरा ईब्राहिम अदिलशहा (1580 - 1627) :** आदिल शाहीमधील सर्वात श्रेष्ठ राज्यकर्ता होता. वयाच्या नवव्या वर्षी गादीवर आलेल्या ईब्राहिम आदिलशहाने 47 वर्षे राज्य केले. त्याच्या समर्थ राज्यकारभाराने विजापूरमध्ये राजकिय, कला साहित्य, शिक्षण इ. क्षेत्रात लक्षणीय प्रगती केली.

याने लिहिलेल्या ''किताब-ए- नवरस'' या पुस्तकाचा प्रारंभाला सरस्वती, गणेश आणि नरसिंहाची स्तुती केली आहे. हे या कृतीचे वैशिष्ट्य आहे. या कृतीमध्ये महम्मद पैगंबराची स्तुती देखील आढळून येते. हा ग्रंथ त्याची विद्वता आणि धार्मिक सहिष्णुता यांची साक्ष देतो.

**बहामनी सुलतानांची सांस्कृतिक देणगी :**

***तुम्हाला माहिती असू द्याः*** *दुसऱ्या ईब्राहिम आदिल शाहाने महीपती दासांच्या भागवत प्रवाचनाने प्रभवित होऊन त्यांना आपल्या राज्याच्या खजिनदारपदी त्यांची नेमणूक केली.*

बहामनी आणि शाही सुलतानानी कर्नाटकावर जवळजवळ दोनशे वर्षे राज्य केले. कर्नाटकासह तामिळनाडूतील तंजावर पर्यंत राज्याचा विस्तार केला. ईस्लाम कायदयानुसार राज्यकारभार चालत असे.

**राज्यव्यवस्थाः** राज्यव्यवस्था केंद्र, प्रांत आणि ग्राम अशा भागात विभागली होती. या शिवाय महसूल व्यवस्था, संरक्षण व्यवस्था आणि न्यायव्यवस्था होती. सुलतान हा केंद्रीय कारभाराचा प्रमुख असे. मजलीस - ई - ईब्लीत नावाचे मंत्रीमंडळ होते. वरिष्ठ अधिकारी न्यायाधिश, उलेमा, आमिर हे सुलतानाचे आप्त आणि संबंधित सदस्य (नातेवाईक) असत.

गवाणने राज्यात आधी अस्तित्वात असलेल्या चार तरफांची (प्रांत) आठ घटकांमध्ये आणि प्रांताची 15 सरकारामध्ये (सुभे) विभागणी केली होती. यावर सुभेदार हा प्रमुख असे. सरकार परगण्यामध्ये विभागले असून कोतवाल, देशमुख आणि देसाई नावाचे अधिकारी परगण्याचा कारभार पाहत असत. ग्राम हा राज्यकारभाराचा सर्वात लहान घटक होता, कुलकर्णी आणि तळवार खेडयातिल कारभार पाहत असत. खेड्यातील प्रशासन घटक स्वायत्त (स्वतंत्र) संस्था होती.

**महसूल, संरक्षण आणि न्यायदान व्यवस्थाः** अमिर ए- जुमला हा महसूल विभागाचा प्रमुख असे. जमीन महसूल हे उत्पन्नाचे प्रमुख साधन होते. उत्पन्नाच्या ⅓ पासून ½ भाग जमीन महसूल म्हणून गोळा केला जात असे. जकात, घरफाळा खाणीवरील कर तंबाखू, कुरणावर कर, व्यापार कर, व्यवसाय कर

असे एकूण 50 प्रकारचे कर होते. कराच्या स्वरुपात गोळा केलेल्या पैशातून किल्ले राजमहाल, कचेऱ्यांचे बांधकाम, संरक्षण दलाची व्यवस्था (पगार) विव्दानांना देणग्या



@KTBS NOT TO BE REPUBLISHED

आणि युध्दाचा खर्च भागविला जात असे बहामनी राज्य सैनिकी बळावर चालविली जात असत. सैनिकावरील खर्चाचे प्रमाण जास्त होते. चार प्रकाराची संरक्षण दले होती. कायम सैन्य, युद्धाच्यावेळी खडे सैन्य, धार्मिक युद्धासाठीचे सैन्य आणि सुलतान व किल्यांचे संरक्षण दल. पायदळ, अश्वदळ, गजदळ आणि तोफखाना ही सैन्याची मुख्य विभाग होते. आदिलशाहीच्या काळातील अनेक किल्यापैकी विजापूरचा किल्ला सगळ्यात मजबूत होता.

सुलतान हा राज्याचा मुख्य न्यायाधिश होता. न्यायदान व्यवस्था रूढी, परंपरा आणि धर्मावर आधारीत होती. काजी सारखे अधिकारी सुलतानाना कायदा आणि सुव्यवस्था राखण्यास मदत करीत असत. यांच्या सक्षम राज्यकारभारामुळे राज्यात आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक सुबत्ता होती.

**आर्थिक, सामाजिक आणि धार्मिक परिस्थिती:** कृषी खेड्यातील मुख्य व्यवसाय होता. विणकाम, तेलगाळणे, साखर-गुळ तयार करणे, सोनारकाम, सुतारकाम कुंभारकाम, शिल्पकला आणि इतर उद्योग अस्तित्वात होते.

> ***तुम्हाला माहिती असू द्या :***
> *युसुफ अदिलशहाची पत्नी बीबीजी खानम, दिलशा अफा 'चाॅद बिबी, सहरा बानू बेगम, या कांही प्रख्यात महिला होत्या.*

दाभोळ, राजापुर, चौळ, आणि गोवा इ. महत्वाची बंदरे होती. रेशीम मध, सोने, चाँदी, शिसे, काच आणि घोडे आयात केले जात असत. व्यापारी आणि व्यवसायिक संघटना अस्तित्वात होत्या. 'होन्न' हे सोन्याचे, लारी आणि टंक ही चांदीची नाणी चलनात होती.

समाजामध्ये अविभक्त पितृप्रधान कुटुंब अस्तित्वात होती. जातीपद्धत आणि बहुपत्नीत्व पध्दत प्रचलित होती. भक्तीपंथातील हरीदास आणि मुस्लीम संतानी, हिंदू-मुस्लीम धर्मात सहिष्णूता वाढविण्याचा प्रयत्न केला. मुस्लीम धर्मात शिया, सुन्नी, सय्यद, शेख आणि पठाण असे वर्ग होते. मुस्लीम स्त्रियांच्यात पडदा पद्धत होती.

**शिक्षण, कला आणि वास्तुशिल्प:** इस्लाम संस्कृतीची वाढ करणे हा यांच्या राजकिय आणि शैक्षणिक नितीचा उद्देश होता. मक्तब नावाच्या शाळा मशिदीकडून नियंत्रीत केल्या जात असत. मक्तब मध्ये अक्षरज्ञान, धार्मिक शिक्षण, कायदा, काव्य अलंकारशास्त्र इ. शिकविले जात असत. मदरसामध्ये उच्च शिक्षणाची सोय

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

होती. स्वतः विव्दान असलेल्या महम्मद गवाणने बिदर येथे मदरसा स्थापन करून तेथे इस्लामधर्म आणि कायदयाच्या शिक्षणाला प्रोत्साहन दिले. हा मदरसा दख्खन शैलीतील बांधकाम असून ही तीन मजली इमारत 242 फूट लांब, 222 फुट रुंद, 56 फुट उंच आहे. येथील ग्रंथालयात जवळ जवळ 3000 हस्तलिखिते होती. विद्यार्थी, शिक्षक आणि धार्मिक लोकांना इथे आश्रय दिला जात असे. खगोल शास्त्र, व्याकरण, गणित तत्वज्ञान, इतिहास राज्यशास्त्र इ. विषयांचा अभ्यास केला जात असत.

सुलतानांनी इंडो- सिरॅमिक बांधकाम शैलीला उत्तेजन दिले. पहिल्या अली अदिलशाहीने बांधलेले जामिया मशिद हे या काळातील प्रमुख स्मारक आहे. इब्राहिम रोजा, गोलघुमट, गगन महल प्रमुख इमारती (स्मारके) आहेत. इमारती मुळे आदिल शाहाला जगप्रसिद्धी मिळाली जगातील अतीश्रेष्ठ बांधकामापैकी एक म्हणजे विजापुरातील गोलघुमट याचा विस्तार 1800 चौ. फूट असून चारी बाजुनी मिनार आहेत. ही सात मजली इमारत एका गोल घुमटाने अच्छादलेले आहे.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

*गोलघुमटः आपल्या राज्याच्या विजापुर शहरात हे स्मारक आहे. अहमद आदिलशहाने हे बांधले आहे. याच्या बांधकामाचा प्रारंभ 1626 मध्ये झाला, आणि 1656 मध्ये पूर्ण झाले. असे म्हणतात. या घुमटात वर जाण्यास खांबाजवळून जिना आहे. या घुमटामध्ये एकदा आवाज दिलातर सात वेळा प्रतिध्वनी निर्माण एहोतो. 51 मीटर उंचीचे विशाल घुमट आहे. हा भारतातील अत्यंत मोठा घुमट आहे.*



गोलघुमट



जामिया मशिद



बिदरचा किल्ला

## स्वाध्याय

**I. खालील रिकाम्या जागी योग्य शब्द भरा :**

1. विजयनगर साम्राज्याची स्थापना ______________ यावर्षी झाली.
2. मधुराविजयम ही साहित्यकृती ______________ यांनी लिहिली.
3. प्रौढ देवरायाचा मंत्री ______________ हा होय.
4. अमुक्त माल्यदा ही तेलगु साहित्यरचना ______________ यांनी लिहिली.
5. बिदरचा मदरसा ______________ याने स्थापन केला.
6. किताब- ए. नवरस हे पुस्तक ______________ याने लिहिले.

**II. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :**

7. विजयनगरवर राज्य केलेली घराणी कोणकोणती ?
8. दुसऱ्या देवरायांचे कार्य लिहा.
9. कृष्णदेवरायांना राज्यावर येताच कोणकोणत्या समस्यांना तोंड द्यावे लागले ?
10. आर्थिक आणि सामाजिक क्षेत्रात विजयनगर साम्राज्याचे योगदान लिहा.
11. विजयनगरांच्या काळतील कला आणि वास्तूशिल्पकलेची माहिती लिहा.
12. महम्मद गवाण बहामनी राज्यातील उत्तम प्रधान मंत्री कसा?
13. बहामनी सुलतांनाच्या राज्यव्यवस्था आणि महसूल व्यवस्थेची माहिति लिहा.
14. बहामनी सुलतांनाच्या काळातील शिक्षण, कला आणि शिल्पकले बद्दल माहिती लिहा.

**III.उपक्रम :**

1. हंसी येथील स्मारकांची चित्रे संग्रह करा.
2. ऐतिहासिक पुस्तके वाचून हंपी मधील महानवमी टेकडीवर साजरा करीत असलेल्या विजयादशमी दसऱ्याबद्दल माहिती मिळवा.
3. तुमच्या जवळील मोठ्या माणसांकडून तेनाली रामकृष्णांच्या गोष्टी जाणून घ्या.

**IV. प्रकल्प :**

1. हंपीला भेट देऊन तेथील स्मारकावर आधारित निबंध लिहा.
2. हंपीमधील विजयनगर काळातील बाजारपेठ व्यवस्थेबद्दल निबंध लिहा.

***

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

## प्रकरण - 5

# आपली राज्यघटना (संविधान)

U5U6T6

**प्रस्तूत प्रकरणात तुम्ही या गोष्टी शिकणार आहात :**

- संविधान (घटना) रचना समिती.
- राज्यघटनेची मसुदा समिती.
- घटनेची प्रस्तावना.
- घटनेची मुख्य वौशिष्टे.
- मुलभूत हक्क व कर्तव्ये आणि राज्याची अधिकृत तत्वे व धोरणे.

आपल्या देशाला स्वातंत्र्यानंतर अनेक अव्हांनाचा सामना करावा लागला आहे. यावेळी पाकिस्तानातून स्थलांतरीत झालेल्या निर्वासितांचे पुनर्वसन, राज्याचे विलीनिकरण आणि भारतीय घटना तयार करणे इ. आव्हाने होती, सरदार वल्लभाई पटेल यानी राज्याचे विलीनिकरण यशस्वीपने केले. देशाच्या शासन व्यवस्थेची घटना, या सारख्या अव्हानाना पुरेशा प्रमाणात संबोधित केले गेले. अशा राज्यघटनेची रचना त्यांची वैशिष्टये आणि प्रस्तावनेत नमूद केलेले मुलभूत हक्क कर्तव्ये आणि राज्याची अधिकृत धोरणे जाणून घेऊया.

***हे तुम्हाला माहीत असू द्या***

***कैबिनेट आयोग:*** *लॉर्ड पथीक लॉरेन्स भारतीय संसदीय घडामोडीचे सचिव सरस्टॅफोर्ड क्रिस, वाणिज्य मंडळाचे अध्यय जे.व्ही. अलेक्झांडर भारताचे नौदळ प्रमूख.*

**भारतीय घटना (संविधान) समिती:** कोणत्याही राष्ट्राचे सरकार कांही मूलभूत तत्वे आणि नियमानुसार चालते. तत्वे आणि नियमांच्या अशा संकलनाला संविधान असे म्हणतात. भारताचा राज्य कारभार व्यवस्थित



डॉ राजेद्र प्रसाद्

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

चालविण्यासाठी आणि सरकारला मार्गदर्शन करण्यासाठी कायदे व नियम असलेल्या दस्ताऐवजाला घटना असे म्हणतात, भारताला घटना निर्मितीची अत्यंत आवशकता आहे. असी शिफारस मोतिलाल नेहरू समितीने केली. कराचीमध्ये झालेल्या राष्ट्रीय कांग्रेस सभेमध्ये देखील याच मुद्यावर भर देण्यात आली.

कॅबिनेट शिष्टमंडळाच्या शिफारसीनुसार जुलै 1946 रोजी संविधान सामितीची रचना झाली. संविधान रचना समितीची पहिली सभा 9 डिसेंबर 1946 रोजी सुरू झाली 11 डिसेंबर 1946 रोजी डॉ. राजेंद्रप्रसाद यांची घटना समितीचे अध्यक्ष म्हणून निवड झाली. या सभेत जवाहरलाल नेहरू, सरदार वल्लभाई पटेल, डॉ. बी.आर. आंबेडकर, मौलाना अबुलकलाम आझाद, सि. राजगोपालचारी, के.सी. मुंशी टी.टी कृष्णाम्माचारी, श्रीमती सरोजिनी नायडू, श्रीमती सूचेता कृपलानी यांच्यासह एस. निजलिंगप्पा, के.सी. रेड्डी केंगल हनुमंतया, टेकुर सुब्रम्हण्यम इ. कर्नाटकातील विख्यात व्यक्तिही सामील झाल्या होत्या.



**डॉ. बी.आर. आंबेडकर**

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**संविधान मसूदा समिती (Drafting committee):** देशातील सर्व बाबींचा तसेच घटकांचा काळजीपूर्वक अभ्यास करून 22 समित्या आणि 5 उपसमित्या स्थापण केल्या. त्यापैकी सर्वात महत्वाची म्हणजे रचना समिती होय. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे या समितीचे अध्यक्ष होते. त्यांनी संविधान रचनेसाठी दिलेल्या अमुल्य योगदानामुळे त्याना संविधानाचे शिल्पकार म्हणून ओळखले जाते. याच्या व्यतिरीक्त एन. गोपालस्वामी अय्यंगार, अल्लडी कृष्णस्वामी अय्यार, के.एम.मुंशी, टी. टी कृष्णम्माचारी अनेक ख्यातनाम, मुत्सद्दी राजकारण्यांचा सहभाग होता. या समितीला मसूदा समिती असे ही म्हणतात.

**सांविधानाची निर्मिती (framing of the constitution):** डिसेंबर 1946 पासून दोन वर्षे, अकरा महिणे व 18 दिवस घटना निर्मितीचे कामकाज चालले घटनेची निर्मिती या कालावधीमध्ये 145 सभा घेतल्या घटनेचा मसुदा तयार करून घटना निर्मिती

करण्यात आली 1909, 1919, व 1935 मध्ये ब्रिटीश सरकारने अवलंबिलेले कायदे त्यांची संसदीयव्यवस्था अमेरिकेचे 'बील ऑफ राइटस' आर्यलंडची अधिकृत सामाजीक तत्वे या सर्वाचा आधार घेवून घटनेचा आराखडा तयार करण्यात आला. 26 नोव्हेंबर 1949 रोजी भारतीय राज्यघटनेचा स्विकार झाला. 26 - जानेवारी 1950 रोजी घटना अमलात आणली, म्हणून 26 जानेवारी हा दिवस गणतंत्र (गणराज्य) दिन म्हणून साजरा केला जातो.

***तुम्हाला माहित असू द्या :***



बी.एन.राव

- *1929 मध्ये झालेल्या भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसच्या लाहोर अधिवेशनात पूर्ण स्वराज्याचा ठराव मंजूर करण्यात आला. या ठरावानुसार 26 जानेवारी 1930 रोजी स्वातंत्र्य दिन साजरा करण्यात आला.*
- *26 नोव्हेंबर 1949 रोजी भारतीय संविधान स्विकारण्यात आले. म्हणून हा दिवस* ***संविधान दिन*** *म्हणून 2015 पासून साजरा केला जाता आहे.*
- *26 जानेवारी 1950 रोजी आपली घटना आमलात आणली गेली.*
- *बेनगल नरसिंगराव कर्नाटकाच्या घटना समितीचे मुख्य सल्लागार म्हणून, प्रत्येक मसूदा तयार करण्यात त्याचा मोलाचा वाटा होता. - त्यानी जम्मू आणि काश्मीर राज्याचे पतंप्रधान आणि हेग येथे आंतरराष्ट्रीय न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून काम केले.*

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

**संविधान प्रस्तावना:** भारताच्या घटनेला स्वतःची स्वतंत्र अशी एक प्रस्तावना देण्यात आली. त्यामध्ये घटनेची मुलभूत धोरणे आणि आदर्शाचा समावेश करण्यात आला. आपली घटना म्हणजे मुल्ये, तत्वे, रचना व ध्येयाची गोळाबेरीज आहे. ही घटना भारतीय जनतेच्या तीव्र इच्छा, आकांक्षावर तसेच आदर्शावर आधारीत आहे.




## भारताच्या संविधानाची प्रस्तावना

आम्ही भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य घडविण्याचा व त्याच्या सर्व नागरिकास (समाजवाद व धर्मनिरपेक्षता संविधानमध्ये मिळवून 1976 ला घटना दुरुस्ती केली होती.

सामाजिक, आर्थिक, व राजनैतिक **न्याय**
विचार अभिव्यक्ती, विश्वास, श्रध्दा व
उपासना यांचे **स्वातंत्र्य**
दर्जाची व संधीची **समानता**
निश्चितपणे प्राप्त करुन देण्याचा
आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
त्यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करुन आमच्या संविधानसभेत
आज दिनांक 26 नोव्हेंबर 1949
याव्दारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित
करुन स्वत:प्रत अर्पण करत आहोत

©KTBS
NOT TO BE REPUBLISHED



घटनेची प्रस्तावना म्हणजे 13 डिंसेबर 1946 रोजी नेहरुनी प्रस्तावित केलेल्या ठरावाचा एक भाग आहे. 22 जानेवारी 1947 रोजी घटना समितीने तिला मान्यता दिली. हा प्रस्ताव मजूर केला.

**संविधान प्रस्तावनेतील मुख्य अंश:**

**1) आम्ही भारताचे लोक (We the people of India):** भारताचे संविधान भारतीयानी बनवलेले आहे आणि आम्ही सर्व भारतीय असल्यामुळे भारतातील लोकांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी आम्ही काम करत आहोत.

**2) सार्वभौम देश (Sovereignty):** भारत एक सार्वभौम राष्ट्र आहे त्याचे स्वतःचे स्वतंत्र, परराष्ट्र धोरण, स्पष्टीकरण धोरण, आणि नियोजन पध्दतीचे पालन करून त्याचे अंतर्गत आणि बाह्य सार्वभौमत्व आहे.

**3) समाजवादी (Socialism):** आपल्या संविधानाचे ध्येय सामाजिक समानता निर्माण करणे आणि आपल्या देशातील सर्व लोकाचे कल्याण करणे समाजवाद सक्षम करण्यासाठी राज्याच्या धोरणाची मार्गदर्शक तत्वे 42 व्या दुरूस्तीव्दारे समाविष्ठ करण्यात आली आहेत.

**4) धर्म निरपेक्ष (Secularlism):** 1976 मध्ये 42 व्या घटना दुरुस्तीद्वारे धर्मनिरपेक्ष हा शब्द संविधानात समाविष्ट करण्यात आला आहे. कोणत्याही धर्माला राष्ट्रीय धर्माचा दर्जा प्राप्त झालेला नाही. त्यामूळे भारत हा एक धर्मनिरपेक्ष देश, आहे. नागरिकांना त्याच्या इच्छेनुसार कोणताही धर्म स्विकारण्याचे स्वातंत्र्य आहे, कारण भारतात धार्मिक एकोपा पहावयास मिळ्तो.

**5) लोकशाही (Democratic):** लोकशाही हा एक शासनाचा प्रकार आहे. प्रो. जीवन रॉबर्ट सीले यांच्या मते लोकशाही एक सरकार आहे, जिथे प्रत्येकाचा वाटा, सहभाग आहे. भारत देखील लोकशाही देश आहे. सार्वत्रिक निवडणूकीत त्यांनी निवडलेल्या प्रतिनिधीद्वारे नागरिकांचे शासन चालते. हे लोकशाहीचे सरकार आहे, जिथे नागरिक प्रभुत्व आहेत.

**6) प्रजासत्ताक (Republic):** प्रजासत्ताक ही एक अशी व्यवस्था आहे ज्यामध्ये राज्यांचा प्रमुख प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे ठराविक काळासाठी निवडला जातो. इंग्लंड हा लोकशाही देश आहे पण प्रजासत्ताक नाही, कारण इंग्लंडचा राजा / राणी हे वंशपरंपरागत असतात. भारताचे राष्ट्रपती अप्रत्यक्ष निवडणूक प्रणालीव्दारे निवडले जातात.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

**7) न्याय (Justice):** न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधूता हे आपल्या राजकीय आणि तात्विक व्यवस्थेचे चार स्तंभ आहेत. सर्व नागरिकांना सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्याय प्रदान करणे हे आपल्या संविधानाचे मुख्य उद्दिष्ट आहे. न्याय म्हणजे अधिकृतपणे हवे आहे ते मिळविणे.

**8) स्वातंत्र्य (Liberty):** यावरून हे सिद्ध होते की भारतीय नागरिक काय विचार करतात, त्यांच्या अभिव्यक्तिच्या पद्धती आणि धर्म किंवा उपासनेचे पालन करण्याची त्यांची इच्छा आणि त्यांचे विचार कृतीत आणण्यासाठी कोणतेही अवास्तव निर्बंध नाहीत, जे लोकशाहीच्या महानतेची साक्ष आहेत. तथापि सर्वांगिण विकासासाठी स्वातंत्र्य आवश्यक आहे आणि या स्वतंत्र्याशिवाय आपण लोकशाहीची कल्पनाही करू शकत नाही.

**9) समानता (Equality):** स्वातंत्र्याइतकेच समानतेला महत्व आहे. त्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. समानतेशिवाय स्वातंत्र्याला कांही अर्थ नाही समानतेचा असा अर्थ आहे की कोणताही धर्म, जात, लिंग, रंग आणि निवास्थानाच्या आधारावर त्यांच्यात भेदभाव नसावा. समान दर्जा आणि समान संधी ही मुख्य आकांक्षा सर्वासाठी उपलब्ध असावे.

**10) बंधूभाव (Fraternity):** व्यक्तिच्या प्रतिष्ठेसाठी, राष्ट्राची एकता आणि अखंडतेसाठी बंधूभाव आवश्यकता आहे. बंधूत्व म्हणजे उच्च-निच, गरीब-श्रीमंत आणि गोरे-काळे असा कोणत्याही प्रकारचा भेदभाव न कारता जगणे विकसित करणे बंधूभाव सर्वामध्ये वैश्विक बंधुत्वाची भावना आहे. कारण प्रत्येकासाठी आदर आणि प्रतिष्ठा आवश्यक आहे. आपण भेदभाव करू नये.

**11) एकता आणि अखंडता (Unity & Integrity):** विविध जाती आणि धर्माच्या लोकांमध्ये एकता आणण्याची गरज आहे. सर्व राज्यांमध्ये एकता निर्माण करण्यासाठी एकेरी नागरीकत्व स्वीकारले आहे. त्यांचप्रमाणे राष्ट्राचा नैतिक विकास व्हावा यासाठी संविधानात राष्ट्रध्वजाचा आदर करणे यासारख्या 11 मूलभूत कर्तव्यांचा समावेश करण्यात आला आहे. हे सर्व भारतातील नागरिकांमध्ये एकता आणि एकतेची भावना वाढवते. ते आपल्याला आठवण करून देतात की राष्ट्र उभारणीत लोकांच्या ही जबाबदाऱ्या आहेत.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

संपूर्णपणे राज्यघटनेची प्रस्तावना आरशासारखी आहे. हे भारतीय राजकीय व्यवस्थेच्या प्रणाली, तत्वे, आदर्श आणि मुल्ये बनले पाहिजेत. नियमांसह प्रस्तावनेत नमुद केलेली तत्वे आणि राज्यांची उद्दिष्टे प्रत्यक्षात अंमलात आणण्याची जबाबदारी नागरिक म्हणून आपली आहे.

## आपल्या संविधानाची ठळक वैशिष्टये (Sailent Features of constitution) :

**लिखित आणि मोठी घटना:** आपली राज्य. घटना लिखित स्वरूपात आहे केंद्रीय कायदे मंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्यायमंडळ यासारख्या शासनाच्या अंगाचे अधिकार आणि कार्य घटनेत स्पष्ट करण्यात आले आहेत. मूलभूत अधिकार, कर्तव्ये, राज्य धोरणाची मार्गदर्शक तत्वे इ. सर्व लिखीत स्वरुपात आहेत. मूळता आपल्या संविधानात 22 भाग, 8 परिशिष्टये, आणि 395 कलमे होती नंतर अनेक सुधारणासह 25 भाग 12 - परिशिष्टये आणि 470 पेक्षा जास्त कलमे असलेली मोठी घटना बनली आहे.

**लवचिक आणि ताठर घटना (संविधान):** ज्या घटनेत सहज सुधारणा करता येते त्याला लवचिक किवां ताठर घटना म्हणतात ज्या संविधानामध्ये दुरुस्तीसाठी विशेष प्रक्रिया असते त्यांना कठोर किंवा गुंतागुतीची घटना म्हणतात. आपली राज्यघटना फार लवचिकही नाही आणि ताठर ही नाही.

**लोकसभेच्या सरकारचे स्वरूप:** आपल्या राज्य घटनेत लोकसभा सरकारची तरतूद आहे, राष्ट्राची सार्वभौम सत्ता निवडून आलेल्या लोकसभेकडे असते. कार्यकारीणी केंद्रीय आणि राज्य स्तरावरील विधिमंडळाला जबाबदार असते. जो पर्यंत मंत्रिमंडळाला कायदेमंडळाचा विश्वास आहे. तो पर्यंत ते सतेवर असते. विधीमंडळाचा विश्वास गमावताच राजीनामा द्यावा लागतो.

**प्रजासत्ताक (Republic):** संविधानाने भारताला प्रजासताक घोषित केले आहे. त्यामुळे वंशपरंपरागत तत्वावर कोणीही सत्तेवर येऊ शकत नाही. रिपब्लिक हा शब्द सुचित करतो की भारतावर कोणत्याही वंशपरंपरागत राजा किंवा राणीचे राज्य नाही. भारतात राष्ट्रपती हा देशाचा प्रमुख असतो आणि तो निवडला जातो.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**संघराज्य पध्दती (Federal System):** आपल्या घटनेत संघराज्य (संयूक्त राज्य) पध्दती अवलंबलेली आहे. कारण आपल्या देशात. विविध भाषा, जाती, वंश, आणि भौगोलिक प्रदेश आहेत. प्रशासकीय अधिकार केंद्र आणि राज्य सरकाराव्दारे विभागलेले आहेत (केंद्रांच्या यादीत 100 विषय आहेत राज्याच्या यादीत 61 भाग आहेत. आणि समवर्ती यादीत 52 भाग आहेत) केंद्र आणि राज्य याच्यात कोणत्याही विषयासंदर्भात उदभवणारे सर्व वाद सोडविण्याचे अधिकार सर्वोच्च न्यायालयाला आहेत.

**मुलभूत हक्क** :(अधिकार) जे अधिकार घटना थेट जनतेला देते. त्याना मुलभूत हक्क असे म्हणतात. केंद्राचा किंवा राज्याचा कोणताही कायदा कोणतीही संस्था हक्क व अधिकार नाकारू शकत नाही.

मुलभूत अधिकार काढून घेतले. किवी धोक्यात आल्यास, नागरिक थेट उच्च न्यायालय किंवा सर्वोच्च न्यायालयात अपिल करू शकतात. हे अधिकार राज्यघटनेच्या तिसऱ्या भागात नमूद केलेले आहेत. स्वातंत्र्याचा हक्क, समानतेचा हक्क, शोषणाविरुद्धचा हक्क शिक्षण व संस्कृतीचा हक्क, आणि घटनात्मक उपाय करण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयाला आहे म्हणून सर्वोच्च न्यायालयाला मूलभूत हक्काचा रक्षक असे म्हणतात.

**मूलभूत कर्तव्ये:** हक्क आणि कर्तव्यना एकाच नाण्याच्या दोन बाजू म्हटले आहे. 1976 मध्ये संविधानाच्या 42 व्या दुरूस्तीद्वारे भाग 4A कलम 51A नूसार 10 मूलभूत कर्तव्ये करण्यात आली. त्यानंतर 2002 मध्ये संविधानाच्या 86 च्या दुरूस्तीनूसार 6 ते 14 वर्ष वयोगटातील मुलाना सक्तीचे शिक्षण देणे हे पालकांचे कर्तव्ये ठरविण्यात आले आहे. यामुळे मूलभूत कर्तव्यांची संख्या 11 झाली आहे. असे संविधानाच्या 4A भागामध्ये नमूद केले आहे.

**राज्य धोरणाची मार्गदर्शक तत्वे:** ही आपल्या राज्य घटनेच्या चौथ्या अनुसूचीमध्ये समाविष्ठ करण्यात आली आहेत. ही तत्त्वे आर्यलेंड राज्यघटनेतून स्वीकारण्यात आली आहेत. ही तत्वे आर्थिक व सामाजिक समानता प्रस्थापित करण्याचा पाया आहेत. देशाचा राज्यकारभार चालविण्यासाठी आवश्यक ती मुलभूत तत्वे आहेत. तरीही, या तत्वाची अमलबजावणी न झाल्यास न्यायालयाकडून सरकारला जाब विचारता येणार नाही. सरकारने नवीन कायदे बनवताना या तत्वाकडे लक्ष दिले पाहिजे.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

**स्वतंत्र आणि केंद्रीकृत न्यायव्यवस्था:** आपली न्याय व्यवस्था स्वतंत्र आणि केंद्रीय आहे. लोकांच्या हक्काचे रक्षण करण्यासाठी न्यायलयाना धाडसी निर्णय देण्याचा अधिकार आहे. न्यायव्यवस्थेच्या कामकाजात हस्तक्षेप करण्याचा अधिकार कायदेमंडळाला किंवा कार्यकारी मंडळाला नाही. सर्वोच्च न्यायालय हे देशातील महत्वाचे न्यायालय आहे आणि सर्व उच्च न्यायालये आणि खालच्या दर्जाची (subcordinate) न्यायालये त्यांच्या अंतर्गत कार्यरत आहेत.

**एकेरी नागरिकत्व:** संकुचित विचार सरणीच्या प्रांतिवादाला आळा घालण्यासाठी आणि राष्ट्रवादाला चालना देण्यासाठी संविधानाने (घटनेने) एकेरी नागरिकत्वाची तरतूद केली आहे. या देशातील नागरिकांना त्यांचे जन्मस्थान किंवा निवासस्थान कुठेही असले तरी समान अधिकार आहेत. या संदर्भात नियम तयार करण्याचा अधिकार विधिमंडळाला आहे.

**सार्वत्रिक प्रौढ मतदान पध्दत:** 18 वर्षापेक्षा जास्त वयाचे सर्व नागरिक मतदानाचा हक्क बजाऊ शकतात. हे लोकांच्या सार्वभौमत्वाचे प्रतिक आहे.

**द्विसदन कायदेमंडळ:** भारतीय-कायदे मंडळाला संसद म्हणतात संसदेत दोन सभागृहे असतात कनिष्ठ सभागृह (लोकसभा) आणि विरिष्ठ सभागृह (राज्यसभा)

**पक्ष पद्धती:** राजकिय पक्ष हे लोकशाहीचे अधारस्तंभ आहेत. भारतात बहुपक्षीय व्यवस्था आहे. सार्वत्रिक निवडनुकीत जो पक्ष बहुमताने विजयी होतो तो सताधारी पक्ष बनतो तर बाकीचे विरोधी पक्ष असतात.

**मुलभूत हक्क:** मुलभूत हक्क नागरिकांच्या व्यक्तिमत्त्वाच्या विकासासाठी आवश्यक आहेत सामाजिक आणि राजकिय वातावरण प्रदान करतात. एखाद्या व्यक्तिला समाजात सुसंस्कृत जीवन जगण्यासाठी ते आवश्यक असतात. लोकशाहीच्या यशासाठी ते आवश्यक आहेत. आपल्या राज्यघटनेच्या तिसऱ्या भागात 7 मुलभूत हक्काचा उल्लेख करण्यात आला आहे. मात्र 1978 मध्ये 44 व्या घटना दुरुस्ती नंतर सध्या मालमतेचा अधिकार कलम 300 'अ', अंतर्गत नागरी हक्क आहेत. सध्या 6 मुलभूत हक्क आहेत.

NOT TO BE REPUBLISHED @ITES




©KTBS NOT TO BE REPUBLISHED

*तुम्हाला हे माहित आहे का ?*

- *1895 मध्ये राष्ट्रीय काँग्रेसने हक्काच्या अमलबजावणीसाठी आग्रह धरला.*
- *1895 साली बाळगंगाधर टिळकांनी त्याच्यां स्वराज्य विधेयकात लोकांना हक्क मागीतले होते.*
- *1925 डॉ. ॲनिबेझंट यानी कॉमणवेल्थ ऑंफ इंडिया राष्ट्रकूल बिल घोषित केले की वैया क्तिक स्वातंत्र्य वक्तृत्व स्वातंत्र्य, व्यक्ति स्वातंत्र्य आणि कायद्यापूढे समानता खूप महत्वाची आहे.*
- *1946 च्या मंत्रीमंडळ समितीने या मुलभूत हक्काना पाठिंबा दिला. संविधानाच्या कलम 300 'A' नुसार संपतीचा अधिकार हा आता वैधानिक अधिकार आहे.*

**समानतेचा हक्क:** हा हक्क लोकशाहीच्या यशासाठी आवश्यक आहे आणि समानतेची कल्पना ही कायदेशीर, सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या केली जाते. कायद्यापुढे सर्व समान आहेत, कोणीही कायद्याच्या वर नाही. प्रत्योकाने  कायद्याचे पालन केले पाहिजे. जात,

धर्म, लिंग, जन्मस्थान यावरून कोणताही भेदभाव होता कामा नये. सार्वजनिक ठिकाणे, दुकाने, हॉटेल, मनोरंजनाची ठिकाणे, मंदिरे इत्याादी ठिकाणी कोणालाही प्रवेश नाकारला जाऊ नये. प्रत्योकाला सरकारी नोकरीत सामील होण्याची समान संधी आहे. अस्पृश्यता मानली जाऊ नये.

**स्वातंत्र्याचा हक्क:** मूलभूत हक्कांमध्ये स्वातंत्र्याच्या हक्काला महत्त्वाचे स्थान आहे. या हक्कांतर्गत संपूर्ण भारतात भाषण आणि अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य, शस्त्राशिवाय शांततापूर्ण संमेलन, सहवासाचे स्वातंत्र्य, चळवळीचे, राहण्याचे आणि कोणत्याही व्यवसायाचे स्वातंत्र्य देण्यात आले आहे. एखाद्या व्यक्तीला विनाकारण अटक केली जाऊ शकत नाही आणि त्याचे जीवन किंवा स्वातंत्र्य हिरावून घेतले जाऊ शकत नाही, हा नागरिकांचा संरक्षणात्मक हक्क आहे.

**शोषणाविरुद्धचा हक्क :** हा हक्क कोणत्याही नागरिकाच्या कोणत्याही प्रकारच्या शोषणाविरुद्ध घटनात्मक संरक्षण प्रदान करतो. महिला, मुले, गरीब आणि दुर्बल घटकातील लोकांचे शोषणापासून संरक्षण करणे हा या अधिकाराचा मुख्य उद्देश आहे. या हक्कांतर्गत सक्तीचे काम करण्यास मनाई आहे. या अधिकारानुसार, 14 वर्षांखालील मुलांना कारखाने, खाणी किंवा धोकादायक कामात काम करता येत नाही.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

**हे तुम्हाला माहित असू द्या:**

- *शोषण थाबविण्यासाठी केंद्र सरकारने अनेक कायदे लागू केले आहेत.*
- *किमान वेतन कायदा 1948,*
- *अनैतिक व्यवहार कायदा 1956*
- *हुडांविरोधी कायदा 1961,*
- *गुलामगिरी निर्मुलन कायदा 1976*
- *सतिप्रतिबंधक कायदा 1987,*
- *मानवी हक्क संरक्षण कायदा 1993*
- *कौटुंबीक हिसांचार कायदा 2005*

**धर्म स्वातंत्र्याचा हक्क:** भारत हा एक धर्मनिरपेक्ष देश असल्याने कोणत्याही धर्माला राष्ट्रीय दर्जा दिला गेला नाही. नागरिक स्वेच्छेने कोणत्याही धर्माचा स्विकार करू शकतात. तसेच आचरण व प्रसार करू शकतात. व्यवस्थापनासाठी कोणावरही

कर देणगी देण्यासाठी सक्ती करता येणार नाही धार्मिक संस्थाचे, धार्मिक स्थळांचा राजकिय आणि इतर कामासाठी वापर करण्यासाठी बंदी घालण्यात आली आहे.

**सांस्कृतिक आणि शैक्षणिक हक्क:** देशात राहणाऱ्या नागरिकांना त्यांची स्वतःची वेगळी भाषा, लिपी किंवा संस्कृती विकसित करण्याचा आणि जतन करण्याचा अधिकार आहे. केवळ धर्म, वंश, जात किंवा भाषेच्या आधारावर कोणत्याही नागरिकाला राज्याद्वारे चालवल्या जाणाऱ्या किंवा वित्तपुरवठा केलेल्या कोणत्याही शैक्षणिक संस्थेत प्रवेश नाकारला जाणार नाही. सर्व धार्मिक आणि भाषिक अल्पसंख्याकांना त्यांच्या स्वतःच्या शैक्षणिक संस्था स्थापन करण्याचा आणि त्यांचे प्रशासन करण्याचा अधिकार आहे. धार्मिक आणि भाषिक अल्पसंख्याकांच्या हिताचे रक्षण करण्याच्या उद्देशाने या अधिकाराचा संविधानात समावेश करण्यात आला आहे.

***हे तुम्हाला माहिती आहे का:***

***राज्यघटनेच्या*** *86 व्या दुरुस्तीद्वारे कलम 21'A' अंतर्गत शिक्षणाचा हक्क दिला गेला या अधिकारातर्गत राज्याने 6 ते 14 वयोगटातील सर्व मुलाना सक्तीचे आणि मोफत शिक्षण दिले पाहीजे 2009 मध्ये शिक्षण हक्क कायदा (RTE): कर्नाटकाने अंमलात आणला. (RTE-The Right of Children to free & compulsory Education Act - 2009)*

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

**घटनात्मक उपायाचा हक्क:** घटनेने भारतातील नागरिकांना फक्त मूलभूत हक्क दिले नाहित, तर कलम 32 अंतर्गत त्यांची हमी देखील दिली आहे. जेव्हा एखादी व्यक्ति किवा राज्य सरकार किंवा केंद्रसरकार या अधिकाराचे उल्लंघन करतात तेव्हा नागरिक आपल्या संरक्षणासाठी सर्वोच्च न्यायालयात तसेच उच्च न्यायालयात जाऊ शकतात म्हणून डॉ बी. आर आंबेडकरानी या हक्काला घटनेचे 'हृदय किवा आत्मा' असे म्हटले आहे सर्वोच्च न्यायालयाला अमंलबजावणी करण्याचा हक्क आहे म्हणून त्याना मूलभूत हक्काचा रक्षणकर्ता असे म्हटले जाते.

**(a) कैद्याला न्यायालयासमोर हजर करण्याचा लेखी हुकुम (हेबियस कॉर्पस):** जेव्हा एखाद्या व्यक्तिला विनाकारण अटक केली जाते तेंव्हा ती व्यक्ती किंवा त्याच्या वतीने अन्य कुणीही व्यक्ती त्याच्या सुटकेसाठी लेखी विनंती अर्ज दाखल

करू शकते अटक झालेल्या व्यक्तीला 24 तासाच्या आत न्यायालयासमोर हजर करावे लागते (हा विनंती अर्ज फौजदारी दाव्यासंदर्भात लागू होत नाही)

(b) **परमआदेश:** जेव्हा एखादा अधिकारी त्यााचा अधिकार वापरण्यास नकार देतो किंवा जेव्हा उच्च न्यायालय किंवा सर्वोच्च न्यायालय त्याांच्यावर सोपविलेली सार्वजनिक कर्तव्ये पार पाडण्यास नकार देते आणि कोणतेही अधीनस्थ न्यायालय आपले कर्तव्य बजावण्यास नकार देते तेव्हा उच्च न्यायालय किंवा सर्वोच्च न्यायालयास संबंधितांना त्याांचे कर्तव्य बजावण्याचे आदेश देण्याचा अधिकार आहे.

(c) **प्रतिबंधन- हा सर्वोच्च:** न्यायालयाचा लेखी आदेश आहे. जो अधीनस्थ न्यायालयांना त्याांच्या अधिकारक्षेत्राबाहेरील खटला चालवण्यास किंवा त्याावर निर्णय देण्यास प्रतिबंधित करतो.

(d) **प्रमाणपत्र (certiorari):** या रिट याचिकेनुसार स्वत: गौण न्यायालये हे सर्वोच्च न्यायालयाने अधिनस्त न्यायालयांना अधिकारक्षेत्रापेक्षा जास्त निकाल रद्द करण्यासाठी आणि संबंधित प्रकरण संबंधित उच्च न्यायालयात हस्तांतरित करण्यासाठी जारी केलेले प्रमाणपत्र आहे.

(e) **सह-वॉरंट:** जर पात्र नसलेल्या व्यक्तीने बेकायदेशीरपणे सरकारी पद धारण केले असेल तर अशा व्यक्तींविरुद्ध सर्वोच्च न्यायालयाने जारी केलेल्या रिट याचिकेला सह-वॉरंट असे म्हणतात.

**जनहित याचिका (PIL-Public interest litigation):** नागरिकांच्या नाकारलेल्या नागरी हक्कांचे संरक्षण करण्यासाठी आणि सार्वजनिक हिताचे रक्षण करण्यासाठी जनहित याचिका दाखल केल्या जाऊ शकतात. कायदेशीर हक्कांचे संरक्षण करण्याच्या उद्देशाने जनहित याचिका दाखल केली जाऊ शकते, जीवनाचे रक्षण करण्यासाठी आणि पर्यावरण प्रदुषण होल्यापासून संरक्षण करण्यासाठी हक्क आवश्यक आहे. या जनहित याचिका व्याक्ती किंवा सामाजिक संस्था केवळ सर्वोच्च आणि उच्च न्यायालयात दाखल केल्या जाऊ शकतात, अलिकडच्या वर्षात आम्ही पाहतो की न्यायालय स्वताहून प्रसार माध्यमांतून प्रसिद्ध झाला माहितीच्या आधारे अशा जनहित याचिका दाखल करत आहे.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**मुलभूत कर्तव्ये:** हक्क आणि कर्तव्ये या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत कर्तव्या शिवाय हक्काना अधिकाराना कोणतेही मुल्य किंवा महत्व नाही 1976 मध्ये घटनेच्या 42 व्या दुरुस्तीनूसार 4 'अ' भागात कलम 51 'अ' मध्ये 10 मुलभूत कर्तव्याचा समावेश केलेला होता. 2002 साली 86 व्या दुरूस्तीनूसार आता 11 मुलभूत कर्तव्य आहेत. ती खालील प्रमाणे

1. राष्ट्रध्वज, राष्ट्रगीत व राज्यघटनेचा आदर करणे.
2. स्वातंत्र्य प्राप्तीसाठी राष्ट्रीय चळवळीला प्रेरणा देणाऱ्या आदर्शाचे पालन करणे.
3. भारताची अखंडता जपणे.
4. मातृभूमीचे रक्षण करणे.
5. भारतीयामध्ये बंधूभाव व निष्ठा वाढीस लावणे.
6. आपला अमूल्य वारसा जतन करणे.
7. नैसर्गिक पर्यावरणाचे रक्षण करुण वृध्दींगत करणे.
8. वैज्ञानिक दृष्टीकोन व चौकस बुद्धीचा विकास करणे.
9. सार्वजनिक मालमतेचे रक्षण करणे.
10. वैयक्तिक व सामूहिक सर्वांगिण विकासासाठी प्रयत्न करणे.
11. 6 ते 14 वयोगटातील मुलांना पालकानी शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे.

**उपक्रम:**

*राज्यातील मानवी हक्क आयोगाबद्दल माहिती संग्रहीत करा मानवी हक्काचे उल्लघंन केल्यानंतर या आयोगाने केलेल्या कारवाई सदर्भात प्रसारमाध्यमातून माहिती मिळवा.*

मुलभूत हक्काप्रमाणे कर्तव्याना न्यायालयकडून कायद्याचे संरक्षण नाही परंतू जे आपल्या कर्तव्यात कसूर करतात त्यांना कायद्याने शिक्षा होवू शकते.

**राज्याच्या धोरणांची अधिकृत तत्वे:** समाजहितकारी राज्यव्यवस्थापनेच्या हेतूने घटनेमध्ये. राज्यांच्या काही अधिकृत तत्वांचा व धोरणांचा समावेश करण्यात आला आहे. ही तत्वे आयर्लंडच्या घटनेतून घेतली गेली होती. ही तत्वे केंद्र राज्य सरकारला दिशा दाखविण्याचे काम करतात. याव्दारे सरकार आपल्या नागरिकांना आर्थिक, सामाजिक

**चर्चा करा:**

*भारताचे नागरिक म्हणून आपण जसे आपले मुलभूत हक्क उपभोगतो त्याप्रमाणे आपली मुलभूत कर्तव्ये देखील पार पाडली पाहिजेत.*

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

व राजकिय न्याव देवू शकते. परंतू ही तत्वे नितीमत्तेवर आधारित असल्याने जर केंद्र व राज्यात त्याची अमलबजावणी झाली नाही तर, न्यायालय त्याना कायदेशीरपणे जाब विचारू शकत नाही ही तत्वे समाजवादी व उदारमतवादी असून गांधीजीच्या आदर्शावर आधारित आहेत ती मार्गदर्शक तत्वे पुढील प्रमाणे.

1. सर्व नागरिकांना पुरेशी उदरनिर्वाहाची साधने उपलब्ध करुण देणे.
2. सार्वजनिक संपत्ती आणि उत्पादन साधने कांही ठराविक लोकांची वैयक्तीक मालमता बनण्यापासून रोखणे.
3. स्त्री-पुरुषाना समान कामासाठी समान मोबदला देणे आणि कामगारांचे स्वास्थ जपणे.
4. वृद्ध, रोगी, दुर्बल व असाह्य घटकाना राष्ट्रीय मदत पुरविणे.
5. देशामध्ये सर्वत्र समान नागरी नियमांचा अवलंब करणे.
6. 6 वर्षाखालील सर्व मुलाना आरोग्य विकासाची व पूर्व - शालेय विकासाची संधी उपलब्ध करून देणे.
7. ऐतिहासिक स्मारकाचे रक्षण करुन ऐतिहासीक वारसा जपणे.
8. कार्यकारी मंडळ व न्यायव्यवस्था वेगळी करणे.
9. आतंरराष्ट्रीय शांतता जपणे व आंतरराष्ट्रीय कायद्याचा आदर करणे.
10. ग्रामपंचायतीची स्थापना करणे.
11. ग्रामीण व कुटिरोद्योगांना प्रोत्साहन देणे.
12. आधुनिक पद्धतीने कृषिविकास व पशुसंवर्धनाचे व्यवसाय करणे.
13. दारुबंदीची हमी देणे.
14. शास्त्रीय पद्धतीने कृषिविकास करण्याची हमी देणे.

राज्याच्या धोरणाबाबतची ही अधिकृत तत्वे अत्यंत महत्वाची असून समाजहित साधणे हे त्यांचे मुख्य ध्येय आहे. मुलभूत हक्क हे व्यक्ती संबंधीत असतात. राज्याच्या

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

धोरणाची अधिकृत तत्वे ही संपूर्ण समाजाशी संबधीत असतात. केंद्र व राज्यसरकार ही सर्व तत्वे अंमलात आनण्याचा प्रयत्न करतात. ही तत्वे भारताच्या संर्वागिन विकासाची दिशादर्शक आहेत.

## स्वाध्याय

**I. गाळलेल्या जागी योग्य शब्द भरा:**

1. राज्याचा कारभार चालविणारा कायदा ______________ हा होय.
2. संविधान रचना सभेची पहिली सभा ______________ रोजी झाली.
3. ______________ हे घटनेच्या मसूदा समितीचे अध्यक्ष होते.
4. आपल्या घटनेने ______________ सरकार पद्धतीचा अवलंब केला आहे.
5. आपल्या घटनेने आपल्या नागरिकांसाठी ______________ नागरीकत्वाची तरतूद केली आहे.
6. घटनात्मक उपायाचा अधिकार कलम ______________ अन्वये समाविष्ठ करण्यात आला आहे.
7. राज्याच्या धोरणाची अधिकृत तत्वे ______________ देशाच्या घटनेतून घेतली आहेत.

**II. खालिल प्रश्नांची उत्तरे लिहा:**

8. संविधान रचना सभेचे अध्यक्ष कोण होते?
9. आपली घटना केव्हा अमलात आली?
10. भारतीय घटनेची मुख्य वैशिष्टये कोणती?
11. घटनेच्या प्रस्तावनेत कोणत्या गोष्टीचा समावेश केलेला आहे.
12. धर्मनिरपेक्षता म्हणजे काय?

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

13. आपल्या घटनेत समाविष्ट केलले मुलभूत हक्क कोणते?

14. मूलभूत कर्तव्य लिहा?

15. राज्याच्या धोरणाची अधिकृत तत्वे कोणती?

**III. उपक्रम:**

1. कायदे मंडळाचे सदस्य असणाऱ्या ख्यातनाम नेत्याची माहिती गोळा करा
2. आपण उपभोगत असलेल्या मूलभूत हक्कांची यादी करा
3. आपल्या मूलभूत कर्तव्याची यादी तयार करा.
4. आपल्या देशात समान कायदा लागू करण्यात कोणते आडथळे येतात याची चर्चा करा.

**IV. प्रकल्प:**

1. तुमच्या शिक्षकांची मदत घेऊन ''मुलभूत हक्क व कर्तेव्य या विषयावर एक निबंध लिहा.

***

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

## प्रकरण - 6

# केंद्र सरकार

A1L8P1

**या पाठाच्या अभ्यासाने तुम्ही खालील गोष्टी जाणून घ्याल**

- *राज्यसभा आणि, लोकसभा, त्यांची रचना, सदस्यत्व, पात्रता आणि केंद्रीय कायदे मंडळाची कार्ये.*
- *राष्ट्रपतीची नियुक्ती, राष्ट्रपती पदासाठी लागणारी पात्रता आणि कार्य.*
- *पंतप्रधान मंत्रीमंडळ आधिकार आणि कार्य.*

मागील पाठामध्ये आपण शिकलो आहोत की, भारत एक सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष लोकशाही म्हणजेच प्रजासत्ताक गणतंत्र आहे इंग्लड व फ्रान्समध्ये एकत्र सरकार पध्दती आहे. भारतात अमेरिकेप्रमाणे संयुक्त सरकार व्यवस्था आहे. म्हणजेच केंद्रात केंद्रसरकार व राज्यात राज्यसरकार आहे. भारत हे संघराज्य आहे. भारत सरकारचे अधिकार केंद्र व राज्यसरकारमध्ये विभागले आहेत. केंद्रसरकारला राष्ट्राची एकता आणि सुरक्षितता राखण्याचे सर्वाधिकार दिलेले आहेत. हे अधिकार कायदे मंडळ. कार्यकारी मंडळ आणि न्याय मंडळ यांच्यामार्फत आमंलात आणले जातात.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED



**केंद्रीय कायदे मंडळ:** भारताने संसदीय सरकार पध्दत अवलंबिलेली आहे. केंद्रीय कायदे मंडळाला संसद असे म्हणतात. घटनेच्या कलम 79 नुसार संसदेची स्थापना केली जाते. संसदेत दोन गृहे असतात. वरिष्ठगृहाला राज्यसभा आणि कनिष्ठगृहाला लोकसभा असे म्हणतात.

**राज्यसभा:**

राज्यसभेमध्ये 250 सदस्य असून त्यापैकी 238 सदस्य विधानसभा व केंद्रशासीत प्रदेशातील सदस्यांकडून निवडले जातात. तर उर्वरित 12 सदस्य जे वेगवेगळ्या क्षेत्रातील उदा. साहित्य, कला, विज्ञान, समाजसेवा इत्यादी. क्षेत्रात उल्लेखनीय काम केलेल्या श्रेष्ठ व्यक्ती असतात. त्याची निवड राष्ट्रपती करतात. या गृहाला वरिष्ठ गृह असे म्हणतात.

**अधिकाराचा कालावधी:** राज्यसभा हे कायमचे सभागृह असून ते लोकसभेप्रमाणे विसर्जीत केले जात नाही, परंतु राज्यसभा सदस्याचा कालावधी 6 वर्षाचा असतो. दोन वर्षातून एकदा एकूण सभासदांच्या $\frac{1}{3}$ (एक तृतीयांश) सदस्य निवृत्त होतात. त्यांच्या जागा पुन्हा निवडणुकीद्वारे भरल्या जातात. जर सदस्यांना सदस्यत्व रद्द करावयाचे असेल तर ते राजीनामा देवू शकतात.

**राज्यसभा सदस्यासाठी आवश्यक पात्रता**

1. भारताचा नागरिक असावा.
2. 30 वर्षापेक्षा कमी वय नसावे.
3. कोणत्याही कायद्याअंर्तगत शिक्षा झालेली नसावी.
4. कायद्याने मानसिकदृष्ट्या (मनोविकृत नसावा) सक्षम घोषित केलेला असावा.
5. संसदेने वेळोवेळी नमूद केलेले विशिष्ट गुणवत्तेस पात्र असावा.
6. लाभदायक पदावर असू नये
7. दिवाळखोर नसावा

**उपराष्ट्रपती:** राज्यसभेचा अध्यक्ष असतो. सदस्यामधूनच उपराष्ट्रपतींची निवड केली जाते. कमीत कमी $\frac{1}{10}$ सदस्य (किमान 25) राज्यसभेच्या कामकाजाला उपस्थित असावे, वर्षातून किमान दोन वेळा सभागृहाची सभा होणे आवश्यक आहे. सदस्य विशेष सभेची विनंती करू शकतात.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

*2020 पूर्वी लोकसभेच्या एकूण सदस्यांची संख्या 545 होती, 543 सदस्य सार्वत्रिक प्रौढ मतदान पध्दतीने निवडले जातात. राष्ट्रपती अँग्लो-इंडियन समुदायातील दोन सदस्यांची लोकसभेवर निवड करतात. परंतु 2020 च्या 104 व्या घटना दुरुस्ती कायद्याव्दारे सदस्य नामनिर्देशित करण्याची प्रथा अँग्लो-इंडियन सदस्य निवड रद्द केली आहे. त्यामुळे सध्या लोकसभा सदस्यांची एकूण संख्या 543 आहे.*

**लोकसभा:** लोकसभेच्या सदस्यांची निवड थेट लोकांनी निवडून दिलेले असतात. म्हणून या गृहाला प्रतिनिधींचे गृह म्हणून ओळखले जाते. लोकसभेत 543 सभासद असतात. 543 सदस्य सार्वत्रिक निवडणूक पध्दतीने निवडले जातात. 84 जागा अनुसुचित जाती व 47 जागा अनुसुचित जमातीसाठी राखीव असतात.

106 वी घटना दुरुस्ती विधेयक कायदा (नारीशक्ती वंदन अधिनियम) लागु झाल्यानंतर लोकसभेच्या एकूण सदस्य पैकी 33% जागा महिलासाठी आहेत.

**अधिकाराचा कालावधी:** लोकसभेचे सदस्य 5 वर्षाकरिता निवडले जातात, पंतप्रधानाच्या शिफारसीनुसार राष्ट्रपती लोकसभा विसर्जित करू शकतात.

**लोकसभा सदस्यासाठी आवश्यक पात्रता:**

1. तो भारताचा नागरिक असावा.
2. किमान वय 25 वर्षे असावे.
3. सरकारी नोकर नसावा.
4. मानसिक दृष्टया सक्षम असावा.
5. कोणत्याही कायद्याअंतर्गत शिक्षा झालेली नसावी.
6. संसदेने वेळोवेळी नमूद केलेल्या विशिष्ट गुणवत्तेस पात्र असावा.
7. लाभदायक पदावर असू नये.

**उपक्रम**

*शाळेमध्ये संसदेची: स्थापना करून मंत्री, सभापती, विरोधी पक्षनेते म्हणून कार्य विभागूण द्या.*

**लोकसभेचा सभापती:** लोकसभेच्या सदस्यामधूनच सभापती व उपसभापती निवडण्याची सुविधा आहे. सभापतीला लोकसभेचे कामकाज नि:पक्षपातीपणे पार पाडावे लागते. तसेच सभागृहाची प्रतिष्ठा व योग्यवर्तन सांभाळावे लागते. जेव्हा एखाद्या मसुद्याला (बील) समान मते मिळतात, तेव्हा निर्णायक मत देण्याचा अधिकार सभापतीना असतो. सभापतींच्या अनुपस्थितीत उपसभापती सभागृहाचे कामकाज पाहतात.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**विरोधी पक्ष:** संबंधित सभागृह (लोकसभा किंवा राज्यसभा) एकूण सदस्यसंख्येच्या 10% सदस्य असलेल्या राजकीय पक्षाला विरोधी पक्ष म्हणतात.

**विरोधी पक्ष नेत्याची भूमिका व कार्य:**

- सत्ताधारी पक्षाच्या चूका निर्दषणास आणून देणे.
- सरकारी धोरणाचा सखोल अभ्यास करणे.
- सरकार, मंत्रीमंडळ व सरकारी अधिकाऱ्यांना जागृत ठेवणे.
- कायदे मंडळाची प्रतिष्ठा राखणे,

***उपक्रम:*** *दूरदर्शनवर संसदेत चाललेल्या कार्याचे थेट प्रक्षेपण पहा. आणि पुढील मुद्यावर माहिती लिहा.*

*1. सभापतींची भूमिका.*
*2. विरोधी पक्षाची भूमिका.*
*3. सत्ताधारि पक्षाच्या नेत्याची भूमिका.*

**संसदेचे अधिकार आणि कार्ये:**

**कायदे मंडळ (Legislative)**: कायदे बनविणे हे संसदेचे मुख्य कार्य आहे. केंद्रीय सुचीतील विषयाचे कायदे संसद बनवू शकते. आर्थिक मसूदा (बील) फक्त लोकसभेत मांडला जातो. तर इतर सामान्य मसूदे दोन्हींपैकी कोणत्याही गृहात मांडले जातात. योग्य चर्चा आणि दोन्ही गृहाकडून मंजूरी मिळाल्यानंतरच कोणत्याही मसुद्याचे कायद्यात रूपांतर होते. एखाद्या मसूद्याला समान मते मिळाली तर सभापती आपल्या मताद्वारे मंजूर किंवा नामंजूर करू शकतात. काही मसूद्याविषयी मतभेद झाल्यास दोन्ही गृहाचे एकत्र अधिवेशन बोलावून त्याबद्दल निर्णय घेतला जातो. दोन्हीगृहाच्या संमतीनंतरच तो मसुदा राष्ट्रपतीकडे मंजूरीसाठी पाठविला जातो. राष्ट्रपतींच्या मंजूरीनंतरच मसुद्याचे कायद्यात रूपांतर होते.

**प्रशासकीय अधिकार:** सरकारच्या संसदीय प्रशासनात पंतप्रधान आणि त्यांचे मंत्री मंडळ, कार्यकारी मंडळाची स्थापना करतात. केंद्रीय मंत्रीमंडळ हे पूर्णपणे संसदेला जबाबदार असते. संसदेच्या सदस्याने विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देणे हे मंत्र्यांना बंधनकारक असते, जो पर्यंत संसदेचा विश्वास असतो तोपर्यंतच मंत्रीमंडळ कार्यरत राहू शकते.

**आर्थिक अधिकार:** देशाच्या आर्थिक बाबीवर लोकसभेचा संपूर्ण ताबा असतो. लोकसभेच्या परवानगीशिवाय सरकार कोणताही कर लादू शकत नाही. तसेच कोणत्याही प्रकारचा खर्च करू शकत नाही. आर्थिक मसूदा प्रथम लोकसभेत मांडावा लागतो, लोकसभेत चर्चा करून मंजुरी मिळाल्यानंतर तो मसूदा राज्यसभेकडे पाठविला

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

जातो. त्या मसूद्याविषयी सूचना व मार्गदर्शन करण्यास राज्यसभेला 14 दिवसांची मुदत असते, जर त्यावेळेत राज्यसभेने निर्णय दिला नाही तर त्याला मंजुरी दिली आहे असे गृहीत धरून तो मसूदा राष्ट्रपतीकडे मंजुरीसाठी पाठविला जातो.

**न्यायालयीन अधिकार:** राष्ट्रपती तसेच उच्च व सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश जर गैरवर्तनूक करताना आढळले तर त्यांना काढून टाकण्याचा अधिकार संसदेच्या सभागृहाला असतो, कायदे मंडळातील अहवालाबाबत चर्चा करण्याचे अधिकार दोन्ही सभागृहाना असतात.

**घटना दुरुस्तीचे अधिकार:** भारतीय राज्यघटनेच्या कलम 368 नुसार घटनेची दुरुस्ती करण्याचा अधिकार संसदेला आहे. दोन्ही सभागृहाना घटना दुरुस्तीचे समान अधिकार असतात. घटना दुरुस्तीचा मसुदा अगोदर दोन्हीपैकी कोणत्याही एका सभागृहात सादर करावा लागतो. परंतु दुरुस्तीसाठी दोन्ही सभागृहाची मंजुरी आवश्यक असते. परंतू एका सभागृहाने मंजुरी दिली नाही आणि दुसऱ्यांनी दिली तरीही घटनेत दुरुस्ती होवू शकत नाही. काही बाबतीत राज्य कायदेमंडळाची मंजूरी घेणे ही आवश्यक असते.

**इतर अधिकार:**

1. उच्च आणि सर्वोच्च न्यायालयाच्या अधिकारा संबंधी कायदे तयार करणे.
2. दोन किंवा अधिक राज्यासाठी एका उच्च न्यायालयाची स्थापना करणे
3. नविन राज्यांची निर्मिती करणे, त्यांची नांवे बदलने, राज्याच्या सीमा ठरविणे.
4. केंद्रीय लोकसेवा आयोग, केंद्र वित्त आयोग, भारतीय निवडणूक आयोग, राष्ट्रीय मागास वर्गीय आयोग इ. समितीच्या अहवालाबाबत चर्चा करणे.
5. राष्ट्रीय, राज्य आणिबाणी, आर्थिक आणिबाणी इत्यादिनां मंजुरी देवून त्या घोषित करणे.



**नूतन संसद भवन**

*हे तुम्हाला माहिती आहे का:*

### *नूतन संसद भवन*

*आपले संसद भवन हे भारताच्या लोकशाही व्यवस्थेच्या जिवंतपणाचे प्रतिक आहे. भारताच्या जुन्या संसद भवनाचे उद्‌घाटन 1927 मध्ये झाले. देशाच्या स्वातंत्र्यापासुन ते 2023 पर्यंत सुमारे 75 वर्षाचा संसदीय कामकाजाचे साक्षिदार आहे.*

*भारतीय लोकशाही व्यवस्थेची मुळे जसजशी मजबूत होत गेली तसतशी संसदीय कामकाज आणि सदस्य संख्या वाढत गेली. या पार्श्वभूमीवर नवीन संसदेची आवश्यकता निर्माण झाली. नवीन संसद भवन केंद्रीय फिफ्तार योजनेचा एक भाग म्हणून बांधण्यात आले आणि 28 में 2023 रोजी उद्‌घाटन करण्यात आले. नवीन संसद भवनाची वैशिष्टये*

1. *चुक्न का संसद भवनाचे क्षेत्रफळ सुमारे 65000 चौ. पि. आहे.*
2. *यामध्ये 888 यासनाचे लोकपमा सभागृह भाणि 384 भावनांचे राज्यसभा सभागृह आहे*
3. *पर्यावरण पुरक आणि अपंगांसाठी अनुकूल इमारत आहे.*
4. *अत्याधुनिक सुविधांसह सभागृह आहे.*

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

### केंद्रीय कायदे मंडळ:

केंद्रीय कायदे मंडळाने तयार केलेले कायदे अमलात आणण्याचे काम कार्यकारी मंडळ करते. तसेच केंद्र सरकारचे विविध उपक्रम, कार्यक्रम, व धोरणे राबविण्याचे काम हे मंडळ करते. केंद्रीय कार्यकारी मंडळामध्ये राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, पंतप्रधान आणि त्यांचे मंत्रिमंडळ यांचा समावेश असतो. राष्ट्रपती हे कार्यकारी मंडळाचे नामधारी अध्यक्ष असून पंतप्रधान आणि त्यांचे मंत्रिमंडळ प्रत्यक्ष कायदे मंडळ तयार करतात.

### राष्ट्रपती

घटनेच्या 52 व्या कलमानुसार राष्ट्रपती हे पद निर्माण करण्यात आले आहे. राष्ट्रपती हे देशाचे प्रमुख, प्रथम नागरिक, कार्यकारी मंडळाचे प्रमुख, तिन्ही सैन्यदलाचे (आर्मी, नेव्ही आणि एअर फोर्स) सर्वोच्च प्रमुख असतात. राष्ट्रपती हे देशाचे सर्वोच पद असून ते देशाच्या सर्व कार्यकारी अधिकाराचे पालक असतात, राष्ट्रपतीने घेतलेल्या कोणत्याही निर्णयाबद्दल न्यायालय त्यांना विरोध करू शकत नाही व प्रश्न करू शकत नाही.

**राष्ट्रपतीची निवडः** घटनेच्या 54 व 55 व्या कलमानुसार राष्ट्रपतीची निवड केली जाते. राष्ट्रपतींची निवड ही लोकसभा, राज्यसभा तसेच दिल्ली, पाँडेचेरी आणि इतर राज्यांच्या राज्यविधी मंडळातील सदस्याद्वारे केली जाते. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधिश राष्ट्रपतीनां शपथ देतात. राष्ट्रपतीचा कार्यकाल पाच वर्षाचा असतो. आपला कालावधी संपल्यानंतर ते पुन्हा निवडणूक लढवू शकतात. जेव्हा राष्ट्रपती घटनेच्या विरोधात जातात तेंव्हा संसदेद्वारे महाभियोग ठरावाने त्यांना पदावरुन काढून टाकले जावू शकते.

***महाभियोगाचा ठरावः*** *'राष्ट्रपती हे संसदेचे मूलभूत घटक असून घटनेचे रक्षक असतात. घटनेचा अनादर होणार नाही याची हमी राष्ट्रपतीनी घ्यावी लागते. जर स्वतः राष्ट्रपतीकडून घटनाबाहय वर्तवणूक झाली असेल तर घटनेच्या 6 व्या कलम ानुसार त्यांना न्यायालयासमोर हजर केले जाऊ शकते. हा महाभियोग संसदेच्या कोणत्याही सभागृहात मांडला जावू शकतो, चर्चेपूर्वी चौदा (14) दिवस आधी पूर्वसूचना द्यावी लागते त्यासाठी* $\frac{1}{4}$ *सदस्याचा पाठींबा असावा लागतो.* $\frac{2}{3}$ *सदस्याचा पाठिंबा मिळाला तर राष्ट्रपतीना पदच्यूत केले जाऊ शकते. भारतात आतापर्यंत अशी घटना घडलेली नाही.*

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**राष्ट्रपती पदासाठी पात्रताः**

1. तो भारताचा नागरिक असावा.
2. वयाची 35 वर्षे पूर्ण झालेली असावी.
3. लोकसभेच्या उमेदवारासाठी आवश्यक असणारी गुणवत्ता असावी.
4. तो सरकारी नोकर नसावा.



**राष्ट्रपती भवन - नवी दिल्ली**

**राष्ट्रपतीचे अधिकार आणि कार्ये:**

**कार्यकारी अधिकार आणि कार्ये:** देशाचा संपूर्ण कारभार राष्ट्रपतींच्या नांवाने चालतो. राष्ट्रपती पंतप्रधानाची नेमणूक करतात, पंतप्रधानांच्या सल्ल्यानुसार इतर मंत्र्यांची नेमणूक करतात, उच्च अधिकाऱ्याची निवड करण्याचा अधिकार राष्ट्रपतीना असतो. उदा. ऑडिटर जनरल, कंट्रोलर अटर्नीजनरल (CAG-Controller and Auditor General), उच्च व सर्वोच्च न्यायालयांचे न्यायाधीश, राज्यपाल, अर्थसमितीचे सदस्य व अध्यक्ष, केंद्रीय लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष व सदस्य निवडणूक आयोगाचे अध्यक्ष, तिन्ही सेनादलाचे प्रमुख अधिकारी, विविध देशाचे राजदूत इत्यादी. या सर्व अधिकाऱ्यांना काढून टाकण्याचेही अधिकार राष्ट्रपतीना असतात.

**कायदे विषयक अधिकार आणि कार्ये:** संसदेचे अधिवेशन भरविण्याचे तसेच पुढे ढकलण्याचे अधिकार राष्ट्रपतीना असतात. दोन्ही सभागृहांचे एकत्र अधिवेशन भरवून त्यांना संबोधित करून लोकसभा विसर्जीत करू शकतात. दोन्ही सभागृहामध्ये मंजूर झालेल्या ठरावाचे राष्ट्रपतीच्या मंजूरीनंतर कायद्यात रूपांतर होते.

या ठरावांवर (बील) राष्ट्रपती पूर्नः विचार करु शकतात. चर्चेसाठी परत पाठवू शकतात. काही काळापर्यंत रोखू शकतात. 2020 पूर्वी राष्ट्रपतींना दोन अँग्लो-इंडियन सदस्याना लोकसभेकरीता नेमणूक करायाचा अधिकार होता. परंतू 2020 मध्ये 104 च्या घटना दुरूस्ती कायद्याने ही नावे सुचवण्याचे रद्द केले आहे. राष्ट्रपतीना 12 सदस्य राज्यसभेवर थेट निवडण्याचा अधिकार आहे. हे सदस्य, कला, विज्ञान, साहित्य आणि सामाजिक क्षेत्रात विशिष्ट सेवा बजावलेली असते.

**न्यायालयीन अधिकार आणि कार्ये:** सर्वोच्च न्यायालयाने, उच्च न्यायालयाने आणि लष्करी न्यायालयाने केलेली एखाद्या गुन्हेगाराची शिक्षा कमी करण्याचा किंवा त्याला क्षमा करण्याचा अधिकार राष्ट्रपतीना असतो. देशाच्या कायदेविषयक बाबतीत सल्ला देण्यासाठी राष्ट्रपती सर्वोच्च न्यायालयाची मदत घेवू शकतात.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

# आपले राष्ट्रपती


डॉ. राजेद्रं प्रसाद
1950-1962


डॉ.एस.राधाकृष्ण
1962-1967


डॉ. झाकीर हुसेन
1967-1969


डॉ.व्ही.व्ही.गिरी
1969-1974


डॉ. फकृद्दीन अली अहमद
1974-1977


डॉ. निलम संजीव रेड्डी
1977-1982


डॉ. ग्यानी झैलसिंग
1982-1987


डॉ. आर. वेंकटरमण
1987-1992


डॉ. शंकरदयाल शर्मा
1992-1997


डॉ.के.आर. नारायण
1997-2002


डॉ.ए.पी.जे.अब्दल कलाम
2002-2007


श्रीमती प्रतिभा पाटील
2007-2012


डॉ. प्रणव मुखर्जी
2012-2017


डॉ.रामनाथ कोविंद
2017-2022


श्रीमती द्रौपदी मुर्मू
2022-

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

**आर्थिक अधिकार आणि कार्ये:** राष्ट्रपतींची अनुमती मिळाल्यानंतरच आर्थिक मसूदा लोकसभेत मांडण्यात येतो. वित्त आयोग, कंट्रोलर आणि ऑडिटर जनरल यांच्याशी संसदेत चर्चा झाल्यानंतर मिळालेल्या अहवालानुसार राष्ट्रपती अनुमती देतात. एकत्रित निधी राष्ट्रपतींच्या नावावर असतो. यानिधितून सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश, लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष आणि सदस्य यांचे वेतन दिले जाते.

**लष्करी अधिकार आणि कार्ये:** राष्ट्रपती तिन्ही सेना दलाचे सर्वोच्य प्रमुख असतात. राष्ट्रपती तिन्ही सेनादलाच्या प्रमुख अधिकायांची निवड केंद्रीय कॅबिनेट मंत्र्यांच्या सल्यानुसार करतात. संसदेच्या शिफारसीनुसार युद्ध किंवा शांतता घोषित करतात.

**आणिबाणीचे अधिकार आणि कार्ये:** आपल्या घटनेच्या 18 व्या कलमानुसार संसदेच्या लेखी सहमतीने राष्ट्रपती देशात तीन प्रकारच्या आणिबाणी जाहिर करू शकतात.

1. कलम 352 नुसार राष्ट्रीय आणिबाणी.
2. कलम 356 नुसार राज्य आणिबाणी.
3. कलम 360 नुसार आर्थिक आणिबाणी.

***तुम्हाला माहिती आहे का?***

*1. राष्ट्रीय आणिबाणी (कलम 352) देशातील काही भागात किंवा संपूर्ण देशा बाहेरील किंवा आंतरिक संकट आल्यास देशाच्या सुरक्षितेला धोका निर्माण झाल्यास या प्रकारची आणिबाणी जाहिर केली जाऊ शकते. 1962, 1971, 1975.*

*2. राज्य आणिबाणी (कलम 356) राज्याच्या राज्यपालाच्या अहवालानुसार किंवा राज्यसरकार काही कारणास्तव घटनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार कार्य करू शकत नसेल तर राष्ट्रपती या प्रकारची आणिबाणी घोषित करतात. उदा: 20/01/2008, 29/05/2008/पर्यंत कर्नाटकात राज्यआणिबाणी घोषित केली गेली. राष्ट्रीय राज्य आणिबाणी घोषित केल्यानंतर 6 महिण्याच्या आत निवडणूका घ्याव्या लागतात.*

*3. आर्थिक आणिबाणी (कलम-360) देशाची आर्थिक परिस्थिती अतिशय खालावलेली असल्यास या प्रकारची आणिबाणी जाहीर केली जाऊ शकते. परंतु आपल्या देशात आजतागायत अशा प्रकारची आणिबाणी जाहिर झालेली नाही.*

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**योग्य अयोग्य ठरविण्याचा अधिकार:** राष्ट्रपती केंद्रीय मंत्रिमंडळाच्या सल्ल्याशिवाय काही अधिकार वापरू शकतात. त्यांना योग्य-अयोग्य ठरविण्याचा अधिकार म्हणतात. ते पुढील प्रमाणे.

1) सार्वत्रिक निवडणुकीत लोकसभेत कोणत्याही पक्षाचे स्पष्ट बहुमत मिळाले नसेल राष्ट्रपती कोणत्याही पक्षाच्या नेत्याला सरकार स्थापन करण्यास निमंत्रित करू शकतात.

2) जेव्हा संसदेने मंजूर केलेले विधेयक (बिल) राष्ट्रपतींकडे मंजुरीसाठी पाठवले जाते तेव्हा ते पुनर्विचारासाठी परत पाठवू शकतात.

## पंतप्रधान

देशाच्या राज्यकारभारात राष्ट्रपतीना मदत करण्यासाठी किंवा सल्ला देण्यासाठी पंतप्रधान आणि त्यांच्या मंत्रिमडंळाला घटनेने काही अधिकार दिले आहेत, असे असून सुध्दा देशाचा कारभार चालविण्याचा खरा अधिकार पंतप्रधानांना आहे. राष्ट्रपती हे देशाचे प्रमुख असतात. तर पंतप्रधान हे सरकारचे प्रमुख असतात, जोपर्यंत लोकसभेचा विश्वास असतो तोपर्यंतच पंतप्रधान आपल्या पदावर राहू शकतात.

**पंतप्रधानाचे अधिकार आणी कार्ये:**

1. **मंत्र्याची नेमणूक व बडतर्फ आणि खात्यांचे विभाजन:** पंतप्रधान मंत्री व कॅबिनेट मंत्र्यांच्या नियुक्तीसाठी राष्ट्रपतीकडे शिफारस करतात. मंत्र्यांना विविध खात्याचे वाटप करतात. त्यांचा हा खाते वाटपाचा निर्णय अंतिम असतो. वादग्रस्त आणि गैरवर्तुनुकीचा आरोप असलेल्या मंत्र्याना ते बडर्तफ करु शकतात.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

2. **प्रशासन प्रमुखः** पंतप्रधान हे सरकारच्या सर्व कारभाराला पूर्णपणे जबाबदार असतात. विविध मंत्र्याच्या व्यवहाराचा समन्वय साधतात. देशाचे नियोजन, संरक्षण आणि परराष्ट्र विषयक धोरणे ठरविण्यात पंतप्रधानांचा मुख्य वाटा असतो.

3. **केंद्रीय मंत्रीमंडळाचा प्रमुखः** पंतप्रधानाच्या अध्यक्षतेखाली कॅबिनेट मंत्र्यांच्या सभा आयोजित केल्या जातात. पंतप्रधानाच्या अध्यक्षतेखाली महत्वाच्या राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय बाबीवर चर्चा करून निर्णय घेतले जातात. पंतप्रधान हे राष्ट्रपती आणि कॅबिनेट मंत्री यांच्या मधील दुवा असतात.

4. **लोकसभा विसर्जित करण्याचा सल्ला देण्याचा अधिकारः** पंतप्रधानांना लोकसभा विसर्जित करण्याचा सल्ला देण्याचा अधिकार आहे. सामान्यतः जेव्हा मंत्रीमंडळात गंभीर मतभेद होतात आणि मंत्रीमंडळ लोकसभेचा विश्वास गमावते, तसेच मंत्रीमंडळातील सहकाऱ्यांकडून प्रशासनात अपेक्षित सहकार्य मिळत नाही. अशावेळी पंतप्रधान राष्ट्रपतींना सल्ला देतात.

**केंद्रीय मंत्रिमंडळः** आपल्या राज्यघटनेच्या कलम 74(1) मध्ये असे म्हटले आहे की, राष्ट्रपतींना मदत आणि सल्ला देण्यासाठी पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखाली मंत्रीपरिषद असेल. पंतप्रधानांच्या नेतृत्वाखालील केंद्रीय मंत्रीमंडळ ही खरी कार्यकारी अधिकारी असते आणि ती राष्ट्राच्या संपूर्ण प्रशासनाचे व्यवस्थापन करते. केंद्रीय मंत्रीमंडळ सार्वजनिक धोरणे आणि योजना तयार करते आणि त्यांची अंमलबजावणी करते. केंद्रीय मंत्रीमंडळाचे तीन प्रकारात वर्गीकरण केले जाते. ते म्हणजे

1. कॅबिनेट दर्जाचे मंत्री
2. राज्यमंत्री.
3. उपमंत्री

संविधानाच्या 91 व्या दुरुस्ती कायद्यानुसार, केंद्रीय मंत्रीमंडळाचा आकार पंतप्रधानांसह एकूण लोकसभेच्या सदस्यांच्या 15 टक्यांपेक्षा जास्त असू शकत नाही. या मंत्रीमंडळावर दोन प्रकारच्या जबाबदाऱ्या आहेत. प्रत्येक मंत्री आपल्या खात्याच्या प्रगती, यश आणि अपयशासाठी वैयक्तिकरित्या जबाबदार असतो आणि मंत्रीपरिषद त्यांच्या प्रशासन, धोरणात्म क निर्णयांसाठी आणि कार्यक्रमांसाठी संसदेला (लोकसभेला) एकत्रितपणे जबाबदार असते. त्यामुळे संसदेला विश्वास मिळेपर्यंत मंत्रीपरिषद सत्तेत राहते. लोकसभा अविश्वास ठराव मंजूर करून मंत्रीपरिषदेला सत्ते वरून दूर करू शकते.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

# आपले पंतप्रधान मंत्री


स्व.पं.जवाहरलाल नेहरू
1947-1964


स्व. लाल बहादुर शास्त्री
1964-1966


स्व.गुलतारीलाल नंदा
1966


स्व. श्रीमती इंदिरा गांधी
1966-77, 1980-84


स्व. मुरारजी देसाई
1977-1979


स्व. चरण सिंग
1979-1980


स्व. राजीव गांधी
1984-89


स्व. वि. पी. सिंग
1989-1990


स्व. चंद्रशेखर (1990
सप्टेंबर-1991 जुन


स्व. पी. व्ही नरसिंहराव
1991-1996


श्री. एच्. डी. देवेगौडा
1996 जुन-1997 एप्रिल


स्व. आय. के. गुजराल
1997 एप्रिल-1988 मार्च


स्व. अटल बिहारी वाजपेयी
मे 18, 1996-31 मे 1996
19 मार्च 1998-मे 2004


डॉ. मनमोहन सिंग
2004 - 2014


श्री. नरेंद्र मोदी
2014 -

©KTBS
NOT TO BE REPUBLISHED

*हे तुम्हाला माहित आहे का?*

***अविश्वास दर्शक ठराव:*** *जर लोकसभेच्या सदस्यांनी स्वत:वरील विश्वास गमावला आणि पंतप्रधान आणि त्यांच्या कॅबिनेट मंत्री मंडळाने पाठिंबा काढून घेतला तर पंतप्रधान व त्यांच्य कॅबिनेट मंत्र्याना त्यांच्या पदाचा राजीनामा द्यावा लागतो. आघाडी सरकारने ह्यांच्या वरील विश्वास गमावला तर ह्यांचा राजीनामा मागण्याचा ठराव अनुक्रमे विधानसभेने राज्यस्तरावर व लोकसभेने केंद्र स्तरावर मांडला, तर त्याला अविश्वास दर्शक ठराव असे म्हणतात.*

## भारताची राज्ये, केंद्रशासित प्रदेश आणि राजधान्या

**राज्य**

1. आंध्रप्रदेश (अमरावती)
2. अरुणाचलप्रदेश (इटानगर)
3. आसाम (दिसपूर)
4. बिहार (पटना)
5. छत्तिसगड (रायपूर)
6. गोवा (पणजी)
7. गुजरात (गांधीनगर)
8. हरियाना (चंदीगड)
9. हिमाचल प्रदेश (शिमला)
10. झारखंड (रांची)
11. कर्नाटक (बंगळूरू)
12. केरळ (तिरूवंतपुरम)
13. मध्य प्रदेश (भोपाळ)
14. महाराष्ट्र (मुंबई)
15. मणीपूर (इंफाल)
16. मेघालय (शिलाँग)
17. मिझोरम (ऐझवाल)
18. नागालँड (कोहिमा)
19. ओडिशा (भुवनेश्वर)
20. पंजाब (चंदिगड)
21. राजस्तान (जयपुर)
22. सिक्कीम (गंगटोक)
23. तामिळनाडू (चेन्नई)
24. तेलंगना (हैद्राबाद)
25. त्रिपूरा (अगरतला)
26. उत्तरप्रदेश (लखनौ)
27. उत्तराखंड (डेहराडून)
28. पश्चिम बंगाल (कोलकत्ता)

**केंद्रशासित प्रदेश**

1. आंदमान आणि निकोबार आयलँड (पोर्टब्लेअर/श्री विजयपुरम)
2. चंदिगड (चंदिगड)
3. दादरा आणि नगर हवेली, दमण आणि दिव (दमण)
4. दिल्ली (राष्ट्रीय राजधानी प्रदेश)
5. जम्मू आणि काश्मिर (श्रीनगर-उन्हाळा, जम्मू - हिवाळा)
6. लडाख (लेह)
7. लक्षद्विप बेटे (कवरत्ती)
8. पुदूचेरी (पुदूचेरी)

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

*तुम्हाला माहित आहे का?*

*बरारिसैन - ही उत्तराखंडच्या राज्याची उन्हाळी राजधानी आहे.*

*धर्मशाला - हिमाचल प्रदेश राज्याची दुसरी राजधानी आहे.*

*ॲटर्नी जनरल - हे भारतातील सर्वोच्च कायदेशीर सल्लागार आहेत. त्यांची नियुक्ती राष्ट्रपती करतात.*

## स्वाध्याय

**I. रिकाम्या जागा भरा:**

1. भारत हे ____________ आहे.
2. केंद्रीय कामदेमंडळाला ____________ असे म्हणतात.
3. राज्यसभेचे अध्यक्ष हे ____________ असतात.
4. लोकसभेचा सदस्य होण्यासाठी ____________ वर्ष पूर्ण केलेली असावी.
5. तिन्ही संरक्षण दलाचे सर्वोच्च प्रमुख ____________ असतात.
6. घटनेच्या ____________ व ____________ कलमानुसार राष्ट्रपतींची निवड केली जाते.
7. केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या अध्यक्षांची निवड ____________ हे करतात.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

**II. पुढील प्रश्नांची उत्तरे द्या :**

8. संसदेच्या दोन सभागृहांची नावे सांगा.
9. राज्यसभेची रचना स्पष्ट करा?
10. लोकसभा सदस्य होण्यासाठी आवश्यक पात्रता लिहा.

11. राष्ट्रपतीपदांसाठी निवडणूक प्रक्रिया स्पष्ट करा.

12. पंतप्रधानांच्या अधिकारांची यादी करा?

13. केंद्रीय मंत्रीमंडळ आणि त्यांची रचना स्पष्ट करा?

**III. उपक्रम :**

1. तुमच्या शाळेत शालेय मंत्रीमंडळाची स्थापना करा.
2. तुमच्या मतदारसंघातील आमदाराला भेटा आणि त्यांच्या कामकाजाविषयी चर्चा करा.

**IV. प्रकल्पः**

1. संसदेचे चित्र काढा आणि तुमच्या शाळेत दाखवा.

***

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

प्रकरण - 7

# राज्य सरकार

**या प्रस्तुत प्रकरणात तुम्ही खालाल गोष्टी जाणून घ्याल :**

- *राज्य कायदे मंडळाचे स्वरूप, विधानसभा आणि विधान परिषद, त्यांचे सदस्यत्व आणि त्यांचे कार्य.*
- *राज्य कार्यकारी मंडळाचे स्वरूप, राज्यपाल, त्यांची पात्रता आणि कार्ये.*
- *मुख्यमंत्र्यांची निवड, अधिकार आणि त्यांचे कार्य.*



**विधान सौध (बेंगळूरू)**

भारत हे एक संघराज्य असून त्यामध्ये 28 राज्ये व 8 केंद्रशासित प्रदेश आहेत. राज्य सरकारांची रचना केंद्र सरकाराप्रमाणे असून प्रत्येक राज्यात कायदे मंडळ, कार्यकारी मंडळ व न्यायमंडळ आहे.

**राज्य सरकार**

- **कायदेमंडळ**
  - **कर्नाटक विधानसभा, विधानपरिषद**
- **कार्यकारी मंडळ**
  - **राज्यपाल, मुख्यमंत्री, राज्यमंत्रिमंडल, ऑडव्होकेट जनरल**
- **न्यायमंडळ**
  - **अधिन न्यायालये**

## **राज्यविधिमंडळ** (State Legislature)

राज्य विधिमंडळ राज्यपाल हा राज्य विधानमंडळाचा अविभाज्य भाग आहे. काही राज्यांमध्ये द्विसदनी विधिमंडळ प्रणाली असते, तर काहींची एकसदनी विधिमंडळ प्रणाली असते. द्विसदनीय विधान प्रणाली असलेल्या राज्यांमध्ये, विधानसभेचे कनिष्ठ सभागृह आणि विधान परिषदेचे वरचे सभागृह अस्तित्वात आहे. एकसदनीय विधान प्रणाली असलेल्या राज्यांमध्ये, फक्त कनिष्ठ सभागृह, विधानसभा, अस्तित्वात आहे आणि वरचे सभागृह, विधान परिषद अस्तित्वात नाही.

**उपक्रम :** तुमच्या क्षेत्रातील विधानसभा सदस्यांना भेटून त्यांच्या कार्याबद्दल चर्चा करा.

**तुम्हाला हे माहीत आहे का?**

कर्नाटक, उत्तर प्रदेश, आंध्र प्रदेश तेलंगना, महाराष्ट्र, बिहार या राज्यांमध्ये दोन सभागृहे आहेत तर इतर राज्यांमध्ये फक्त एकच सभागृह आहे.

**विधानसभा (Legislative Assembly) :**

विधानसभेचे संख्याबळ हे त्या राज्याच्या लोकसंख्येवर अवलंबून असते. विधानसभेच्या एकूण सदस्यांच्या 1/3 इतकी विधानपरिषद सदस्यांची संख्या असते. कोणत्याही विधानसभेतील सदस्यांची संख्या 500 पेक्षा जास्त किंवा 60 पेक्षा कमी नसावी. तथापि लहान राज्यांमध्ये सदस्यांची संख्या कमी असते. उदा. सिक्कीम विधानसभेत 32 सदस्य आहेत. कर्नाटक विधानसभेत सध्या 224 सदस्य आहेत. परंतू 15 व्या विधानसभेच्या शेवटपर्यंत कर्नाटक विधानसभेत 225 सदस्य होते. सध्याच्या 16 व्या विधानसभेत 224 सदस्य आहेत.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

2020 पर्यंत 224 सदस्य थेट लोकांद्वारे निवडले आणि राज्यपालांकडून एका अँग्लो-इंडियन सदस्याची राज्य विधानसभेत नेमणूक करण्याची प्रथा होती. परंतू 104 च्या घटना दुरूस्ती विधेयकानुसार हि प्रथा रद्द झाली. कर्नाटक विधानसभेत अनुसूचित जमातीसाठी 36 जागा आणि अनुसूचित जमातीसाठी 15 जागा राखीव आहते. तसेच 106 वी घटना दुरुस्ती विधेयकानुसार (नारीशक्ती वंदन अभियान) माहिलांसाठी 33% राखीव जागा असणे आ-वश्यक आहे.

**विधानसभेच्या सदस्यासाठी पात्रता :** 1. भारताचा नागरिक असावा 2. वयाची 25 वर्षे पूर्ण झालेली असावी. 3. तो सरकारी नोकर नसावा. 4. कोणत्याही न्यायालयाने त्याला शिक्षा केलेली नसावी 5. त्याचे मनःस्वास्थ बिघडलेले नसावे. (मनोविकृत नसावा) 6. तो दिवाळखोर नसावा. 7. संसदेने वेळोवेळी ठरवलेल्या अर्हतेस पात्र असावा.

**कार्यालयीन कार्यकाल :** विधानसभेचा सदस्य 5 वर्षाच्या कालावधीसाठी निवडला जातो. तथापि (कॅबिनेट्च्या) मंत्रीमंडळाच्या शिफारशीनुसार मुदत पूर्ण होण्यापूर्वी विधानसभा विसर्जित केली जावू शकते. अशावेळी राज्यात 'राष्ट्रपती राजवट' लागू केली जाते. जर सदस्यांना विधानसभेत आपले सदस्यत्व चालू ठेवायचे नसेल तर ते आपल्या पदाचा राजीनामा सभापतींकडे देवू शकतात. सभापती व उपसभापती विधानसभेतील निवडून आलेल्या सदस्यांमधून निवडले जातात. सभागृहाचे कामकाज सभाप-तींच्या अध्यक्षते खाली चालते.

***उपक्रम* : *विधानसभेचे अधिवेशन चालू असताना भेट देऊन तिथे चर्चा केल्या जाणाऱ्या मुद्यांची यादी करा.***

**सभापतींचे कार्य पुढीलप्रमाणे** : सभागृहाची शांतता, प्रतिष्ठा व शिष्टाचार राखणे, सभा आयोजित करणे किंवा पुढे ढकलणे. सदस्यांच्या हक्कांचे रक्षण करणे. एखाद्या ठरावाला पाठिंबा किंवा विरोध करणे. एखाद्या ठरावाला समान मते पडल्यास निर्णायक मत देणे इ.

**विधानसभेचे अधिकार आणि कार्ये:**

**विधिमंडळाचे अधिकार आणि कार्य:** एक सामान्य विधेयक विधिमंडळाच्या कोणत्याही सभागृहात मांडले जाऊ शकते. विधानसभेने मंजूर केलेली विधेयके विधान परिषदेकडे मंजुरीसाठी पाठवली जातात. त्यानंतर विधान परिषद तीन महिन्यांच्या आत दुरुस्तीसह



**सुवर्ण विधानसौध बेळगावी**

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

किंवा त्याशिवाय मान्यता देईल आणि विधेयक विधानसभेकडे परत करेल. अन्यथा, विधानसभा विधेयक दुसऱ्यांदा मंजुरीसाठी विधान परिषदेकडे पाठवते. या प्रकरणात, विधान परिषद एक महिन्याच्या आत विधेयक विधानसभेकडे मंजुरीसह परत करेल. अन्यथा दोन्ही सभागृहांनी सहमती दर्शवली आहे असे समजून विधेयक घोषित करून ते राज्यपालांच्या स्वाक्षरीसाठी पाठवले जाते. अशा प्रकारे सर्वसाधारण विधेयक चार महिन्यांसाठी स्थगित करण्याच्या अधिकाराशिवाय विधान परिषदेला कोणताही अधिकार नाही.

**आर्थिक अधिकार आणि कार्य :** विधानसभेला वित्तविषयक बाबींमध्ये विधान परिषदेपेक्षा अधिक अधिकार आहेत. राज्यघटनेनुसार वित्त विधेयक विधानसभेत मांडायला हवे. विधानसभेने मंजूर केलेले वित्त विधेयक विधान परिषदेकडे मंजुरीसाठी पाठवले जाते. मग विधानपरिषदेने विधेयक प्राप्त झाल्यापासून 14 दिवसांच्या आत संमतीने विधानसभेकडे परत करणे आवश्यक आहे, असे न झाल्यास राज्यपाल हे विधेयक दोन्ही सभागृहांनी मंजूर केले असल्याचे घोषित करुन स्वाक्षरीसाठी पाठवले जाते. यावरून हे स्पष्ट होते की, आर्थिक विधेयक 14 दिवसांसाठी स्थगित करण्याशिवाय विधीमंडळाला आर्थिकविषयक अन्य कोणतेही अधिकार नाहीत.

**प्रशासकीय अधिकार आणि कार्य:** राज्य कार्यकारिणी (मंत्रिमंडळ) विधानसभेला जबाबदार असते. जोपर्यंत मंत्रिमंडळाला विधानसभेचा विश्वास आहे तोपर्यंत ते सत्तेत राहते. मंत्रिमंडळाने विधिमंडळाचा विश्वास गमावल्यावर राजीनामा द्यावा लागतो. संपूर्ण मंत्रिमंडळ एकत्रितपणे विधानसभेत जबाबदार असते.

**निवडणूक अधिकार आणि कार्ये:** राष्ट्रपती, राज्यसभेचे सदस्य, विधान परिषद सदस्य, विधानसभा सभापती व उपसभापती यांची निवडणुकीद्वारे निवड करण्याचा अधिकार विधानसभेला आहे.

**घटनादुरुस्ती करण्याचा अधिकार:** काही घटनादुरुस्ती विधेयकांना अर्ध्या राज्यांच्या विधानसभेची मंजुरी आवश्यक असते. उदाहरणार्थ वस्तू आणि सेवा कर आकारणी (GST) शी संबंधित 122 वी घटना दुरुस्ती विधेयक 2016.

**इतर अधिकार आणि कार्य :** राज्य लोकसेवा आयोगाचा अहवाल, राज्य मागासवर्ग आयोगाचा अहवाल, राज्य महिला आयोगाचा अहवाल आणि इतर राज्य आयोगांच्या अहवालांवर विधानसभेत चर्चा केली जाते.

**विधान परिषद : (Legislative Council)** राज्य कायदेमंडळाच्या वरिष्ठ सभागृहाला विधान परिषद म्हणतात. याच्या सदस्यांची संख्या विधानसभेच्या एकूण सदस्य संख्येच्या 1/3 इतकी असते. या कारणामुळेच काही राज्यात विधानपरिषद अस्तित्वात नाही. कर्नाटक

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

विधान परिषदेच्या सदस्यांची संख्या 75 आहे. हे सदस्य 5 क्षेत्रांचे प्रतिनिधित्व करतात. कांही सदस्यांची निवड विधानसभा सदस्य, स्थानिक स्वराज्य संस्था, पदवीधर मतदार संघ, शिक्षक मतदार संघ यामधून निवड केली जाते. कला, साहित्य, शिक्षण, समाजसेवा, विज्ञान, इ. क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी केलेल्या काही तज्ञ नागरिकांची नियुक्ती राज्यपाल करतात. विधान परिषद हे स्थायी (कायमस्वरूपी) सभागृह आहे. दर दोन वर्षांनी ज्या सदस्यांचा कार्यकाळ पूर्ण झालेला असतो ते निवृत्त होतात. विधान परिषद सदस्यांचा कार्यकाल 6 वर्षाचा असतो. प्रत्येक 2 वर्षातून एकदा 1/3 सभासद् निवृत्त होतात. सभापती व उपसभापती हे सदस्यांतूनच निवडले जातात. सभापतींच्या अध्यक्षतेखाली सभागृहाचे कामकाज चालते. सभागृहाची प्रतिष्ठा व आदर राखण्याचे काम सभापती करतात.

**विधान परिषद सदस्यांची पात्रता :**

1. तो भारताचा नागरिक असावा.
2. वयाची 30 वर्षे पूर्ण केलेली असावी.
3. कोणत्याही लाभदायक पदावर नसावा
4. न्यायालयीन शिक्षा झालेली नसावी
5. मानसीकरीत्या अस्थिर नसाव
6. दिवाळखोर नसावा
7. विधान सभा सदस्यासाठी (M.L.A.) आवश्यक असलेल्या सर्व पात्रता असणे आवश्यक आहे.

**चर्चा करा**

*राज्य सरकारचे आदेश राज्यपाल आणि केंद्र सरकारचे आदेश राष्ट्रपतींच्या नांवे दिले जातात. का?*

**विधान परिषदेचे अधिकार आणि कार्ये:**

**कायदेविषयक अधिकार आणि कार्ये:** सर्व विधेयके दोन्ही सभागृहात सादर केली जाऊ शकतात, फक्त विधानसभेत प्रथम सादर केलेली वित्त विधेयके वगळता. एका सभागृहाने विधेयक मंजूर केल्यानंतर ते दुसऱ्या सभागृहाकडे पाठवले जाते. विधान परिषद एखादे विधेयक 3 महिन्यापर्यंत रोखू शकते. मात्र, तेच विधेयक विधानसभेने दुसऱ्यांदा पाठविल्यास, विधान परिषदेला एक महिन्याच्या आत मंजूरी देणे बंधनकारक असते. जर तसे केले गेले नाही तर दोन्ही सभागृहांनी मंजुरी दिल्याचे समजून ते विधेयक राज्यपालांकडे मंजुरीसाठी पाठविले जाते.

**आर्थिक अधिकार आणि कार्ये :** विधान परिषदेपेक्षा विधान सभेला वित्तविषयक (आर्थिक) अधिकार जास्त असतात. विधान परिषद फक्त 14 दिवसांकरिता वित्तविषयक विधेयक रोखू शकते 14 दिवसाच्या आत जर विधेयक संमत केले गेले नाही तर ते दोन्ही

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

सभागृहांकडून मंजूर झाले आहे असे समजून ते विधेयक राज्यपालांकडे मंजूरीसाठी पाठविले जाते.

**प्रशासकिय अधिकार :** राज्य कार्यकारी मंडळावर विधानपरिषदेचे फारसे नियंत्रण नसते. सदस्य मंत्र्यांना प्रश्न विचारून माहिती मिळवू शकतात, जर मंत्र्यांनी त्यांच्या प्रश्नांची योग्य उत्तरे दिली नाहीत तर मंत्र्यांकडे विधानपरिषद सदस्य राजीनामा मागू शकतात. परंतु अविश्वासदर्शक ठराव मांडू शकत नाहीत.

**राज्य कार्यकारी मंडळ :** राज्य कार्यकारी मंडळात राज्यपाल, मुख्यमंत्री आणि कॅबिनेट दर्जाचे मंत्री यांचा समावेश होतो. जरी राज्यपाल घटनात्मक प्रमुख असले तरी मुख्यमंत्री व त्यांचे मंत्रीमंडळ हेच खरे कार्यकारी अधिकारी असतात.

> ***उपक्रम***
>
> *तुमच्या क्षेत्रातील संसद व विधानसभेतील प्रतिनिधींच्या नावाची यादी तयार करा*

**राज्यपाल (Governor)** : पंतप्रधान आणि त्यांच्या मंत्रीमंडळाच्या शिफारशीनुसार राष्ट्रपती राज्यपालांची नियुक्ती करतात. प्रत्येक राज्याला एका स्वतंत्र्य राज्यपालाची आवश्यकता असते. परंतू कधीकधी दोन किंवा तीन राज्यांसाठी एकच राज्यपाल असू शकतो.

**पात्रता, कार्यालयीन कार्यकाल, वेतन आणि सवलती :**

1) भारताचा नागरिक असावा 2) किमान वय 35 वर्षे असावे 3) सरकारच्या अंतर्गत लाभाचे कोणतेही पद धारण करू नये, सरकारी नोकर नसावा. 4) संसदेचा किंवा राज्य कायदेमंडळाचा सदस्य नसावा आणि जर तो सदस्य असेल तर त्यांची राज्यपाल म्हणून नियुक्ती झाल्यावर त्या पदाचा राजीनामा द्यावा लागतो.

राज्यपालाचा कार्यकाल 5 वर्षे असतो. मुदत संपल्यानंतर दुसऱ्या राज्यपालांची नियुक्ती होईपर्यंत ते पदावर राहू शकतात. केंद्रीय मंत्रीमंडळाच्या शिफारशीनुसार राष्ट्रपती राज्यपालांना त्याचा कार्यकाल संपण्यापूर्वी परत बोलावू शकतात. राज्यपालांना संसदेने निश्चित केल्यानुसार वेतन आणि भत्ते मिळतात. तसेच त्यांना सरकारी निवासस्थान लोक भवन (राजभवन) असते. राज्यपालांच्या निर्णयाबाबत कोणीही प्रश्न विचारू शकत नाहीत अथवा न्यायालयात दावा करू शकत नाहीत.

**अधिकार आणि कार्ये :** कायद्यानुसार सर्व कार्यकारी अधिकार राज्यपालांना असतात पण मुख्यमंत्री आणि त्यांचे मंत्रीमंडळ हे अधिकार अंमलात आणतात. ते अधिकार खालील प्रमाणे.

NOT TO BE REPUBLISHED @TBS

**कार्यकारी अधिकार आणि कार्ये::** राज्यपाल हा कार्यकारी मंडळाचा प्रमुख असतो. ते मुख्यमंत्र्यांची नियुक्ती करतात आणि इतर मंत्र्यांची नियुक्ती मुख्यमंत्र्यांच्या सल्ल्याने करतात. राज्यलोकसेवा आयोगाच्या अध्यक्षांची नियुक्ती करतात, राज्यातील सर्व विद्यापिठांच्या उप-कुलगुरूंची व इतर वरिष्ठ सरकारी अधिकायांची नियुक्ती करतात.

**कायदेविषयक अधिकार आणि कार्ये :** मुख्यमंत्र्याच्या सल्लयानुसार अधिवेशन भरविण्याचा, पुढे ढकलण्याचा व विसर्जित करण्याचा अधिकार राज्यपालांना असतो. विधानसभेत एका अँग्लो- इंडियन सदस्यांची व विधानपरिषदेच्या 1/6 सदस्यांची नियुक्ती करण्याचा अधिकार असतो. कायदेमंडळाकडून मंजूर झालेले विधेयक राज्यपाल मंजूर करू शकतात अथवा रोखू शकतात.

> **उपक्रम**
>
> *आपल्या कर्नाटक राज्यातील मुख्यमंत्री व त्यांचा कार्यकाळ यांची माहिती देणारी यादी तयार करा.*

**आर्थिक अधिकार आणि कार्ये:** राज्यपालांच्या परवानगीशिवाय वित्त विधेयक (आर्थिक मसुदा) विधानसभेत मांडले जावू शकत नाही. राज्य वित्त आयोग आणि नियोजन आयोग नेमण्याचा अधिकार राज्यपालांना आहे. राज्य आपत्कालीन निधी त्यांच्या नावाने असतो. दुष्काळ, पूर, भूकंप इ. सारख्या आणिबाणीच्या परिस्थितीत राज्यपालांना राज्य आपत्कालीन निधीतून मदत पुरविण्याचा अधिकार असतो.

**न्यायालयीन अधिकार आणि कार्ये :** एखाद्या गुन्हेगार व्यक्तिची शिक्षा माफ करणे, शिक्षा कमी करणे, पुढे ढकलणे किंवा बदलणे हे अधिकार राज्यपालांना असतात. राज्यपाल राज्य महाधिवक्ता (State Advocate General) आणि जिल्हा न्यायाधिशांची नेमणूक करतात.

**विवेकाधिकार (योग्य-अयोग्य ठरविण्याचा अधिकार) :**

राज्याचे मुख्यमंत्री नियुक्त करतांना राज्यपाल या अधिकाराचा वापर करतात. कायदेमंडळाने मंजूर केलेले विधेयक रोखणे किंवा राष्ट्रपतींकडे पाठविणे, राज्यात आणिबाणी जाहीर करण्याची शिफारस राष्ट्रपतींना करणे, मंत्रीमंडळ (Cabinet) बरखास्त करणे, विधानसभा विसर्जित करणे इ. अधिकार राज्यपालांना असतात.

**राज्य मंत्रीमंडळ (State Council of Ministers):** आपल्या राज्यघटनेत मंत्रीमंडळाची तरतूद आहे, ज्याचा प्रमुख मुख्यमंत्री असतो. मंत्रीमंडळ राज्यपालांना प्रशासनात मदत करते. तसेच ते विधानसभेला पूर्णपणे जबाबदार असते. मंत्रीमंडळाची अनेक कार्ये आहेत.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

1. मंत्रीमंडळ सरकारची धोरणे ठरविण्याचे कार्य करते.
2. राज्याचा अर्थसंकल्प (Budget) तयार करून कायदेमंडळात सादर करते.
3. राज्यपालांना राज्य लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष व त्यांचे सदस्य नियुक्त करण्यास, लोकांयुक्तांची नियुक्ती करण्यास सल्ला देण्याचे काम मंत्रीमंडळ करते.
4. प्रत्येक मंत्र्याने त्याच्या खात्याचा कारभार कार्यक्षमतेने पार पाडण्याची हमी देणे.
5. विविध खात्यांमध्ये समन्वय साधुन त्यांच्या कारभारावर देखरेख ठेवणे.

**मुख्यमंत्री :** मुख्यमंत्री हे राज्यसरकारचे प्रमुख असतात. सरकारचे यश किंवा अपयश हे मुख्यमंत्र्याच्या वैयक्तिक कार्यक्षमतेवर अवलंबून असते. राज्याच्या सर्व सत्तेचे मुख्यमंत्री हे केंद्रबिंदू आहेत. मुख्यमंत्री हा मंत्रीमंडळ, कायदेमंडळाचा प्रमुख असतो. तसेच आघाडी सरकारच्या पक्षाचा नेता असतो. मुख्यमंत्री हा दोन्ही सभागृहापैकी एका सभागृहाचा सदस्य असावा लागतो. काहीवेळा तो कोणत्याही सभागृहाचा सदस्य नसेल तरीसुद्धा मुख्यमंत्री होऊ शकतो. परंतू त्याला 6 महिन्याच्या आत कोणत्याही एका सभागृहाचा सदस्य बनणे अनिवार्य असते.

**मुख्यमंत्र्यांची कार्ये आणि अधिकार:** मुख्यमंत्री ही सरकारमधील अत्यंत महत्वाची व्यक्ती असल्याने त्याच्यांकडे खालील महत्त्वाची कार्ये व अधिकार असतात -

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

1. मंत्र्यांची यादी करून राज्यपालांना सादर करणे, त्यानंतर त्यांना सरकार स्थापन करता येते.
2. मंत्र्यांचे खाते वाटप करणे किंवा खाते बदल करणे.
3. सरकारशी एकनिष्ठ व प्रामाणिक नसलेल्या मंत्र्यांना, मंत्रीमंडळाच्या विरोधात जाणाऱ्या किंवा फौजदारी गुन्हे असलेल्या व्यक्तींना काढून टाकण्याचा अधिकार असतो.
4. सरकारचा प्रमुख म्हणून राज्याची धोरणे ठरविण्यात अत्यंत महत्वाची भूमिका असते.
5. मंत्रीमंडळाचे प्रमुख असल्याने मंत्रीमंडळाच्या सभा आयोजित करणे, पुढे ढकलणे हे अधिकार असतात.
6. सर्व खात्यांचा समन्वय साधून त्यांच्या कारभारावर देखरेख करण्याचा अधिकार असतो.
7. विधानसभेचा कार्यकाल पूर्ण होण्यापूर्वी विधानसभा विसर्जित करण्याचा अधिकार असतो.

8. मुख्यमंत्री हा राज्यपाल आणि मंत्रीमंडळाला जोडणारा दुवा असतो.

9. अनेक पदांवरील नामनिर्देशनांच्या, नियुक्तीच्या बाबतीत ते राज्यपालांचे सल्लागार म्हणून काम करतात.

| अ.नं | मुख्यमंत्र्याचे नाव | कार्यलयीन कार्यकाळ |
|---|---|---|
| 1. | श्री. के.सी. रड्डी | 25 ऑक्टोबर 1947 - 30 मार्च 1952 |
| 2. | श्री. केंगल हणुमंतय्या | 30 मार्च 1952-19 ऑगस्ट 1956 |
| 3. | श्री. कडिदाळ मंजाप्पा | 19 ऑगस्ट 1956 - 31 ऑकटोबर 1956 |
| 4. | श्री. एस्. निलजिंगप्पा | 1 नोव्हेंबर 1956 - 16 में 1958 |
| 5. | श्री. बी.डी. जत्ती | 16 में 1958 - 9 मार्च 1962 |
| 6. | श्री. एस्. आर. कंठी | 14 मार्च 1962 - 20 जून 1962 |
| 7. | श्री. एस्. निलजिंगप्पा | 21 जुन 1962 - 28 मे 1968 |
| 8. | विरेंद्र पाटील | 29 मे 1968 - 18 मार्च 1971 |
| | (राष्ट्रपती राजवट) | 19 मार्च 1971 - 20 मार्च 1972 |
| 9. | श्री डी. देवराज अरस | 20 मार्च 1972 - 31 डिसेंबर 1977 |
| | राष्ट्रपती राजवट | 31 डिसेंबर 1977-28 फेब्रुवारी 1978 |
| 10 | श्री डी. देवराज अरस | 28 फेब्रुवारी 1978-7 जानेवारी 1980 |
| 11 | श्री आर. गुंडूराव | 12 जानेवारी 1980 - 6 जानेवारी 1983 |
| 12 | श्री रामकृष्ण हेगडे | 10 जानेवारी 1983 - 29 डीसेंबर 1984 |
| | | 8 मार्च 1985 - 13 फेब्रुवारी 1986 |
| | | 16 फेब्रुवारी 1986- 10 ऑगस्ट 1988 |
| 13 | श्री एस्.आर. बोम्मई | 13 ऑगस्ट 1988 - 21 एप्रिल 1989 |
| | (राष्ट्रपती राजवट) | 21 एप्रिल 1989 - 30 नोव्हेंबर 1989 |
| 14 | श्री विरेंद्र पाटील | 30 नोव्हेंबर 1989 - 10 ऑक्टोबर 1990 |
| | (राष्ट्रपती राजवट) | 10 ऑक्टोबर 1990 - 17 ऑक्टोबर 1990 |

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

| | | |
|---|---|---|
| 15 | श्री एस्. बंगारप्पा | 17 ऑक्टोबर 1990 - 19 नोव्हेंबर 1992 |
| 16 | श्री एम्. विरप्पा मोईली | 19 नोव्हेंबर 1992 - 11 डिसेंबर 1994 |
| 17 | श्री एच. डी. देवेगौडा | 11 डिसेंबर 1994 - 31 मे 1996 |
| 18 | श्री जे. एच. पटेल | 31 मे 1996 - 7 ऑक्टोंबर 1999 |
| 19 | श्री एस्. एम. कृष्णा | 11 ऑक्टोंबर 1999 - 28 मे 2004 |
| 20 | श्री एस्. धर्मसिंग | 28 मे 2004 - 2 फेब्रूवारी 2006 |
| 21 | श्री एच. डी. कुमारस्वामी | 3 फेब्रुवारी 2006 - 8 ऑक्टोंबर 2007 |
| | (राष्ट्रपती राजवट) | 8 ऑक्टोबर 2007 - 12 नोव्हेंबर 2007 |
| 22 | श्री बी. एस. यडियूरप्पा | 12 नोव्हेंबर 2007 - 19 नोव्हेंबर 2007 |
| | (राष्ट्रपती राजवट) | 20 नोव्हेंबर 2007 - 29 मे 2008 |
| 23 | श्री बी. एस. यडियूरप्प | 30 मे 2008 - 4 ऑगस्ट 2011 |
| 24 | श्री डी. व्ही. सदानंद गौडा | 5 ऑगस्ट 2011 - 11 जुलै 2012 |
| 25 | श्री जगदिश शेट्टर | 12 जुलै 2012 - 12 मे 2013 |
| 26 | श्री एस. सिद्धरामय्या | 13 मे 2013 - 15 मे 2018 |
| 27 | श्री बी. एस. यडियूरप्पा | 17 मे 2018 - 23 मे 2018 |
| 28 | श्री एच. डी. कुमारस्वामी | 23 मे 2018 - 23 जुलै 2019 |
| 29 | श्री बी. एस. यडियूरप्पा | 26 जुलै 2019 - 26 जुलै 2021 |
| 30 | श्री बसवराज बोम्मई | 27 जुलै 2021 - 20 मे 2023 |
| 31 | श्री सिद्धरामय्या | 20 मे 2023 पासून |

- *महाधिवक्ता (Advocate General) हे राज्याचे सर्वोतम कायदेशीर साल्लागार आहेत.*
- *कर्नाटक राज्य नियोजन मंडळाचे आता कर्नाटक राज्य परिवर्तन संस्था असे नाम करण करायात आले आहे. (SITK - State Institute for Transformation of Karnataka)*

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांची यादी आणि कार्यकाळाची माहिती कर्नाटक हँडबूक आणि www.kla.kar.nic.in वेबसाईटवरून मिळवली आहे.

## स्वाध्याय

### I. रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

1. भारतीय संघराज्यात ____________ राज्ये व ____________ केंद्रशासित प्रदेश आहेत.
2. कर्नाटक विधान परिषदेमध्ये ____________ सदस्य आहेत.
3. राज्यमंत्रीमंडळात____________आणि____________हेच खरे कार्यकारी असतात.
4. राज्यपालांची नियुक्ती ____________ करतात.

### II. गटात चर्चा करून खालील प्रश्नांची उत्तरे द्या.

5. विधानसभेच्या रचनेचे थोडक्यात वर्णन करा.
6. विधानपरिषदेतील सदस्य कोणकोणत्या क्षेत्रांचे प्रतिनिधित्व करतात?
7. राज्यपालांची पात्रता आणि कार्यकालावधी याविषयी माहिती लिहा.
8. मुख्यमंत्री या विषयावर थोडक्यात टीपा लिहा.

### III. उपक्रम :

1. कर्नाटक विधानसभेला आणि विधानपरिषदेला भेट देऊन तेथील कामकाजाची नोंद करा.
2. राज्य विधानसभेप्रमाणे शाळेमध्ये शालेय संसदेची रचना करून कामकाजाचे निरीक्षण करा आणि अहवाल तयार करा.

### IV. प्रकल्प

1. तुमच्या मतदारसंघातील विधानसभा सदस्य (आमदार) याच्यांशी विधानसभेच्या कामकाजाबद्दल चर्चा करा.
2. आत्तापर्यंतच्या कर्नाटकाच्या मुख्यमंत्र्यांचे फोटो संग्रहित करून अल्बम तयार करा.

***

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

प्रकरण - 8

# न्यायव्यवस्था

W8M9N9

*या पाठाद्वारे आपण खालील गोष्टी जाणून घेऊया.*
- *सर्वोच्च न्यायालय, उच्च न्यायालयाची रचना व कार्ये, एक समान न्यायव्यवस्था.*
- *खालच्या न्यायालयाचे विविध स्तर व त्याची कार्ये.*
- *लोक अदालतीचे स्वरूप व कार्ये.*

आमच्याकडे संपूर्ण देशासाठी एकच एक समान न्यायव्यवस्था आहे, अमेरिकन न्यायव्यवस्थे पेक्षा वेगळी आहे. इथे केंद्र आणी राज्यासाठी स्वतंत्र न्यायालये आहेत. आपली न्यायव्यवस्था ही कायदे मंडळ व कार्यकारी मंडळापासून पूर्णपणे स्वतंत्र आहे. उच्च न्याया-लये, खालच्या स्तराची न्यायालये आणि जिल्हा न्यायालये ही सर्वोच्च न्यायालयाच्या अंतर्गत कार्यकरतात. घटना, विविध कायदे, रूपातंरे आणि दाव्यांचे मागील निर्णय या घटकांवर न्यायालयीन निर्णय अवलंबून असतात. सर्वोच्च न्यायालय हे देशातील अतिश्रेष्ठ न्यायालय आहे. त्याचा निर्णय अंतिम असतो.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

**सर्वोच्च न्यायालय (Supreme Court) :**

28 जानेवारी 1950 रोजी नवी दिल्ली येथे सर्वोच्च न्यायालयाची स्थापना झाली. राष्ट्रपती सरन्यायाधीश आणि सर्वोच्च न्यायालयाच्या इतर न्यायाधीशांची नेमणूक करतात. सध्या सरन्यायाधीशांसह 34 न्यायाधीश कार्यरत आहेत.

**सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांसाठी आवश्यक पात्रता खालील प्रमाणे :**

1. तो भारतीय नागरिक असावा.
2. किमान पाच वर्षे उच्च न्यायालयात न्यायाधीश म्हणून काम केलेले असावे. किंवा किमान दहा वर्षे उच्च न्यायालयात वकील म्हणून काम केलेले असावेत.
3. राष्ट्रपतीच्या मते तो एक उत्तम कायदेतज्ञ असावा एक उतम कायदेतज्ञ असावा.

**नेमणूक, कार्यालय आणि बडतर्फ :**

सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधिशाचे निवृतीचे वय 65 वर्षे आहे. तर इतर न्यायाधीशांचे निवृत्तीवय 62 वर्षे आहे. मात्र ते त्यापूर्वी सुद्धा आपल्या पदाचा राजीनामा देऊ शकतात.

जर तो न्यायाधीशने आपले कर्तव्य बजावत असताना दोषी आढल्यास त्याना संसदेच्या दोन्ही सभागृहा कडून बहुमताच्या आधारे अयोग्य ठरवून त्याना राष्ट्रपती त्यापदावरून काढून टाकू शकतो. त्यांच्या राजीनाम्यानंतर अथवा निवृत्ती नंतर. त्या न्यायाधीशाना भारतातील कोणात्याही न्यायालयात वकिल म्हणून काम करता येत नाही. त्याचे वेतन व भत्ते संसदेच्या कायद्याद्वारे ठरविले जाते.



**सर्वोच्च न्यायालय नवी दिल्ली**

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**कार्ये आणि अधिकार :**

**1. मूळ अधिकार :** केंद्र आणि राज्या मधील आणी दोन राज्यांमधील विवादांचे निराकरण करणे, नागरिकांच्या मूलभूत अधिकाराचे रक्षण करणे संविधानाच्या तरतूदींचे स्पष्टीकरण करणे इत्यादी.

**2. अपीलाचा अधिकार (Appellate Powers) :** कनिष्ठ न्यायालयाने दिलेल्या निर्णया-वर नागरिक सर्वोच्च न्यायालयात अपील करू शकतात. सर्वोच्च न्यायालय असे अपील स्विकारून अंतिम निर्णय देवू शकते अशा प्रकारचे अपील करण्यासंबंधीचे मार्गदर्शन ना-गरिकांना करते.

**3. सल्लाविषयक अधिकार :** ज्यावेळी राष्ट्रपती सार्वजनीक मुद्यावर मत विचारतात तेंव्हा सर्वोच्च न्यायालय आपला योग्य सल्ला देवू शकते. घटनेच्या अंमलबजावणीपूर्वी झालेल्या करारासंबंधी राष्ट्रपती सर्वोच्च न्यायालयाकडे सल्ला मागू शकतात. तेव्हा सर्वोच्चा न्यायालय सल्ला देऊ शकतात.

**4. न्याय पुनरावलोकन अधिकार :** सर्वोच्च न्यायालयाला कायदेमंडळाने लागु केलेल्या कायद्यांचे पुनरावलोकन करण्याचा अधिकार आहे. कार्यकारणीचे आदेश, निर्णय संविधानात्म

क आहेत की नाहीत किंवा वैध-अवैध सांगण्याच्या अधिकाराला न्यायिक पुनरावलोकन म्हणतात.

**5. मुलभूत हक्कांचे संरक्षण अधिकार :** घटनेच्या 32 व्या कलमानुसार सर्वोच्च न्यायालय मूलभूत हक्कांच्या संरक्षणासाठी विशेष आदेश जारी करू शकते म्हणून सर्वोच्च न्यायालय हे मूलभूत हक्कांचे रक्षक म्हटले जाते. डॉ. बी.आर. आंबेडकर यांनी 32 व्या कलमाला घटनेचा आत्मा म्हणून स्तुती केली आहे. सर्वोच्च न्यायलय मूलभूत अधिकारांचे उल्लंघन केल्यावर 5 प्रकारचे रिट जारी करून त्यांचे रक्षण करते. (रिट 1) Habeas corpus 2) Mandamus 3) Prohibitions 4) certiorani)

वरील नमूद केलेल्या कार्याव्यतिरीक्त सर्वोच्च न्यायालयाला नोंदी ठेवण्याचे, केंद्र आणि राज्य सरकाराचे मुख्य सल्लागार म्हणून काम पहाण्याचे आणि विशेष वटहुकूम जारी करण्याचे अधिकार असतात.

**उपक्रम :**

*भारताच्या सर्वोच्या न्यायालयाचे पहिले न्यायाधिश-न्यायमूर्ती हरिलाल जे कानिया. न्यायमूर्ती धनंजय यशवंत चंद्रचूड हे भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे 50 वे मुख्य न्यायाधिश आहेत.*

**उच्च न्यायालय (High - Court) :**

घटनेने प्रत्येक राज्यामध्ये एक उच्च न्यायालय उपलब्ध करून दिले आहे. कांही वेळेला एकच उच्च न्यायालय दोन किंवा अधिक राज्यांसाठी काम पहाते. उच्च न्यायालयात सरन्यायाधिश व इतर न्यायाधीश कार्यरत असतात. न्यायाधिशांची संख्या प्रत्येक राज्यासाठी वेगवेगळी असू शकते.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED




**उच्च न्यायालय (बेंगळूरू)**

**हे तुम्हाला माहित असू द्या :**

1) 1862 मध्ये ब्रिटिशांनी भारतातील पहिली 3 उच्च न्यायालये कलकत्ता, बॉम्बे आणि मद्रास येथे स्थापन केली. सध्या भारतात एकूण 25 उच्च न्यायालये आहेत. कोलकाता उच्च न्यायालय हे भारतातील पहिले उच्च न्यायालय आहे.
2) पंजाब आणि हरियाणा राज्यांसाठी आणि चंदीगड या केंद्रशासित प्रदेशासाठी एक उच्च न्यायालय आहे. ते चंदिगडमध्ये आहे. त्याचप्रमाणे आसाम, नागालँड, मिझोराम आणि अरुणाचल प्रदेशमध्ये गुहाटी, आसाम येथे एकच उच्च न्यायालय आहे, ते गुवाहाटी येथे आहे.
3) कर्नाटक उच्च न्यायालय बेंगळुरू येथे आहे. त्यााची स्थापना 1884 मध्ये झाली. 2008 मध्ये हुबळी-धारवाड आणि कलबुर्गी येथे कर्नाटक उच्च न्यायालयाची फिरती खंडपीठे स्थापन करण्यात आली. परंतु 2013 मध्ये या दोन्ही फिरत्याा खंडपीठांचे उच्च न्यायालयाच्या स्थायी खंडपीठात रूपांतर करण्यात आले.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**उच्च न्यायालयाच्या न्यायाधीशाची पात्रता :**

1) तो भारताचा नागरिक असावा.
2) तो कोणत्याही न्यायालयामध्ये न्यायाधीश म्हणून 10 वर्षे किंवा उच्च न्यायालयात वकील म्हणून 10 वर्षे काम केलेले असावेत.

**नियुक्ती, कार्यकाळ आणि बडतर्फ :** सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश आणि चार वरिष्ठ न्यायाधीशांचा समावेश असलेल्या आयोगाच्या शिफारशीवर आणि केंद्रीय मंत्रिमंडळाच्या सल्ल्यानुसार उच्च न्यायालयांच्या मुख्य न्यायाधीशांची नियुक्ती राष्ट्रपतीद्वारे केली जाते. उच्च न्यायालयाच्या इतर न्यायाधीशांची नियुक्ती सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश आणि इतर दोन वरिष्ठ न्यायाधीशांचा समावेश असलेल्या आयोगाच्या शिफारशीवरून आणि केंद्रीय मंत्रिमंडळाच्या सल्ल्यानुसार राष्ट्रपती करतात. उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश आणि न्यायाधीशांचे निवृत्तीचे वय 62 वर्षे आहे. त्यापूर्वीच ते आपल्या पदाचा राजीनामा देऊ शकतात. संसदेच्या दोन्ही सभागृहांच्या निश्चित बहुमताच्या शिफारशीनुसार राष्ट्रपती त्याला गैरवर्तन किंवा अक्षमतेच्या कारणास्तव काढून टाकू शकतात. त्यांचे वेतन आणि भत्ते संसद कायदा करून ठरवतात. त्यांचे वेतन आणि भत्ते राज्य एकत्रित निधीतून भागवले जातात.

**उच्च न्यायालयाची कार्ये आणि अधिकार :** संपूर्ण राज्यावर उच्च न्यायालयाचा अधिकार असतो. त्यांचे कार्य खालील प्रमाणे.

1. नागरी, फौजदारी दावे, वैवाहिक संबंध, व न्यायालयाचा अवमान इ.बाबतचे निर्णय देणे.
2. कनिष्ठ न्यायालयातून अपील होवून आलेल्या नागरी व फौजदारी खटल्यांना न्याय देणे.
3. कनिष्ठ न्यायालयातून दावे उच्च न्यायालयात वर्ग करणे खालच्या दर्जाच्या न्यायालयीन कामकाजावर देखरेख करणे,जनतेच्या मूलभूत हक्कांचे संरक्षण करणे व त्यांच्या इतर कायदेशीर अधिकाराचे रक्षण करणे.

**खालच्या (दुय्यम) दर्जाची न्यायालये :**

खालच्या (दुय्यम) दर्जाच्या न्यायालयांना स्वतंत्र दर्जा देण्यासाठी 1948 साली न्याया-लयातच अधिवेशन भरविण्यात आले. याचा परिणाम म्हणून खालच्या दर्जाच्या न्यायालयाची तपशीलवार रचना व कार्यक्षेत्राची व्याप्ती यांची घटनेमध्ये नोंद करण्यात आली आहे. जरी प्रत्येक राज्यानुसार खालच्या दर्जाची न्यायालये वेगळी असली तरी त्यांचे मुख्य कार्य एकच असते.

न्यायालये दोन भागात विभागली गेलेली आहेत.

1) दिवाणी न्यायालये (Civil Courts)
2) दंडन्यायालय (Criminal Court)

**दिवाणी न्यायालय :** राज्याच्या प्रत्येक जिल्ह्यात दिवाणी न्यायालय असते. जिल्हा न्यायाधीश हा त्याचा प्रमुख असतो. उच्च न्यायालयातील न्यायाधीशांच्या सल्यानुसार राष्ट्रपती सरन्यायाधीशांची निवड करतात. मात्र राज्याच्या कोणत्याही न्यायालयात किमान 7 वर्षे वकील म्हणून काम केलेली व्यक्ती सरन्यायाधीश होवू शकते. इतर न्यायाधीशांची नियुक्ती स्पर्धापरीक्षांव्दारे केली जाते.

दिवाणी न्यायालयात मालमत्ता, जमीन, आर्थिक व्यवहार, विवाह, घटस्फोट आणि इतर खटल्यांचा विचार करुन निर्णय दिला जातो. कनिष्ठ न्यायालयाकडून आलेले अपील स्विकारणे. जिल्हा न्यायाधीश जिल्ह्यातील सर्व नागरी (दिवाणी) व्यवहारांवर नियंत्रण ठेवतात.

जिल्हा न्यायालयाच्या आधीन येणारी इतर खालील न्यायालये :

1) खालच्या दर्जाच्या न्यायाधीशांचे न्यायालय (Court of subordinate judges)
2) अतिरिक्त खालच्या दर्जाच्या न्यायाधीशाचे न्यायालय (Court of additional subordinate judges)

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

3) मुन्सीफस् न्यायालय (Court of Munsiffs) :

4) अतिरिक्त मुन्सीफस् न्यायालय (Court of additional Munsiffs)

**दंडन्यायालय (Criminal court) :** 1 एप्रिल 1974 रोजी दंडन्यायालय अस्तित्वात आले. हे उच्च न्यायालयाच्या अधिकाराखाली काम करते. दंडन्यायालय हे जिल्हास्तरावररील सर्वोच्च न्यायालय म्हणजेच सत्रन्यायालय होय. जिल्हान्यायाधीश हाच या सत्र न्यायालयाचा न्यायाधीश म्हणून काम पहातो. या दंडन्यायालयात खून, दरोडा, मारामारी, चोरी इ. गुन्ह्यांबाबतीत हे न्यायालय निर्णय देते. त्यांना मृत्यूदंडाची (फाशीची) तसेच जन्मठेपेची शिक्षा देण्याचा अधिकार असतो. परंतु अशा निर्णयांना उच्च न्यायालयाची मंजूरी असावी लागते. त्याचप्रमाणे दंडन्यायालयाने दिलेल्या निकालावर उच्च न्यायालयात अपील करता येवू शकते. दंडन्यायालयाच्या अधिकाराखाली इतर दंडन्यायालयेही काम करतात : खालील प्रमाणे.

**मुख्य दंडाधिकारी न्यायालय (Cheif magisterial court):** या न्यायालयाला मृत्यूदंडाची किंवा जन्मठेपेचा निर्णय देण्याचा अधिकार नसतो परंतू 7 वर्षाच्या कारावासाची शिक्षा देण्याचा अधिकार असतो.

**प्रथमश्रेणी दंडाधिकारी न्यायालय (First grade magisterial court):** या न्यायालयाला जास्त अधिकार आहेत. 3 वर्षाचा कारावास किंवा 10000/- रूपये दंड किंवा दोन्ही ही शिक्षा देवू शकते. याव्यतिरिक्त खालच्या दर्जाच्या दंडाधिकार न्यायालयाने दिलेल्या निकालावर अपील स्विकारले जाते.

> **उपक्रम**
>
> *तुमच्या जवळच्या न्यायालयाला भेट देवून न्यायालयात चालणाऱ्या वाद-प्रतिवादाबद्दल निरीक्षण करून शिक्षकाशी चर्चा कारा.*

**व्दितीयश्रेणी दंडाधिकारी न्यायालय :** या न्यायालयाला एक वर्षापर्यंत शिक्षा किंवा रूपये 5000/- दंड किंवा दोन्हीही शिक्षा देण्याचा अधिकार असतो.

**तृतीयश्रेणी दंडाधिकारी न्यायालय :** या न्यायालयाला 1 महिना कारावास, रूपये. 50 दंड किंवा दोन्हीही शिक्षा देण्याचा अधिकार असतो. व्दितीयश्रेणी किंवा तृतीयश्रेणी दंडाधिकारी न्यायालयाना इतर कोणत्याही न्यायालयाने दिलेल्या निकालाविरोधात अपील स्विकारण्याचा अधिकार नाही.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

अशाप्रकारे जिल्हा आणि सत्र न्यायालये समान असून तोच न्यायाधीश दोन्ही ठिकाणी निकाल देतो. जेंव्हा एखादे न्यायालय नागरी विषय हाताळते तेंव्हा त्याला 'जिल्हा न्यायालय' तर एखादे न्यायालय फौजदारी गुन्हे हाताळते तेंव्हा त्याला 'जिल्हा सत्र न्यायालय' असे म्हणतात.

**महसूल न्यायालये (जमीन महसूल) (Revenue Court) :**

प्रत्येक जिल्ह्यामध्ये जमीन महसूल न्यायालये असतात. या न्यायालयात जमीन महसूल, जमीन नोंदणी संदर्भांचे खटले चालविले जातात. जमीन महसूल न्यायालयात खालील न्यायालये येतात.

**तहशीलदार न्यायालय :** हे न्यायालय जमीन महसूल न्यायालयातील सर्वात कनिष्ठ न्यायालय असून तहशीलदार हे त्याचे न्यायाधीश असतात. या न्यायालयाला तालुका दंडाधिकारी न्यायालय म्हणतात.

**जिल्हा उपविभागीय अधिकाऱ्यांचे न्यायालय :** सहाय्यक आयुक्त हे या न्यायालयात न्यायाधीश असतात. तहशीलदार न्यायालयात घेतलेल्या निर्णय व निकालाविरोधात या न्यायालयात अपील करता येते.

**जिल्हा जमीन : महसूल न्यायालय किंवा जिल्हादंडाधिकारी न्यायालय :** हे न्यायालय प्रत्येक जिल्ह्यात अस्तित्वात असून तहशीलदार न्यायालय व जिल्हा उपविभागीय अधिकाऱ्यांनी दिलेल्या निकालाविरोधात अपील स्विकारते. उपआयुक्त हे याचे न्यायाधीश असतात.

**आयुक्तांचे न्यायालय :** या न्यायालयात जिल्हाधिकारी न्यायालयाने दिलेल्या निकाला विरोधात अपील स्विकारले जाते. राज्यविभागीय अधिकारी (State Divisional officer) हे याचे न्यायाधीश असतात.

**जमीन महसूल मंडळ :** जमीन महसूल संदर्भातील खटले चालवणारे हे सर्वश्रेष्ठ न्यायालय आहे. कनिष्ठ जमीन महसूल न्यायालयाने दिलेल्या निकालाविरोधात येथे अपील स्विकारले जाते. 'लँड टॅक्स सेक्रेटरी' हे त्यांचे प्रमुख असून उच्च न्यायालयाच्या नियंत्रणाखाली या न्यायालयाचे कार्य चालते.

***हे तुम्हाला माहीत असू द्या :***
*राज्याचा कारभार सूरळीतपणे चालविण्यासाठी कर्नाटक राज्य 4 विभागात विभागले आहे.*
*1) बेंगळुरु 2) म्हैसूरु*
*3) गुलबर्गा 4) बेळगांवी*

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

**लोक अदालत :** भारतामध्ये कायदेशीर कार्यपध्दती ही अतिशय वेळखाऊ व महागडी आहे. त्याला पर्याय म्हणून सरकारने वेगाने व कमी खर्चात काम करणाऱ्या इतर कायदेशीर संस्था स्थापन केल्या आहेत. 1985 सालापासून त्या अस्तित्वात आल्या. त्यापैकीच एक म्हणजे लोक न्यायालये किंवा 'लोक अदालत' होय. ज्या दोन पक्षकारांना आपले खटले सामोपचाराने मिटविणे मंजूर असते असे खटले येथे चालविले जातात.

गुजरात, नवी दिल्ली, कर्नाटक व इतर काही राज्यात मध्ये लोक अदालत सध्या कार्यरत आहेत. सर्वोच्च न्यायालयाचे काही न्यायाधीश, समाजसेवक आणि कायद्याचे पदवीधर तरुण हे या न्यायालयाचे सदस्य असू शकतात. ज्या खटल्यांचा इतर न्यायालयाने किंवा उच्च न्यायालयांने निकाल दिलेला नाही असे खटले लोक अदालतीत सामोपचाराने मिटविले जातात.

लोक अदालतीच्या कामकाजाची लोकांकडून प्रशंसा झाली आहे : प्रामुख्याने तीन वैशिष्टयामुळे.

1. सामोपचारावर भर दिला जातो.
2. ती पद्धत वेगवान व स्वस्त आहे.
3. इतर न्यायालयावरील कायद्याचे ओझे (भार) कमी करणे.

या न्यायालयात वाहन अपघात, जमीन ताबा बँकेच्या व्यवहाराविषयक, विवाह आणि निर्वाह भत्ता मजुरांचे प्रश्न इ. विषयक खटले या न्यायालयात विचारात घेतले जातात. ही न्यायालये जिल्हा कायदा अधिकारी मंडळ (District Law Authority) किंवा तालुका कायदा अधिकारी मंडळ यांच्यातर्फे स्थापन केली जातात. त्यामध्ये दोन मध्यस्थी असतात. त्यापैकी एक सरकारी सेवेत असतो व दुसरा सामाजीक स्वयंसेवक असतो.

लोक अदालतमध्ये दिलेले निर्णय हे अंतिम असून दोन्ही पक्षकारांना बंधनकारक असतात. या निर्णयाविरुध्द कोणत्याही न्यायालयात अपील करता येत नाही. या निर्णयाचा न्यायालयाने दिलेल्या निर्णया इतकाच आदर असतो.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

## स्वाध्याय

**I. खालील रिकाम्या जागी योग्य शब्दा भरा :**

1. सर्वोच्च न्यायालयाची स्थापना ______ रोजी झाली.
2. संविधानाच्या 32 व्या कलमानुसार जारी केलेल्या विशेष आदेशांची संख्या______.

3. दंडन्यायालयाची स्थापना _______ रोजी करण्यात आली.

4. सर्वात कनिष्ठ जमीन महसूल न्यायालय _______ हे होय.

**II. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :**

5. सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशाची नियुक्ती कोण करते? यांची आवश्यक पात्रता सांगा?

6. सर्वोच्च न्यायालयाची कार्ये स्पष्ट करा.

7. दिवाणी न्यायालयांतर्गत कोणती कनिष्ठ न्यायालये येतात?

8. लोक अदालत स्थापन करण्याचा उद्धेश काय? लोक अदालत न्यायालयाची स्थापना केव्हा झाली?

**III. उपक्रम :**

1. तुमच्या शहरातील वकीलना भेटा आणी सर्वोच्च न्यायालया संदर्भात अधिक माहिती जाणून घ्या?

2. तुमच्या जवळच्या क्षेत्रातील खालच्या स्तरावरील न्यायालयाना भेट द्या, तेथील परिस्थीती पहा आणी तुमच्या अनुभवाचा एक संक्षिप्त अहवाल तयार करा.

**IV. प्रकल्प :**

1. वृतपत्रातून आलेले उच्च न्यायालयाच्या निकालाचे अहवाल गोळा करा आणि अल्बम तयार करा.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

***

## प्रकरण - 9

# कुटुंब

F1Z8F7

***या प्रकरणातून आपण खालील गोष्टी जाणून घेऊ :***

- *कुटुंबाचा अर्थ.*
- *कुटुंबातील सदस्यांचे नाते.*
- *व्यक्तीच्या विकासाचे टप्पे.*

### कुटुंब :

कुटुंब ही भारताची प्राचीन वारसा पद्धत आहे, कुटुंब ही आई, वडील, मुले आणि नातवंडे याच्यातील नातेसंबंधाची व्यवस्था आहे. हा एक समाजातील घटक आहे त्यापासून समुदायाची प्रगती होऊन राष्ट्र बांधले जाते. (राष्ट्र निर्माण होते.)

कुटुंब भावनिक आधारावर उभे आहे. मातृप्रेम, पितृ वात्सल, पती-पत्नी प्रेम, वैवाहिक-सामंजसपना, मुले जन्माला घालण्याची इच्छा, पालनपोषण या भावनांवर कुटुंब आधारित आहे.

समकालीन भारतीय कुटुंबात, माता आणि वडील निर्णय घेण्यापूर्वी त्याच्या मुलांशी सल्लामसलत करतात. कुटुंबाच्या निर्णय प्रक्रियेत आईची भूमिका महत्त्वाची असते. मग ते साहित्य खरेदी असो, भेटवस्तू असो किंवा मुलांची शिस्त असो अधिकाधिक भूमिका बजावण्यात आईची समान भूमिका असते.

### कुटुंबाची लक्षणे :

हे कुटुंबाच्या सर्व व्यवस्थेचे केंद्र आहे. ज्यामध्ये कुटुंब सार्वत्रिक आहे. सर्व देशांम ध्ये, शेजारी कुटुंबे खेडे, नगर, राष्ट्र निर्माण होते. कुटुंबातील सदस्य बालपणापासून आपली सामाजिक जबाबदारी समजतात आणि त्याना सहकार्याची जाणीव असते. कुटुंब हे समाजाच्या चालीरिती (रिती रिवाज) नैतिक नियम आणि वर्तनाद्वारे (वागणुकीद्वारे) नियंत्रित असते. कुटुंब हे सर्वव्यापी राज्य आणि वारसा परंपरागत घटक आहे. असे म्हणता येईल.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**आई- वडिल, पती-पत्नी आणि मुले :** सर्व कालीन आणि सार्वत्रिक वैवाहिक संसारीक महत्व प्राप्त झालेली सामाजिक संस्था आहे. आई-वडिल पती-पत्नी आणि आपल्या मुलांना संबंधीत परस्पर हक्क संरक्षण करणे, भारतातील पारंपारिक पद्धतीनुसार पत्नी आणि मुलांचे (संगोपन) पालनपोषण आणि संरक्षण करणे पतीचे कर्तव्य आहे. मुलांचे पालनपोषण आणि शिक्षण देणे आई-वडिलांचे कर्तव्य आहे. विशेषकरून भारतामध्ये वृद्धापकाळात आई वडिलांची काळजी आणि शुश्रूषा, संरक्षण करणे मुलांचे कर्तव्य आहे.

**बालपण आणि तारुण्य :** एखाद्या व्यक्तीच्या सामाजिक विकासाच्या टप्प्यात बालपण आणि तारुण्य महत्वाचे असते. मुल केवळ मातृभाषा प्रथम जाणत नाही, तर त्याच्या सान्निध्यातून मुलभूत सामाजिक कल्पनाही शिकते. कौटुंबिक आणि समाजात वाढलेले मुल. योग्य वैशिष्ट्ये विकसित करते. सर्वामध्ये मिसळून नेतृत्वाच्या गुणांना मूर्त रूप देते सामाजिक दृष्टीकोन, मागण्या आणि निर्कषांचा मुलावर प्रभाव पडतो. आणि एक सामाजिक संबंध तयार होतो तारुण्यात स्नेह स्वातंत्र्य संरक्षण स्वीकृती यासाठी प्रयत्न करतो. या वयोगटात विकसित झालेली वृत्ती आणि मते तारुण्य आणि वृध्दापकाळापर्यंत चालू राहतात.

**कुटुंब आणि पिढ्या :** कुटुंब अनेक पिढयासाठी उभे राहते. कुटुंबात अनेक पिढ्याचे रक्ताचे नाते असते हे सर्व समाजात आढळते आजी आजोबा पहिल्या पिढीत (Grand Parents) आणि पालक (दुसरी पिढी) पिढीत सामिल होतात. (parents) मुले (children) तिसप्या पिढीत सामिल होतात. अशा प्रकारे पिढयानपिढ्या सदस्यांच्या आधारावर कुटुंबांची विभागणी केली जाते.

I. आई वडिल आणि मुले रहात असणाऱ्या कुटुंबाला केंद्र कुटुंब / विभक्त कुटुंब म्हणतात (किमान दोन पिढ्या)

II. आई- वडिल, मुले, नातवंड, यांच्या रक्ताच्या नातेवाईकांचे कुटुंब असते त्याला अविभक्त / विस्तृत कुटुंब म्हणतात (Joint Family) कमीत कमी तीन/ चार पिढ्या नांदत असतात.

**कुटुंबाचे प्रकार :** कुटुंबाच्या विविध तत्वावर आधारित कुटुंबाचे वर्गीकरण केले आहे. पितृसत्ताक आणि मातृसत्ताक कुटुंब (मातृ प्रधान कुटुंब व पितृप्रधान कुटुंब) कुटुंबाच्या आकारावर आधारित विभक्त आणि अविभक्त कुटुंबाचे प्रकार पाहू शकतो.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

**1. पितृप्रधान कुटुंब :** या पद्धतीत वडील हे कुटुंब प्रमुख असतात संपत्तीचा हक्क व इतर हक्क आणि व्यवहार चालविण्याचा हक्क असतो त्या कुटुंबाला पितृप्रधान कुंटुंब म्हणतात पितृप्रधान कुटुंब प्राचीन भारत, चीन, रोम, इजिप्त, देशात अनादिकाळापासून आजतागायत आढळून येते.

**2. मातृप्रधान कुटुंब :** या कुटुंबामध्ये महिला ही कुंटुंब प्रमुख असते. तिच्या नावावर मालमत्तेची मालकी आणि सर्व व्यवहार आईच्या नावाने चालतात भारतातील केरळमधील म लबार नायर कुंटुंबात व ईशान्य भारताच्या आदिवासी समुदायात मातृप्रधान कुटुंबे आढळतात.

**3. आधुनिक केंद्र कुटुंब:** कुंटुंब रचना व त्यामध्ये राहणाऱ्या पिढ्यांच्या संख्येवर आधारित केंद्रकुटुंब, अविभक्त कुटुंब, विस्तृत कुटुंब असे वर्गीकरण करतात. आईवडिल व अविवाहित मुले राहात असणाऱ्या कुंटुंबाला केंद्र कुटुंब असे म्हणतात. केंद्र कुटुंबाला मुळ कुटुंब, प्राथमिक कुटुंब वैयक्तीक कुटुंब, विभक्त कुटुंब, असेही म्हणतात केंद्र कुटुंबाची आधुनिक समाजात संख्या जास्त आहे. व्यक्तीवाद वैयक्तिक सुख स्वयंपूर्णता मालमत्ता अधिकार, बदलेली सामाजिक मूल्ये, भौगोलिक आणि सामाजिक रचना, विज्ञान आणि तंत्रज्ञानातील विकास, औद्योगिकरण, शहरीकरण, लोकशाही व समानतेची तत्वे, धार्मिक प्रभाव कमी होणे आणि लौकीक मनोभावनाचा जास्त प्रसार, स्त्री स्वातंत्र या घटकांमुळे केंद्रीय कुटुंबाची संख्या दररोज वाढण्यांचे कारण ठरले आहे.

केंद्र कुटुंबाची प्रमुख वैशिष्ट्ये खालील प्रमाणे आहेत.

1) आधुनिकता
2) गुंतागुंत (जटिलता)
3) छोटे कुटुंब
4) सोपे सामाजिक नियंत्रण
5) सदस्यांना जादा स्वातंत्र्य

**अविभक्त कुटुंब :**

अविभक्त कुटुंबामध्ये आजी, आजोबा त्यांची मुले, नातवंडे, पणत्वंडे अशी दोन किवा दोनापेक्षा जास्त पिढयांचे लोक एकत्र एकाच घरात राहतात. एका स्वयंपाकरघरातील जेवन व्यवस्था समान मालमत्ता असणारे आणि एकत्रितणे धार्मिक विधी करणारे यामध्ये सर्व सदस्य एकाच रक्तातल्या नात्याचे असतात.

> ***उपक्रम :***
> *तुम्ही स्वतः चर्चा करा-तुमच्या घरातील वडिलधाऱ्या व्यक्तीशी चर्चा करुन वंशावळीचा नकाशा काढा.*

©KTBS NOT TO BE REPUBLISHED



अविभक्त कुटुंब

**अविभक्त कुटुंबाची वैशिष्टये**

**मोठा आकार :** रक्तातील नातेवाईक एकाच छताखाली निरंतर एकत्र राहतात कुटुंबाचा आकार मोठा असतो.

**मालमत्ता :** कुटुंबातील सर्व सदस्य मालमत्तेचे म ालक असतात असे मालकीचे संपादन तसेच संपतीचा वापर सामंजस्याने होतो. सभासदांच्या परस्पर सहकार्याने अविभक्त कुटुंब एकत्र येते त्याचा मालक विश्वस्त म्हणून काम करतो - वडिलधाऱ्या सभासदाच्या संमतीने मालमत्तेची विक्री/खरेदी होत असते.

> **उपक्रम :**
> *तुमच्या आजोबाच्या काळातील अविभक्त कुटुंबातील संख्या स्त्री पुरुष आणि त्यानी पार पाडलेल्या जबाबदाऱ्याची माहिति तुमच्या वडिलाकडून मिळवा.*

**निवास :** अविभक्त कुटुंबातील सर्व सदस्य एकाच छताखाली राहतात मुलगा आपल्या पत्नी मुलाबाळासमवेत दुसरीकडे राहत असतील तरीसुद्धा मुले कुटुंबाची नाती जपतात ते नवीन कुटुंबे ही अविभक्त कुटुंबाची शाखा म्हणून ओळखली जाते.

> **उपक्रम :**
> *कुटुंबातील वडिलधाऱ्याची सुस्थिती सेवा काळजीची कमरता असल्याने वृद्धाना अनाथाश्रमात राहावे लागते. त्याकरिता आदर्श पालन करणारी यादी करा.*

**धर्म :** अविभक्त कुटुंबातील सदस्य एकाच धर्माचे पालन करतात. त्यांची प्रार्थना व धार्मिक आचरण एकाच प्रकारचे असते.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

**स्वयंपूर्णता (स्वयंपूर्ण घटक) :** अविभक्त कुटुंब हे जवळजवळ स्वयंपूर्ण घटक आढळून येतो. कुटुंबातील सर्व सदस्यांच्या जीवनातील आवश्यक गरजा व्यवस्थित भागविल्या जातात. कुटुंबातील सर्व सदस्य कामे वाटून घेतात. श्रम, वय व लिंगावर आधारित (कार्याची) कामाची विभागणी होते.

**एकाधिकार :** अविभक्त कुटुंबामध्ये सामान्यतः ज्येष्ठ सदस्याकडे कुटुंबाचे सर्व अधिकार व जबाबदाऱ्या असतात. कुटुंबातील सर्व प्रमुख निर्णय घेण्याचे पूर्ण अधिकार त्यांच्याकडे असतात. अधिकाराचे हस्तांतरीकरण ज्येष्ठतेवर आधारित असते.

## स्वाध्याय

**I. रिकाम्या जागी योग्य शब्द भरा :**

1. ________ हा समाजाचा प्राणकोष आहे.
2. वडील हे कुटुंबप्रमुख असणाऱ्या कुटुंबाला ________ म्हणतात.
3. केरळमधील मलबार नायरांमध्ये ________ कुटुंब व्यवस्था आढळून येते.

**II. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :**

4. कुटुंब हा समाजाचा घटक आहे. स्पष्टकरा.
5. कुटुंबाचे प्रकार कोणकोणते?
6. अविभक्त कुटुंब म्हणजे काय?
7. केंद्र कुटुंब म्हणजे काय?
8. कुटुंबाची वैशिष्टये कोणती?
9. व्यक्तीच्या सामाजिक विकासाच्या टप्प्यात कुटुंबाची भूमिका कोणती?
10. अविभक्त कुटुंबाची वैशिष्टये कोणती?
11. आधुनिक केंद्र कुटुंबाची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. कारणे द्या.

**III. उपक्रम**

1. विभक्त - संयुक्त कुटुंबांचे फायदे आणि तोटे चर्चा करा.
2. आदिवासी समुदायाची कुटुंब पद्धती जाणून घेण्यासाठी आदिवासी वस्त्याांना भेट द्या

**IV. योजना.**

**1.** मातृसत्ताक - पितृसाक कुटुंब पद्धतीबद्दल अधिक माहिती गोळा करा.

***

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

भुगोलशास्त्र

प्रकरण - 10

# आपले राज्य-कर्नाटक-प्राकृतिक विभाग

N4N1X4

**प्रस्तुत प्रकरणात तुम्ही या गोष्टी शिकणार आहात.**

- *आपल्या भूमीची थोरवी आणि परंपरा.*
- *कर्नाटक या नांवाची पार्श्वभूमी आणि राज्याचा उगम.*
- *कर्नाटकाचे भौगोलिक स्थान, आकारमान, भू व जलसीमा आणि शेजारील राज्य.*
- *कर्नाटकाची प्राकृतिक वैशिष्ट्ये.*
- *कर्नाटकाचे प्राकृतिक विभाग.*
- *कर्नाटकातील पर्वत आणि उंच शिखरे.*

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

मागील इयत्तेत राज्याच्या नैसर्गिक आणि भौगोलिक घटकांचा अभ्यास तुम्ही केला आहे. आता आपण आपली भूमी कन्नडभूमी कर्नाटकाबद्दल जाणून घेऊया. स्वतःची अशी खास परंपरा आणि संस्कृती जोपासलेले हे भारतातील एक राज्य आहे या राज्याला विस्मयकारी स्थान आहे. शिवाय भौगोलिक वैविध्य, वनस्पती व प्राणी वेगवेगळ्या प्रकारची माती. जलसंपदा, खनिज, मानव संसाधन यांचे वरदान लाभले आहे साहित्य, कला, संस्कृती आणि धार्मिक, आध्यात्मिक, ऐतिहासिक प्रसिद्धि प्राप्त तिर्थक्षेत्रांनी पावन झालेली ही समृद्ध भूमी आहे. या प्रदेशाला नैसर्गिक सौंदर्य, अगणित वन्यजीव यामुळे जागतिक वारश्यात स्थान प्राप्त झाले आहे.

**नावाची पार्श्वभूमी:** कर्नाटक हे नाव प्राचिन काळापासूनच प्रचलित आहे. या भूमीला करनाडू (कर+नाडू काळ्या मातीची भूमी) असे संबोधले जाते. प्राचिन तामिळ साहित्य 'शिलप्पदिकारम्'मध्ये कर्नाटकाचा उल्लेख 'करूनाट' असा झाला आहे.

करुनाट म्हणजे वैभव संपन्नभूमी आणि उंचावर असलेले राज्य. नृपतुंगाच्या दरबारातील कवी श्रीविजय यांच्या कविराजमार्ग या व्याकरण साहित्यात कर्नाटकातील कावेरी ते गोदावरी नदीपर्यंत विस्तारले होते अशी नोंद आहे. 1799 च्या चौथ्या अँग्लो-म्हैसूर युद्धानंतर म्हैसूरचे पूर्वीचे संस्थान अस्थित्वात आले. 1956 च्या राज्य पुनर्रचना कायद्यांतर्गत, बाँम्बे, हैद्राबाद, मद्रास आणि कोडगू प्रांतातील कन्नड भाषिक भागांना म्हैसूर राज्यात एकत्रीत केले. यांप्रमाणे 1 नोव्हेंबर 1956 ला विशाल म्हैसूर राज्य अस्तित्वात आले. या घटनेच्या स्मरणार्थ दरवर्षी 1 नोव्हेंबर राज्योत्सव दिन साजरा केला जातो. 1 नोव्हेंबर 1973 मध्ये कन्नडिगांच्या आग्रहास्तव आपल्या राज्याचे नामकरण कर्नाटक असे झाले.

**भौगोलिक स्थान :**

भारतातील 28 राज्यापैकी कर्नाटक हे एक राज्य होय. दक्षिण भारतात पश्चिम द्विपकल्पीय भागात वसलेला हा प्रांत आहे. हा $11^0:31^{'}$ आणि $18^0:45^{'}$ उत्तर अक्षांश तसेच $74^0:12^{'}$ आणि $78:40^{'}$ पूर्व रेखांशामध्ये स्थित आहे. बिदर जिल्ह्यातील औराद तालुक्यापासून दक्षिणेतील चामराजनगर जिल्हयातील उत्तरेच्या टोकापर्यंत त्याची लांबी 750 कि.मी. आहे. पश्चिम ते पूर्व त्याची रुंदी 400 कि.मी. इतकी आहे. उत्तर कॅनरा जिल्ह्यातील कारवार हे पश्चिम टोकाला आहे. तर कोलार तालुक्यातील मुळबागल तालुका हा पूर्व टोकाला आहे. कर्नाटकाला भू आणि जलसीमा सुद्धा आहेत. पश्चिमेला अरबी समुद्र, उत्तरेकडे महाराष्ट्र राज्य, पुर्वेकडे आंध्र प्रदेश, ईशान्येला तेलंगना दक्षिण आणि आग्नेयेला तमिळनाडू नैऋत्येला केरळ, वायव्येला गोवा या राज्याच्या सीमा ’लाभलेल्या आहेत, कर्नाटक राज्याचा आकार काजूसारखा आहे.




भारताच्या नकाशात कर्नाटकाचे स्थान

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

**विस्तार :**

कर्नाटक राज्य 1,91,791 चौरस. कि.मी. मध्ये विस्तारलेला आहे. आकारमानानुसार हे भारतातील आठवे राज्य आहे. 2011 च्या जनगणनेनुसार 6,10,95,297 लोकसंख्या असल्यामुळे नववे स्थान प्राप्त झाले आहे. भारताच्या 5.83% इतका भूभाग कर्नाटकाने व्यापला आहे.

> ***हे माहित असू द्या :***
>
> *केंद्र सरकारमध्ये विशेष स्थान प्राप्त झालेली ठिकाणे हैद्राबाद, घटनेच्या 371J कलमानुसार कल्याण कर्नाटकातील जिल्हे, बिदर, रायचूर, कलबूर्गी, कोप्पळ, यादगीर, बळ्ळारी, विजयनगर ही होत.*



© KTBS NOT TO BE REPUBLISHED

जिल्हा आणि जिल्हा केंद्र

आत्ता आमच्या राज्यात 31 जिल्हे आहेत. जिल्हयात एकूण 239 तालूके, 745 उपविभाग (hoblis), 347 शहरे आणि 29483 'खेडी आहेत. बेळगावी जिल्हा विस्ताराने सर्वात मोठा तर बेंगळूरू ग्रामीण हा सर्वात लहान आहे. बेंगळूरू ही कर्नाटकाची महसूल राजधानी आहे. व्यवस्थापनेच्या दृष्टीने याचे चार भाग पाडले आहेत ते म्हणजे बेंगळरु म्हैसूरु, बेळगांवी आणि कलबुर्गी हे होय.

## प्राकृतिक विभाग

कर्नाटक राज्य हे प्राकृतिक वैविध्यांनी युक्त आणि भारतातील द्विपकल्पांचा एक भाग आहे. याचा दक्षिण भाग उंचसखल आणि अनेक चढउतारांचा तर उत्तर भाग विस्तिर्ण अशा सपाट मैदानाने व्यापलेला आहे. इथल्यां. किनारपट्टया आणि डोंगराळ भाग यामध्ये वैविध्य आहे. इथला भुभाग पुर्वेकडे उतरता तर पश्चिमेकडे चढता आहे. अनेक पर्वतरांगा या दऱ्याखोऱ्यानी आणि अरूंद खिंडीनी व्याप्त आहेत. राज्याचा बहुतेक प्रदेश हा समुद्रसपाटी पासून 450 ते 900 मीटर उंचीवर आहे. काही भाग तर समुद्रसपाटीपासून 1800 मीटर इतक्या उंचावर आहे.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

येथील भुस्वरूप आणि स्वाभाविक विभागानुसार कर्नाटकाचे तीन भाग पाडण्यात आलेले आहेत. 1. किनारपट्टीचा प्रदेश 2. मलनाडू प्रदेश. 3. पठारी प्रदेश.

### 1. किनारपट्टीचा प्रदेश :

भाषावार प्रांतरचनेमूळे कर्नाटकाला किनारपट्टी आणि किनाऱ्यालगतची मैदाने लाभली आहेत. हा स्वाभाविक विभाग अरबी समुद्र आणि मलनाडच्या डोंगर रांगात विस्तारलेला आहे. ही किनारपट्टी दक्षिणेकडील मंगलूरू पासून उत्तरेकडे कारवारपर्यंत 320 कि.मी. पर्यंत विस्तारलेली आहे. तिची रुंदी 12 ते 64 कि.मी. आहे. हा प्रदेश दक्षिणेकडे रूंद-तर उत्तरेकडे अनेक उतारामुळे चिंचोळा झाला आहे. याची उंची समुद्रसपाटीपासून 200 मी पेक्षा अधिक आहे. या प्रदेशाला **'कॅनरा किंवा कर्नाटक किनारपट्टी'** म्हटले जाते. या किनारपट्टीवर अनेक नद्या वेगाने वहात समुद्राला मिळतात. त्यामुळे याठिकाणी अनेक खाजण किंवा उथळतळी (Lagoon) तयार झाली आहेत. पण नदीच्या मुखाजवळ कोणताही त्रिभूज प्रदेश तयार झालेला नाही.

या किनारपट्टीवर अनेक बंदरे आहेत. **'नवे मंगळूर'** हे कर्नाटकातील सर्वात मोठे बंदर आहे. भटकळ, माल्पे, कारवार, कुमठा, बेळकेरी, होन्नावर ही. मासेमारीची केंद्रे

आहेत. सुंदर समुद्र किनारे प्रवाशांना आकर्षित करतात मंगळूरजवळील सोमेश्वर बीच, पानंबूर, उल्लाळ, उडपीजवळील माल्पे, कारवार होन्नावरजवाळील मुरडेश्वर मरवंते आणि गोकर्णजवळील ओम बिच हे प्रसिद्ध सागरकिनारे आहेत. या समुद्र किनाऱ्यालगत असंख्य छोटी छोटी बेटे आहेत. त्यापैकी माल्पे जवळील सेंट मेरीज द्विप कारवारजवळील अंजदीव, देवगड, कांजीगुड्ड ही ठळक द्विपे आहेत. किनाऱ्यालगतच्या लोकांचा मासेमारी हा प्रमुख व्यवसाय आहे. कृषि व्यवसाय हा दुसरा महत्वाचा व्यवसाय आहे. काजू नारळ, सुपारी, वेलदोडे आणि भात यासारखी पिके पिकविली जातात दक्षिण कॅनरा, उत्तर कॅनरा, उडपी हे कर्नाटकाच्या समुद्र तटावरील जिल्हे आहेत.

**2. मलनाडू प्रदेश :**

आपल्या राज्यातील पश्चिम घाटाचा उल्लेख मलनाडू अथवा पर्वतमय प्रदेश असा केला जातो. यांना सहयाद्री पर्वत असेही म्हटले जाते. मलनाड हा प्रदेश किनारपट्टीला समांतर उत्तर ते दक्षिणपर्यंत विस्तारला आहे. या पर्वत रांगामध्ये पश्चिमेकडे खडे उतार तर पूर्वेकडे उंच टेकड्या असल्यामुळे या प्रदेशाला घाट म्हटले जाते. त्यांची लांबी 650 कि.मी. तर रुंदी 50 ते 76 कि.मी. आहे. समुद्रसपाटीपासूनची सरासरी उंची 900 ते 1500 कि.मी. आहे. या डोंगररांगा अरबी समुद्रावरून वाहाणाऱ्या पावसाच्या ढगांना अडवितात. त्यामुळे या ठिकाणी 200 से.मी. पेक्षा अधिक पाऊस पडतो. या भागातील सर्वात उंच पर्वत म्हणजे मलयगिरी, कुद्रेमुख, कलहत्तगिरी, रूद्रगिरी आणि देवरमन्न बेट्ट हे सगळे पर्वत चिक्कमंगळूर जिल्ह्यात आहेत. त्याशिवाय बल्लाळरायणदुर्ग, मेर्तिगुड्ड, पुष्पगिरी आणि कोडचाद्री हे पश्चिम घाटातील इतर उंच पर्वत आहेत. यामध्ये मलयगिरी (1913 मी.) हा राज्यातील सर्वात उंच पर्वत आहे.

***तुम्हाला हे माहित असू द्या :***

- *नवे मंगळूर या बंदराला कर्नाटकाचे प्रवेशव्दार असे म्हणतात.*
- *सेंट मेरी बेटाला स्थानिक तोन्सेपार म्हणून संबोधतात.*
- *मुरडेश्वर जवळील नेत्राणी बेटावर कबुतरांची संख्या अधिक आहे त्यामुळे त्याला 'कबुतर बेट' म्हटले जाते.*

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

**3. पर्वत आणि घाट :**

पूर्वेकडील मैदाने ते किनारपट्टीची मैदाने या पलीकडून जाणाऱ्या पश्चिम घाटातील रस्त्यांना पर्वतीय रस्ते किंवा घाटमाथा असे म्हटले जाते. यातील प्रमुख घाट विभाग म्हणजे.

1) **चारमडी घाटः** हा घाट मंगळूरू आणि चिक्कमंगळूरला जोडतो.




2) **शिराडी घाटः** हा हासन ते सक्लेशपुर आणि मंगळूर या मार्गांना जोडतो

3) **आगुंबे घाटः** हा शिमोगा आणि उडपीला जोडतो.

4) **हुलीकल घाट :** हा शिमोगा आणि कुंदापूरला जोडतो.

मलनाड प्रदेशात मुसळधार पाऊस पडतो. त्यामुळे तेथे सुंदर, घनदाट, अरण्ये आढळतात. या ठिकाणी अनेक नद्या उगम पावतात आणि जेव्हा त्या उंच उतारावरून वेगाने खाली येतात तेंव्हा चित्ताकर्षक धबधबे तयार होतात. यामध्ये जोगफॉल्स (शरावती नदी) हा भारतातील सर्वात उंच धबधबा आहे. यानंतर उंचळ्ळी मागोड, गोकाक, शिवनसमुद्र जलप्रपात हे इतर प्रमुख धबधबे आहेत. या नद्यांमुळे दऱ्या आणि खिंडी तयार झाल्या आहेत. तेथे कॉफी चहा, रबर आणि मसाले यांची लागवड मोठया प्रमाणात होते. चिक्कमंगळूरमध्ये मोठ्या प्रमाणात कॉफी पिकविली जाते. म्हणून याला **'कॉफीचा प्रदेश'** म्हटले जाते. थंड हवामनामुळे कोडगु जिल्हयाला **'कर्नाटकचे काश्मीर'** म्हणून ओळखले जाते. कोडगु जिल्हात संत्र्याचे पिक मुबलक प्रमाणात घेतले जाते म्हणून याला **'संत्र्याची भुमी'** असे म्हटले जाते सध्या मलनाड हे 'जैववैविधता क्षेत्र' म्हणून ओळखले जाते. हासन, कोडगू, शिमोगा आणि चिक्कमंगळूर हे मलनाडूचे जिल्हे आहेत.

> **उपक्रमः**
> *तुमचा जिल्हा कोणत्या भौगोलिक विभागात मोडतो? तुमच्या शेजारील जिल्हयांची नावे लिहा तुमच्या जिल्हयांच्या वैशिष्ठयांची यादी तयार करा.*

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

**3. पठारी प्रदेश मैदान :**

मलनाडच्या पूर्वेकडे 450 ते 760 मी. उंचीचे विस्तिर्ण मैदान आहे. या प्रदेशाला कृष्णा तुंगभद्रा आणि कावेरी नद्यांचा पाणीपुरवठा झाला आहे. पुर्वेकडे जमीनीचा उतार तर उत्तर ते दक्षिणेला उंच चढाव आहेत. या महामैदानाचे दोन विभाग आहेत. I) उत्तरेकडचे पठार II) दख्खनचे पठार

**I. उत्तरेकडचे पठार :** हे काळ्या मातीने युक्त असे विस्तिर्ण पठार आहे. हे समुद्रसपाटीपासून सुमारे 365 ते 610 मी उंचीवर आहे. येथे पर्वत आणि टेकड्या आढळून येतात. यामध्ये नरगुंदे पर्वत, पारसगड टेकड्या, इळकल टेकड्या या प्रमुख आहेत. सौंदत्ती आणि बदामीच्या पूर्वेकडील टेकड्या चुनखडीच्या दगडांनी युक्त आहेत. घटप्रभा नदीवरील गोकाकचा धबधबा हा या प्रदेशातील सर्वात महत्वाचा धबधबा आहे. हा 52 मी. उंचीवरून खाली कोसळतो. त्यामुळे ते एक प्रेक्षणीय स्थळ आहे. याचबरोबर सोगलचा धबधबा, छाया भगवती हे इतर प्रमुख धबधबे आहेत. बिदर, विजापूर गुलबर्गा, यादगिरी, गदग, कोप्पळ, रायचूर, बळ्ळारी, हावेरी, बागलकोट, धारवाडचा कांही भाग व बेळगांवचा काही भाग हे जिल्हे उत्तरेकडील मैदानात आहेत. या प्रदेशात उन्हाळ्यात खूप उष्णता असते. म्हणून या प्रदेशाला 'उच्च तापमानाची भूमी' असे म्हटले जाते. मक्का, बाजरी, शेंगा, कापूस, डाळी, कडधान्ये या सारखी कोरडवाहू पिके मोठ्या प्रमाणात पिकवली जातात.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED



**मलयगिरी**



**मधुगिरी - अखंड शिलापर्वत्त**

**II. दख्खनचे पठार :** हा प्रदेश उत्तरेकडे तुंगभद्रा नदीच्या खोऱ्यापासून ते दक्षिणेकडील चामराजनगर जिल्हयापर्यंत पसरला आहे. हे मैदान लाल मातीचे आहे. ही भूमी उंच सखल असून याची उंची 900 ते 975 मी. इतकी आहे. उत्तरे कडील

> ***कृती :***
> *तुमच्या जिल्हयाच्याः स्वाभाविक वैशिष्ठ्यांबद्दल माहिती लिहा.*

मैदानापेक्षा हा प्रदेश उंच असून पूर्वेकडे उताराचा आहे. हा अनेक टेकड्यांनी बनलेला आहे. यामध्ये चित्रदुर्ग टेकड्या बेंगळुरू ग्रामीण जिल्हयातील नारायणदुर्ग, सावनदुर्ग शिवगंगा, आणि तुमकूर जिल्हयातील मधुगिरी टेकड्या या महत्वाच्या टेकड्या आहेत. मधुगिरी ही अशियातील सर्वात मोठी अखंड पाषाणातील टेकडी आहे. चिक्कबळ्ळापूर जिल्हयातील नंदी, चन्नकेशव केवळेदुर्ग आणि स्कंदगिरी (हरिहरेश्वर टेकडी), मंड्यातील आदी चुंचनगिरी टेकड्या चामराजनगर जिल्ह्यातील बेळगिरीरंगन टेकड्या, महादेश्वर टेकड्या, गोपालस्वामी टेकड्या, म्हैसूर जिल्हयातील चामुंडी टेकड्या या महत्वाच्या आहेत. हा प्रदेश पर्जन्यछायेचा भाग आहे. कावेरी, पालार आणि पेन्नार या येथे वाहणाऱ्या प्रमुख नद्या आहेत. नाचना, भात, मक्का, ऊस, भुईमूग, भाजीपाला, फळे, फुले ही प्रमुख पिके आहेत. बेंगळूर शहर, बेंगळूर ग्रामिण, बेंगळूर दक्षिण (रामनगर), दावणगिरी, चित्रदुर्ग, तुमकूर, कोलार, मंड्या म्हैसूर आणि चामराजनगर हे जिल्हे दख्खनच्या पठारात आहेत.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

## स्वाध्याय

**I. खालिल रिकाम्या जागा योग्य शब्दांनी भरा :**

1. दरवर्षी आपण कर्नाटक राज्योत्सव ________ या दिवशी साजरा करतो.
2. कर्नाटक हे नांव ________ या साली आपल्या राज्याला प्राप्त झाले.
3. कर्नाटकांच्या पुर्वेला ________ हे राज्य आहे.
4. आकाराने सर्वात मोठा ________ हा जिल्हा आहे.
5. कर्नाटकाचे क्षेत्रफळ ________ चौ कि.मी. आहे.
6. ________ हे बेट माल्पे जवळ आहे.
7. कर्नाटकच्या पश्चिम घाटातील पर्वतरांगाणा ________ असे म्हणतात.
8. आगुंबे घाट ________ व ________ यांना जोडतो.
9. ________ या जिल्ह्याला कर्नाटकाचे काश्मीर म्हणून ओळखले जाते.

**II. खालील प्रश्नांची संक्षिप्त उत्तरे लिहा :**

10. कर्नाटकाचा अक्षांश आणि रेखांश विस्तार सांगा?
11. आपल्या शेजारील राज्यांची नांवे सांगा?
12. कर्नाटकाचे राज्य व्यवस्थापनासाठी पाडलेले चार भाग कोणते ?

13. कर्नाटक हे भारताच्या कोणत्या भागात आहे ?

14. कर्नाटकाचे प्रमुख स्वाभाविक विभाग लिहा.

15. मलनाडू प्रदेशाची वैशिष्ठ्ये लिहा.

16. कर्नाटकाच्या किनारपट्टी मैदानाची माहिती लिहा.

17. दक्षिण कर्नाटकातील प्रमुख टेकड्यांची नांवे लिहा.

18. पश्चिम घाटातील प्रमुख घाटमार्गांचा उल्लेख करा.

**III. जोड्या जुळवा :**

| अ | ब |
|---|---|
| i) जोग फॉल्स | a) मंगळूर |
| ii) ओमबीच | b) उत्तरेकडील पठार |
| iii) नंदीटेकड्या | c) शरावती नदी |
| iv) एकशिळा टेकडी | d) गोकर्ण |
| v) उष्ण प्रदेश | e) चिक्कबळ्ळापूर |
| | f) मधुगिरी |

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**IV. उपक्रम :**

1. कर्नाटकाचा नकाशा काढून त्यामध्ये जिल्हयाची नांवे, अक्षांश आणि रेखांश दर्शवा.
2. कर्नाटकाच्या नकाशात मलनाडु प्रदेश आणि किनारपट्टीचा प्रदेश दाखवून नांवे द्या. आणि कर्नाटकातील प्रमुख धबधब्यांची चित्रे संग्रहीत करा.

**V. प्रकल्प :**

1. तुमच्या शिक्षकांच्या मदतीने तुमच्या जिल्हयाचा अथवा नगराचा नकाशा काढा. त्याची अक्षांश आणि रेखांश स्थिती व शेजारील जिल्हे दर्शवा.

***

प्रकरण - 11

# कर्नाटकातील नैसर्गिक विविधता

I6D4K4

**या पाठाच्या अभ्यासाने तुम्ही खालील गोष्टी जाणून घ्याल :**

- *कर्नाटकाच्या हवामानाची प्रमुख वैशिष्ट्ये.*
- *कर्नाटकाचे हंगामी हवामान.*
- *कर्नाटकातील मोसमी पावसाचे वितरण आणि परिणाम.*
- *कर्नाटकातील मातीचे प्रकार आणि वितरण.*
- *नैसर्गिक वनस्पती आणि प्राणी यांचे प्रकार व वितरण.*

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

**कर्नाटकाचे हवामान :**

कर्नाटकामध्ये उष्णकटिबंधीय मान्सून हवामान आहे (Tropical Mansoon Climate). या हवामानाचे महत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे उन्हाळ्यात तापमान अतिशय उष्ण आणि दमट असते तर हिवाळा अतिशय थंड आणि कोरडा असतो. तरी इथले हवामान चांगले असते (modified). या विविधतेचे मुख्य कारण म्हणजे भौगोलिक स्थान, महासागर, नैसर्गिक विभाग, जंगले आणि मान्सून वारे होय. येथील वार्षिक तापमान आणि पावसाचे प्रमाण यामध्ये संपूर्ण राज्यभर विविधता दिसून येते.

**हवामानाचे ऋतू :** भारतातील ऋतूप्रमाणे कर्नाटकाच्या मोसमाचे चार प्रकार पडतात.

1. उन्हाळा (मार्च ते मे)
2. पावसाळा (जून ते सप्टेंबर)
3. मान्सूनचा परतीचा मोसम (आक्टोबर ते नोव्हेंबर)
4. हिवाळा ( डिसेंबर ते फेब्रुवारी)

**1. उन्हाळा :** या काळामध्ये तपमान खूप उष्ण आणि कोरडे असते. मार्चनंतर सर्व राज्यभर तपमानात वाढ होऊन एप्रिल आणि मे मध्ये कमाल तपमान असते. रायचूर मध्ये $45.6^0$ सेल्सियस तपमानाची नोंद आढळते. कर्नाटकातील सर्वात जास्त तपमान असणारे हे ठिकाण आहे. उत्तरेकडील पठारावरील कांही जिल्ह्यात उच्च तपमान आढळते. संपूर्ण राज्यात या काळात उच्च तपमान अनुभवयास मिळते. उत्तरेकडील पठारावर दक्षिणेकडील पठारापेक्षा

आर्द्रता कमी आढळते. उन्हाळ्यात बाष्पीभवनामुळे बाष्पयुक्त ढग निर्माण होऊन ढगांच्या गडगडाटासह विजांचा कडकडाट होऊन पाऊस पडतो. कांही ठिकाणी गारांचा पाऊस पडतो. सामान्यपणे दुपारच्या वेळी थोडाच पाऊस पडतो. या पावसामुळे कॉफी पिकाला चांगली फुले येतात म्हणून याला **'कॉफी कारंजा'** (चेरी ब्लॉसम रेन) म्हटले जाते. शिवाय आंब्याचे पिक परिपक्व होण्यास मदत होते. म्हणून याला **'आंबेसरी'** (माविन हुयलू) म्हटले जाते. राज्याच्या वार्षिक पावसाच्या सुमारे 7% पाऊस या मोसमात पडतो.

**2. पावसाळा :** या मोसमाला नैऋत्य मान्सून वारे असेही म्हणतात. अरबी समुद्रावरुन वाहणारे बाष्पयुक्त वारे पश्चिमघाट अडवितात परिणामी मुसळधार पाऊस पडतो. जसजसे आपण पूर्वे कडे जावे तसतसे पावसाचे प्रमाण कमी होत जाते. त्यामुळे पूर्वेकडचे मैदान पर्जन्यछायेच्या प्रदेशात परावर्तीत होते. 'आगुंबे' इथे सर्वात जास्त पाऊस पडतो म्हणून या ठिकाणाला दक्षिण भारताची चेरापुंजी म्हणतात. त्याच्या खालोखाल भागमंडल आणि हुलीकल ही जास्त पाऊस पडणारी ठिकाण होय. चित्रदुर्ग जिल्ह्यातील चळ्ळकेरे तालूक्यात 'नायकनहट्टी' हे कर्नाटकातील सर्वात कमी पावसाची नोंद असलेले ठिकाण आहे. या ऋतूमध्ये संपूर्ण राज्यात जास्त उष्ण तापमाना बरोबरच हवेमधे आर्द्रतेचे प्रमाण जास्त असते. सर्वत्र ढगाळ वातावरण असते. या हंगामात कर्नाटकामधे 80% पाऊस पडतो. त्यामुळे रबी (खरीप) पिकांना याची मदत होते.



**3. मान्सूनच्या परतीचा मोसम :** याला ईशान्य मान्सून वाऱ्याचा काळ म्हटले जाते. उष्णतापमानात वाढ अन हवेच्या दाबात घट निर्माण झाल्यामुळे वारे ईशान्येकडून नैऋत्येकडे वाहतात. हे वारे कोरडे असतात कारण ते जमिनीवरून वाहतात. बंगालच्या उपसागरावरुन वाहणारे वारे दख्खनच्या पठारावरील काही जिल्ह्यांना थोडासा पाऊस पाडतात. नोव्हेंबर डिसेंबर दरम्यान बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या वादळामुळे पाऊस पडतो. या मोसमामध्ये एकूण पावसाच्या 12% इतका पाऊस पडतो. या काळात हवामानात चढउतार असतो.

***उपक्रम :*** *उन्हाळा, पावसाळा आणि हिव्वाळा यापैकी तुम्हाला आवडणारा ऋतू कोणता ? का, कारणे सांगा.*

**4. हिवाळा :** या ऋतूमध्ये तपमान, आर्द्रता आणि पाऊस यांचे प्रमाण कमी असते. आकाश निरभ्र, निळे असते. सरासरी तपमान $25^0$ ते $27^0$ असते. जानेवारी महिन्यात सर्वात कमी तापमानाची नोंद होते, म्हणून या महिन्याला राज्याचा प्रवासी महिना म्हटले जाते. बेळगांवमध्ये $6.7^0$ से. अशी सर्वात कमी तपमानाची नोंद आढळते. उत्तरेकडील जिल्ह्यात कमी तपमान आढळते. मडीकेरी आणि बळ्ळारी येथे सर्वात कमी तपमान $10^0$ से. आढळून येते. हिवाळ्यात पावसाचे प्रमाण अत्यल्प असते. सरासरी पावसाच्या फक्त 1% पाऊस या कालावधीत पडतो. अनेकवेळा पहाटे दाट धुके पडतात.

## कर्नाटकातील माती

पृथ्वीवरच्या पृष्ठभागावरील पातळ थर म्हणजे माती होय. शेतीसाठी सुपिक मातीची आवश्यकता असते. कर्नाटकात विविध प्रकारची माती आढळते. या मातीमध्ये अनेक प्रकारची खनिजे आणि जिवाश्मे आढळतात. मातीचे चार प्रकार आहेत. 1. लाल माती 2. काळी माती 3. लॅटेराइट माती 4. किनारपट्टीवरील गाळाची माती.

**1. लाल माती :** या मातीमध्ये ग्रॅनाइट, मॅगनीज, आयर्न ऑक्साइडचा अंश असल्याने तिला लाल रंग प्राप्त होतो. या मातीमध्ये चुनखडी आणि मिठाचा अंश असल्याने नैट्रोजनचे प्रमाण कमी असते. त्यामुळे ती माती हलकी असते. या मातीचा थर पातळ असतो. लालमती जास्त सुपीक नसते. या मातीत पाणी धरुन ठेवण्याची क्षमता कमी असते. कर्नाटकात या मातीचे प्रमाण जास्त आहे विशेषत: दक्षिण कर्नाटकामध्ये नाचणा, ज्वारी, तंबाखू, शेंगा यासारख्या पिकांना पावसाची गरज असते. त्यांची वाढ या मातीत होते. पाणीपुरवठ्याच्या सोयी ज्या भागात आहेत तेथे भात, ऊस, बटाटा, भाजीपाला, केळी, नारळ आणि सुपारी पिकविली जाते. तूमकूर, बेंगळूर, बेंगळूर दक्षिण (रामनगर), चिक्कबळ्ळापूर, कोलार, चामराजनगर, मंड्या आणि म्हैसूर येथे लाल माती प्रमुख्याने आढळते.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

**2. काळी माती :** या प्रकारची माती बेसाल्ट खडकाच्या स्फटिकीकरणाने तयार होते. ॲल्युमिनियम, मॅग्नेशियम आणि आयर्न ऑक्साइड युक्त ही माती असते. म्हणून तिचा रंग काळा असतो. तिला काळी कपाशीची माती (Black cotton soil) म्हटले जाते. ही माती जास्त ओलावा टिकवून ठेवते. या सुपिक मातीत अनेक पिके घेतली जातात. उदा : कापूस, ज्वारी, सूर्यफूल, मिरची, भात आणि कांदा ही पिके या मातीत पिकतात. उत्तर कर्नाटकातील धारवाड, गदग, बळ्ळारी, कोप्पळ, कलबूर्गी, यादगीर, बागलकोट, बेळगांव आणि चित्रदुर्ग या जिल्ह्यात सामान्यपणे ही माती आढळते.




NOT TO BE REPUBLISHED

**3. लॅटेराइट सॉईल किंवा बाजूकडील माती:** ज्या ठिकाणी मुसळधार पाऊस आणि उच्च तपमान असते तेथे या प्रकारची माती आढळते. चुनखडी आणि सिलिका पावसाच्या पाण्यात पूर्णपणे विरघळतात आणि त्याचे खाली थर निर्माण होतात. लोह आणि ॲल्युमिनियम अविद्राव्य असल्यामुळे ते वरच्या थरात राहतात. ही माती पावसात मऊ तर उन्हाळ्यात कोरडी होते. त्यामुळे लॅटेराइट दगड (जांभा दगड) तयार होतात. या दगडाच्या विटा काढून बांधकामासाठी वापर केला जातो. या मातीत काजू, कॉफी, चहा, वेलदोडा, मिरी, रबर, नारळ आणि इतर पिकांची लागवड होते. उत्तर कॅनरा, उडपी, दक्षिण कॅनरा, चिक्कमंगळूर, शिमोगा आणि बेळगांवमध्ये या प्रकाराची माती जास्त आहे. तर बिदर, कोलार, बेंगळूर ग्रामीण आणि गुलबर्गा येथे काही प्रमाणात ही माती आढळते.

**4. किनारपट्टी वरील गाळाची माती :** नदी आणि समुद्रामुळे भूस्वरुपाची झीज होते, त्या झीजेमुळे या प्रकारची माती तयार होते. त्यामुळे समुद्रतटीय जिल्हे, उडपी, दक्षिण कॅनरा आणि उत्तर कॅनरा या ठिकाणी अशाप्रकारची माती आढळते. ही माती प्रामुख्याने वाळू आणि चिकण मातीने बनलेली असते. या मातीमध्ये सेंद्रिय पोषकत्व जास्त असते. म्हणून या प्रकारच्या मातीत भात, काजू, नारळ, सुपारी, केळी यासारखी पिके उत्तम प्रकारे येतात.

## नैसर्गिक वनस्पती

नैसर्गिकरित्या वाढणाऱ्या विविध प्रकारच्या वनस्पती आणि वृक्षांच्या स्वाभाविक वाढीला नैसर्गिक वनस्पती असे म्हणतात. कर्नाटकामध्ये भिन्न प्रकारच्या वनस्पती आणि त्यांच्या जाती आहेत. पर्यावरणाचा समतोल राखण्याचे महत्वाचे कार्य या वनस्पती करतात. झाडामुळे इमारतीचे लाकूड, सरपण, कारखान्यांना कच्चा माल, औषधी वनस्पती, मध, बांबू, वेत इ. मिळतात. जंगले ही प्राण्यांची नैसर्गिक वस्तीस्थाने आहेत. वाघ, सिंह, चित्ता, जंगली म्हैस, हत्ती, हरण, मोर इ. प्राणी कर्नाटकाच्या जंगलात आढळतात. जंगले मनोरंजनाची आणि प्रवासी स्थळे आहेत. जंगले पर्यावरणाचे प्रदूषण रोखतात. विशेषत: चंदन हे कर्नाटकातील जंगलात उगवले जाणारे विशेष झाड आहे. त्यापासून सुगंधी अत्तरे, नाजूक नक्षी कामाच्या वस्तू, साबण आणि औषध निर्मितीसाठी केला जातो. त्यामुळे याची निर्यात देश भरातच नव्हे तर संपूर्ण जगात केली जाते. यामुळेच कर्नाटकाला 'चंदनाची भूमी' असे म्हटले जाते.

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

**वनस्पतीचे प्रकार :**

पावसाची विभागणी, भूपृष्ठाचे स्वरुप आणि मातीच्या प्रकारावरुन कर्नाटकातील वनस्पतीचे वेगवेगळे विभाग करण्यात आले आहेत. 1) सदाहरित अरण्ये, 2) पानझडीची अरण्ये, 3) संमिश्र अरण्ये, 4) उष्ण कटिबंधातील गवताळ कुरणे इ. प्रकार होत.

**1. सदाहरित अरण्ये :** ज्या भागामधे दरवर्षी 250 से. मी. पेक्षा जास्त पाऊस पडतो तेथे सदाहरित अरण्ये आढळतात. उदा. पश्चिम घाटाचा उतार, मुसळधार पाऊस आणि उच्च तपमानामुळे झाडे उंच वाढतात. त्याच्या फांद्या विस्तारतात. ही जंगले घनदाट असल्यामुळे सूर्याची किरणे जमिनीपर्यंत पोहचत नाहीत. येथे उंच सरळ बुंध्यांचे वृक्ष, शिसम, महोगनी, टीक, साल इ. वृक्ष आढळतात. या झाडांच्या बुंध्याशी दाट झुडपे वाढतात. वेगवेगळ्या प्रकारची झुडपे, लवंग, वेलदोडा, दालचिनी आणि औषधी वनस्पती मुबलक प्रमाणात

वाढतात. या प्रकारची अरण्ये उ. कॅनरा, उडपी, द. कॅनरा, शिमोगा, हासन, चिक्कमंगळूर, चामराजनगर आणि कोडगू जिल्ह्यात आढळतात.




**2. पानझडीची अरण्ये :** हिवाळ्यानंतर दमटपणामुळे या वनस्पतीची पाने गळतात. वसंत ऋतूमध्ये पुन्हा पालवी फुटते. म्हणून यांना पानझडीचे वृक्ष म्हणतात. अशा प्रकारची अरण्ये 60 ते 120 से. मी. वार्षिक पाऊस पडणाऱ्या ठिकाणी आढळतात. उदा. चिक्कमंगळूर, म्हैसूर, चामराजनगर, हासनचा पूर्वभाग, तुमकूर, चिक्कबळ्ळापूर, कोलारचा दक्षिण भाग, मंड्या, बेंगळूर दक्षिण (रामनगर), बेंगळूर ग्रामीण या जिल्हयात आढळतात. साग, टीक, होन्ने, महोगनी, कडुलिंब, आंबा, फणस, भुतुगा, मिमोसा, वड, चंदन आणि बांबू हे मोठ्या प्रमाणात आढळतात. ही अरण्ये विरळ स्वरुपाची असतात.

**3. संमिश्र अरण्ये :** सदाहरित आणि पानझडीची अरण्ये मिळून संमिश्र अरण्ये तयार होतात. ज्या भागात सरासरी 120 ते 150 से. मी. वार्षिक पाऊस पडतो त्याठिकाणी ही अरण्ये आढळतात. उदा. उडपी, दक्षिण आणि उत्तर कॅनराचा काही भाग, चिक्कमंगळूर आणि कोडगूचा पूर्वभाग, हासन, म्हैसूर इ. या भागात टीक, होन्ने, महोगनी, बिंदगा, चंदन, फणस आणि बांबूची वाढ खूप मोठया प्रमाणात होते. या अरण्यांना आर्थिक महत्व प्राप्त झाले आहे.

**4. उष्ण कटिबंधातील गवताळ कुरणे :** वार्षिक पर्जन्यमान 60 से. मी. पेक्षा कमी असलेल्या भागात या प्रकारच्या वनस्पती आढळतात. पावसाचे अत्यल्प प्रमाण आणि कोरड्या शुष्क हवामानामुळे त्याठिकाणी काटेरी झुडपे, खुरट्या वनस्पती जास्त प्रमाणात वाढतात. उदा. निवडूंग, बांभूळ, ताडाची झाडे, बेल, पामवृक्ष, चिंच, कुंटी गवत (kunti grass) अधूनमधून काही ठिकाणी वड, कडूनिंब, पिंपळ, मुत्तुगा (पळस) इ. वृक्ष देखील दिसून येतात. या प्रकारची अरण्ये बिदर, कलबुर्गी, यादगीर, रायचूर, कोप्पळ, विजापूर, बेळ्ळारी, चित्रदूर्ग व इतर भागात आढळतात.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

किनाऱ्या जवळील नदी खोरे, खाजण (Lagoon), खाडी आणि समुद्रतटावरील वनस्पतीना जाळीदार मुळे व पारंब्या असतात. त्यांची वाढ खाऱ्या पाण्यात होते. त्यांना 'मँग्रोव्ह' अरण्येही म्हणतात. अशा प्रकारच्या जंगलाचे प्रमाण कमी आहे. समुद्रसपाटीपासून 1400 मी. उंचीवर असणाऱ्या ठिकाणी हवामान थंड असते. उदा. कुद्रेमुख, बाबा बुडनगिरी, बिळगिरी रंगण टेकड्या, कोडगूमधील ब्रह्मगिरी येथे गवताची उतरती कुरणे आहेत. या ठिकाणच्या खोल दऱ्यामध्ये अनेक झरे आणि धबधबे आहेत. या विभागात आढळणाऱ्या विशेष अरण्याना 'शोला फॉरेस्ट' म्हटले जाते.

***हे तुम्हाला माहीत असू द्या:***

- *बेंगळूर जवळील रामो खेड्यामध्ये अतिउंच वृक्ष आहे.*
- *चिक्कबळापूर जिल्ह्यातील शील्डघट्टा तालुक्यात व्यंकट पुराजवळ सर्वात मोठे कडुलिंबाचे झाड आहे.*
- *हावेरी जिल्ह्यातील सावनूर तालुक्यात चिंचेचे मोठे झाड आहे.*

**जंगलाची विभागणी :**

कर्नाटक राज्यातील जंगलाचे नोंदणीकृत क्षेत्र 40649.30 लाख चौ. कि. मी. आहे. भौगोलिक क्षेत्राच्या 21.19% भूमी जंगलानी व्यापलेली आहे. भारतात विपुल जंगले असणारे हे सातवे राज्य आहे. उत्तर कॅनरा जिल्ह्यात सर्वात जास्त जंगले आहेत. तर शिमोगा, चामराजनगर जिल्हा दुसऱ्या स्थानावर आहे व विजापूर जिल्ह्यात सर्वात कमी अरण्ये आहेत.




## प्राणी जीवन

कर्नाटकामध्ये जंगले आणि वनस्पतीच्या वैविध्याप्रमाणे प्राण्याचेही विविध प्रकार आढळून येतात. या वन्यजीवांच्या संख्येला घनदाट अरण्येच कारणीभूत आहेत. जागतिक स्तरात पश्चिम घाटाला जैव वैविध्याने संपन्न स्थळ म्हणून स्थान लाभले आहे. भारतातील

@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

हत्तींच्या 25% हत्ती आपल्या कर्नाटकात आहेत आणि 18% वाघांची संख्या कर्नाटकामध्ये आढळून येते. या व्यतिरिक्त इतर प्रकारचे वन्यप्राणी देखील आहेत. उदा : चित्ता, अस्वल, गवा, बिबटया, सांबर, हरीण, रानडुक्कर, साळिंद्र शिवाय साप आणि रंगीबेरंगी पक्षी देखील आढळून येतात. उत्तर कन्नड किनारपट्टीचा भाग आणि बेळगावच्या काही भागांना मिळून मलनाडू असे म्हटले जाते. त्या भागामध्ये नैसर्गिक जैव वैविध्याची परंपरा अजूनही टिकून आहे. या ठिकाणी जास्तीत जास्त प्रजाती आढळतात. कर्नाटकामध्ये जंगलाचे वर्गीकरण तेथील आढळणाऱ्या प्राण्यावरुन चार विभागात केले आहे. ते म्हणजे:

1 किनारपट्टीचा प्रदेश- उत्तर कॅनरा आणि बेळगांव

2 सह्याद्रि पर्वत रांगा- बाबा बुडनगिरी पर्वत, बिळगिरी रंगनटेकड्या, महादेश्वर पर्वत, गोपालस्वामी टेकड्या इ. दक्षिण पठारावर आहेत.

3. उत्तरेकडील पठारावरील जंगली प्राण्यांचे मुख्य वस्तीस्थान राणीबेन्नूर हे होय.

4 कर्नाटकामध्ये 5 राष्ट्रीय उद्याने, 7 पक्षीधाम आणि 36 वन्यजीव अभयारण्ये आहेत.

*हे तुम्हाला माहित असू द्या :*

- *कर्नाटकात 5 वाघ्र प्रकल्प : बंडिपूर, नागरहोळे, बिळीगिरी रंगणबेट्टा, भद्रा आणि काळी वाघ्र प्रकल्प.*
- *कर्नाटकातील प्रसिद्ध पक्षीधाम : रंगनतिट्टू. हे कर्नाटकातीत पक्षी अभयरण्यांच्या यादीतील पहिले ठिकाण आहे.*

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

## स्वाध्याय

**I. खालील रिकाम्या जागी योग्य शब्द भरा :**

1. उन्हाळा ________ या माहिन्यापासुन ________ या महिण्यापर्यंत असते.
2. सर्वाधिक पर्जन्यमान असलेला ________ हा ऋतू आहे.
3. ________ प्रकारची माती उ. कॅनरामध्ये जास्त प्रमाणात आढळते.
4. सदाहरित अरण्ये वार्षीक ________ से.मि. पाऊस पडणाऱ्या प्रदेशात आढळतात.
5. सर्वाधिक वनक्षेत्र ________ जिल्ह्यात आहेत.

**II. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :**

6. कर्नाटकातील हवामानाचे चार ऋतू लिहा.

7. कर्नाटकातील पावसाळी मोसमांची माहिती लिहा.

8. कर्नाटकातील मातीचे प्रकार लिहा.

9. कर्नाटकातील नैसर्गिक वनस्पतींच्या प्रकारांची नांवे लिहा.

10. कर्नाटक चंदनाची भूमी म्हणून का ओळखली जाते.

11. कर्नाटकातील जंगलात आढळणाऱ्या जंगली प्राण्याची नांवे लिहा.

**III. जोड्या जुळवा :**

| अ | ब |
|---|---|
| i. आदि चुंचनगिरी | अ) पक्षीधाम |
| ii. मुंडगद्दे | आ) राष्ट्रीय उद्यान |
| iii. नागरहोळे | इ) पानझडी अरण्ये |
| iv. चंदन | ई) मयुरधाम |
| | उ) लाल माती |

**IV. उपक्रम :**

1. कर्नाटकातील वन्य प्राण्यांची छायाचित्रे गोळा करून अल्बम तयार करा.

**V. प्रकल्प :**

1. तुमच्या जिल्ह्यामध्ये आढळणाऱ्या वनस्पतींच्या गटाची सविस्तर चर्चा करा.

***

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**प्रकरण - 12**

# कर्नाटकातील जलसंपदा

**प्रस्तूत पाठाद्वारे आपण खालील गोष्टी जाणून घेऊया.**

- *कर्नाटकातील महत्वाच्या नद्या.*
- *कर्नाटकातील विविध प्रकारचा पाणी पुरवठा.*
- *जलविद्युत केंद्रे.*
- *कर्नाटकातील प्रमुख धरणे.*

## कर्नाटकातील नद्या :

नद्या हे पाण्याचे मुख्य स्त्रोत आहेत. कर्नाटकातील नद्या दोन गटात विभागल्या आहेत. 1) पुर्वेकडून वाहणाऱ्या नद्या (पुर्ववाहिनी) 2) पश्चिमेकडून वाहणाऱ्या नद्या (पश्चिम वाहिनी)

***तुम्हाला हे माहित असू द्या :***
*कावेरी नदीच्या वाटेवर तीन धबधबे - 1) चुनचुनकट्टे 2) गगणचुक्की आणि भरचुक्की 3) होगेणकल आणि तीन द्वीप 1) श्रीरंगपटण 2) शिवनसमुद्र 3) श्रीरंग ही होत.*

***तुम्हाला हे माहित आहे का?***
*कुडल संगम येथे मलप्रभा नदी कृष्णा नदीला मिळते. कुडली येथे तुंगा आणि भद्रा नद्यांचा संगम आहे. हेमावतीनदी कृष्णराजसागर जवळ कावेरीला मिळते.*




©KTBS NOT TO BE REPUBLISHED

**1) पुर्वेकडेवाहणाऱ्या नद्याः** उदा: कृष्णा, कावेरी, पेन्नार व पालार इत्यादी या नद्या पुर्वेकडे वाहतात आणी बंगालच्या उपसागराला जाऊन मिळतात.

कृष्णा ही दुसरी महत्वाची नदी आहे.

ती महाबळेश्वर येथे जन्म घेते आणि बंगालच्या उपसागराला सामिल होण्यासाठी. 1392 कि.मी. पुर्वे कडे वाहते. पण ती फक्त 480 कि.मी. कर्नाटकात वाहते. भिमा, कोयना, तुंगभद्रा, घटप्रभा व मलप्रभा या तिच्या उपनद्या आहेत.

*तुम्हाला हे माहित आहे का?*
*पेन्नार नदीला पिनाकीनी असेही म्हटले जाते. द. पेन्नारला तामिळनाडूमध्ये पोनियार म्हणून ओळखले जाते.*

कृष्णा नदीच्या जलप्रवाहातून पाणी पुरवठा आणि जल विद्युत निर्मितीचा फायदा उत्तर कर्नाटकाला झाला आहे.

कावेरी नदी ही कर्नाटकातील महत्वाची नदी आहे. तिला 'दक्षिण गंगा' नदीम्हणून ओळखले जाते. ती कोडगूजिल्ह्यातील तल कावेरी येथे उगम पावते आणि कर्नाटक आणी तामिळनाडू मधून पुर्वेकडे 804 कि.मी वाहत जाऊन बंगालच्या उपसागराला जाऊन मिळते. कर्नाटकात ती फक्त 380 कि. मी. वाहते. तिच्या अनेक उपनद्या या नदिला मिळतात उदाहरणार्थ:- हेमावती हरंगी, लोक पावणी, अर्कावती, शिमशा, लक्ष्मणतिर्थ, कबिनी सुवर्णवती आणि भवानी इत्यादी ही नदी शेती, वीजनिर्मीती, पिण्याच्या पाण्याच्या पुरठ्या साठी सर्वाधिक उपयुक्त आहे.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

**2. पश्चिमेकडून वाहणाऱ्या नद्या :** यातील अनेक नद्या मलनाडूमध्ये उगम पावतात. व पश्चिमेकडे वाहतात आणि अरबी समुद्राला मिळतात. उदाहरणार्थ : शरावती, काळी, गंगावळी (बेडती), नेत्रावती, वराही, अघनाशीनी इत्यादी. त्या उंच उतारावरून वाहतात आणी धबधबे तयार करतात ते हायड्रो इलेकट्रीक पॉवर (जलविद्युतशक्ती) तयार करण्यास देखील मदत करतात. शरावती नदिवरील जोग धबधबा हा जगप्रसिद्ध आहे. हा भारतातील सर्वात उंच (253 मी.) धबधवा आहे **इत्तर महत्वाचे धबधबे :** गोकाक (घटप्रभा नदी), बडांजी (नेत्रावती), उंचक्की (अघनाशीनी), छाया भगवर्ती (धोनीनदी), चुंचुनकट्टे, शिमशा, गगन चुक्की, भरचुक्की (कावेरी) मागोडा धबधबा(बेडती नदी) इत्यादी.

**कर्नाटकातील पाणी पुरवठा (सिंचन) :**

शेतीला कृत्रिमरीत्या केलेल्या पाण्याच्या पुरवठयाला पाणीपुरवठा म्हणतात. या ठिकाणी पर्जन्यमानाचे वितरण असमान आणी अनियमित आहे. अशा ठिकाणी शेतीच्या विकासासाठी हा पाणी पुरवठा आवश्यक झाला आहे.

*तुम्हाला माहित आहे का?*
*कर्नाटकातील मोठे तलाव मुदगदा (कदुर जवळ) तोन्नुर (पांडवपुर) हैरीगो. तलाव (हनसुर) रामसमुद्र (चिक्कबल्लापुर) बौरसागर (गुडीबंडे).*

पाणी पुरवठ्याच्या विविध स्त्रोताद्वारे प्राचीन काळापासून कर्नाटकामध्ये शेतीला वेगवेगळ्या पद्धतीने पाणी पुरवठ्याची सोय अस्तित्वात आहे. उदा: विहिरी, कालवे, तलाव हे पाणी पुरवठ्याचे स्त्रोत आहेत. सुरवातीच्या काळात गावामध्ये पाणी पुरवठ्यासाठी विहिरी खोदल्या जात होत्या. पुढे शेतीसाठी नद्याचे पाणी पुरवठा करण्यासाठी कालवे बांधण्याची प्रथा सुरू झाली. आता सुध्दा उदाहरणार्थ: शांतीसागर (सुळ्केरी) दावणगिरी जिल्ह्यातील. खोदलेले पहिले मोठे धरण 11 व्या शतकात बांधण्यात आले. विजयनगर साम्राज्याच्या काळातील तुंगभद्रा कालवा, म्हैसुरच्या राजाने बांधलेले वाणीविलास सागर, कृष्णराज सागर धरण हे कर्नाटकातील पाणी पुरवठ्याच्या विकासातील मैलाचा दगड आहे.



सिंचन क्षेत्राची टक्केवारी

सध्या पाणी पुरवठ्या साठी नदीचे पाणी आणी भूगर्भातील पाणी याचा वापर पाणी पुरवठ्यासाठी केला जातो. कर्नाटकात जवळपास 41%, लागवडी योग्य जमिन पाणी पुरवठ्याच्या खाली आहे. पाणीपुरवठया बाबतीत कर्नाटकाने 9 वे. स्थान पटकावले आहे.

> ***तुम्हाला माहित असू दे :***
>
> *कर्नाटकातील सर्वात पहिले मोठे धरण वानीविलास सागर 1907 मध्ये हिरियुरु येथे बांधण्यात आले. 'मानीकणिवे योजना' असे म्हटले जाते.*

रायचूर जिल्ह्यात कालव्याच्या सिंचनाखाली राज्यात सर्वाधिक क्षेत्र आहे. शिवमोगा जिल्हयात तलावाचा पाणीपुरवठा सर्वाधिक आहे, तर बेळगाव जिल्हयात सर्वात जास्त विहिरीचा पाणीपुरवठा केला जातो. अलीकडच्या काळात कुपनलिकांचे प्रमाण वाढले आहे. ओलीताखालील जमिन विचारात घेतली असता बेळगाव जिल्हा वरच्या स्थानावर आहे तर कोडगू जिल्हा सर्वात शेवटी आहे.

राज्यातील मुख्य कालव्याचा पाणीपुरवठा पुढील प्रमाणे कृष्णराजसागर, तुंगभद्रा, होन्नावती, कबिनी, हरंगी, वानीविलास सागर, (मनिकणिवे) अप्पर कृष्णा, आलमट्टी, नारायणपूर, मलप्रभा कारंजा, बण्णेतोरे, हिप्परगी बॅरेज व भद्रा प्रकल्प इत्यादी.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

**जलविद्युत उर्जाप्रकल्प :**

भारतात जल विद्युतशक्ती यशस्वी निर्मिती करण्याचे श्रेय कर्नाटकाला दिले जाते. कोळसा किंवा पेट्रोलियमची उपलब्धता म्हणावी तशी कर्नाटकात नाही. पण भावीपिढीसाठी एक मोठी संधीमात्र आहे. कर्नाटकातील नद्या दऱ्यातुन मुक्तपणे पर्याप्त उर्जा प्राप्त करू शकतात.

**कर्नाटकातील प्रमुख जलविद्युत निर्मिती प्रकल्प**



NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

कर्नाटकातील पहिला 1902 मध्ये शिव समुद्र येथे जल विद्युत शक्ती प्रकल्प उभारण्यात आला त्याचा मुख्य उद्देश कोलारच्या सोन्याच्या खाणीसाठी विद्युतपुरवठा करणे हा होय,

हा प्रकल्प कावेरी नदीजवळ बांधण्यात आला आहे. 1940 मध्ये कावेरी नदीचे पाणी वापरून शिम्षा येथे जलविद्युत प्रकल्प उभारण्यात आला. 1947 मध्ये शरावती नदीवरील जोग फॉल्स जवळ महात्मा गांधी जलविद्युत केंद्र बांधले. त्यानंतर उर्जेची वाढती गरज पुर्ण करण्यासाठी पंचवार्षिक योजना दरम्यान अनेक जल विद्युत प्रकल्प विकसीत करण्यात आले. या घडामोडीचा परिणाम म्हणून. भारतातील जलविद्युत उर्जा निर्मीतीमध्ये कर्नाटक राज्य पहिल्या स्थानावर आहे.

**कर्नाटकातील मुख्य जलविद्युत प्रकल्प :** शिवनसमुद्र, शिमशा (कावेरी नदी) लिंगनमक्की, गिरसप्पा आणि महात्मा गांधी जलविद्युत प्रकल्प (शरावती) सुपा, नागझरी, कद्रा आणि कोडसळ्ळी (काळीनदी) वराही आणि मारीदरी(वराही नदी) भद्रा, तुंगभद्रा, घटप्रभा आणि आलमट्टी (कृष्णानदी) इ.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

## स्वाध्याय

**I. खालील रिकाम्या जागा योग्य शब्दानी भरा :**

1. कावेरी नदीचा उगम कोडगू जिल्हयातील ______येथे झाला
2. प्रसिद्ध जोग धबधबा हा ______ नदीवर आहे.
3. कर्नाटकातील सर्वात जास्त कालण्याने पाणी पूर्वठा करणारा जिल्हा ______
4. कर्नाटकातील पहिला जलविद्युत निर्मीती प्रकल्प ______ होय.
5. आलमट्टी धरण ______ या नदीवर बांधले आहे.

**II. खालील प्रश्नांची उतरे थोडक्यात लिहा :**

6. कर्नाटकातील प्रमुख नद्याची नावे लिहा
7. कृष्णा नदीची थोडक्यात माहिती लिहा.
8. कावेरी नदीच्या उपनद्याची यादी बनवा.
9. कर्नाटकातील पाणी पुरवठ्याच्या पद्धतीची नावे लिहा.
10. आपल्या राज्यातील प्रमुख जलविद्युत केंद्राची नावे लिहा.

**III. जोड्या जुळवा :**

| | | |
|---|---|---|
| i. | लिंगनमक्की धरण | 1) घटप्रभानदी |
| ii. | गगनचुक्की, भरचुक्की | 2) बेडतीनदी |
| iii. | वाणी विलास सागर | 3) काळीनदी |
| iv. | गोकाक धबधबा | 4) कावेरीनदी |
| v. | मागोडा धबधबा | 5) शरावती नदी |
| | | 6) मानिकणिवे |

**IV. उपक्रम :**

1. कर्नाटकातील नद्या व उपनद्याची यादी बनवा.

**V. प्रकल्प :**

1. कर्नाटकाच्या नकाशात धरणे दाखवून त्याची नावे लिहा.
2. तुमच्या आसपासच्या शहराजवळील तलाव व नद्याची नावे लिहा.
3. नद्या राज्याराज्यातील. सुसंवाद कशा वाढवतात?

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

***

प्रकरण - 13

# कर्नाटकाची भू-साधन संपत्ती

L3Y1G7

**प्रस्तूत पाठात तुम्ही या गोष्टी शिकणार अहात.**

- *कर्नाटकातील भू साधन संपत्तीचा विविध वापर.*
- *शेतीचे विविध प्रकार आणि त्याचे महत्व.*
- *कर्नाटकातील प्रमुख पिके-त्यांचे उत्पादन.*

कर्नाटक भौगोलिक दृष्ट्या संपन्न राज्य आहे. येथील भूस्वरुप, वनस्पती, खनिजे, जलसंपदा यामध्ये वैविध्य आढळते. या नैसर्गिक साधनसंपत्तीत भूसंपदा ही सर्वात महत्वाची आहे. त्याचा सदुपयोग राज्याच्या विकासाला चालना देतो.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

**भूमीचा सदुपयोग :**

वेगवेगळ्या कारणाकरिता भूमीच्या योग्य वापराला भूमीचा सदुपयोग असे म्हटले आहे. यामध्ये सुपिक, पडीक, नापिक जमीनी, जंगले, निवासीजागा, रस्ते, रेल्वे, धरणे, कालव्यांच्या बांधकामाकरिता वापरलेली जमीन, जनावरे चरण्यासाठीची कुरणे इत्यादी प्रकारच्या जागेचा समावेश होतो. जमिनीचा पुरेसा आणि योग्य वापर हा देशाच्या आर्थिक विकासाचा पाया आहे.

कर्नाटक राज्याचा एकूण भू विस्तार हा 19.05 लाख हेक्टर आहे. तिचा वापर खालील प्रमाणे होतो.

**कर्नाटकातील जमिनिचा विविध वापर :**




विविध वापराखालील जमिनीची टक्केवारी

**1. मशागतीची एकूण जमीन :** राज्यात याचे प्रमाण सर्वत्र सारखे नाही. कलबुर्गी जिल्ह्यात सर्वात जास्त जमीन मशागतीखाली आहे. त्यानंतर बेळगाव विजयपूर, तूमकूर, रायचूर, बागलकोट, बळ्ळारी, चित्रदूर्ग आणि म्हैसूर या जिल्ह्यामध्ये आहे. प्रचंड शहरीकरणामूळे बेंगलोर जिल्ह्यात सर्वात कमी मशागतीची जमीन आहे.

**2. अरण्य प्रदेश :** उत्तर कॅनरा जिल्ह्यात जंगलाचे प्रमाण जास्त आहे. त्यानंतर शिमोगा, चामराजनगर, चिक्कमंगळूर, कोडगू, बेळगांव, दक्षिण कॅनरा, उडपी आणि बळ्ळारी जिल्ह्यात सुध्दा याचे प्रमाण भरपूर आहे. विजयपूर मध्ये याचे प्रमाण अत्यंत कमी आहे. बेंगलोर, बेंगलोर ग्रामीण, रायचूर, बिदर आणि गदग जिल्ह्यात अत्यंत कमी वनविभाग आहे.

**3. शेतीला अनुपलब्ध जमीन :** यामध्ये शेतीशिवाय इत्तर अनेक कारणांसाठी जमिनीचा वापर केला जातो. रेल्वेमार्ग, रस्ते, वस्तीस्थान, उद्योगधंदे आणि कालव्याच्या प्रकल्पाकरिता ही जमीन वापरली जाते. अलीकडच्या काळात या प्रकारच्या विकासासाठी याचा वापर वाढतच आहे. बेंगळूर शहर जिल्हा अशा प्रकारच्या जमीन वापरामध्ये पहिल्या स्थानावर आहे. शिमोगा, तुमकूर, बेळगांव, बळ्ळारी, म्हैसूर आणि दक्षिण कॅनरा या जिल्ह्यातही विकासकामाकरिता जमिनीचा वापर होत आहे. हेच प्रमाण बीदरमधे अत्यंत कमी आहे. इतर जिल्ह्यात याचा वापर साधारण आहे.

**4. बिगरशेतीची जमीन :** सामान्यतः या प्रकारच्या जमिनीचा समावेश कुरणे, झाडेझुडपे आणि उपवने यामध्ये असतो. असा वापर शिमोगा, तुमकूर, कोलार, चिक्कमंगळूर आणि चित्रदूर्ग जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात केला आहे. अशी जमीन गदग, बागलकोट आणि धारवाड जिल्ह्यात असून ती शेतीला संपन्न आणि अनुकूल केली जाऊ शकते.

**5. पडीक जमीन :** दोन किंवा तीन वर्षापेक्षा जास्त काळ वापरात नसलेली जमीन होय. राज्यातील कलबुर्गी जिल्ह्यात पडीक जमिनीचे प्रमाण जास्त आहे. यानंतर बेळगाव, रायचूर, विजापूर, कोप्पळ आणि तुमकूर जिल्ह्यात ही याचे प्रमाण जास्त आहे. चिक्कमंगळूर, कोडगू, म्हैसूर, उत्तर कॅनरा आणि उडपी जिल्ह्यात याचे प्रमाण अत्यंत कमी आहे. पण अशा जमिनी संपन्न आणि शेतीकरीता अनुकूल केल्या जाऊ शकतात.

## शेती

जमिनीच्या मशागतीला शेती म्हणतात. शेतीमध्ये पशुपालन, कुक्कुटपालन, मधमाशी पालन, मासेमारी आणि रेशीमकिडे पालन यासारखे व्यवसाय ही शेतीचाच एक प्रकार आहे. कर्नाटकातील 61.33% जनता ही खेड्यात रहाते आणि ती आपल्या उपजिविकेसाठी शेतीवर अवलंबून आहे.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

**महत्व :** शेती हा कर्नाटकातील राज्याचा अत्यंत प्राचीन आणि प्रमुख व्यवसाय आहे. आपल्या राज्याच्या अर्थव्यवस्थेचा हा कणा आहे. शेतीमुळे लोकांना उद्योगधंदा मिळतो. शिवाय लोकांना अन्न आणि कारखान्याना कच्चा माल मिळतो राज्याला महसूल आणि विदेशी चलन मिळते. कॉफी, मसाले, रेशीम, तंबाखू, कापूस इ. शेतीतून उत्पादित झालेल्या मालाची निर्यात केली जाते. तृतीय क्षेत्रात विभागल्या जाणाऱ्या दळणवळण, बँकींग, विमा इ. सारख्या उद्योगांना यामुळे चालना मिळते. शेती ही राज्याच्या राजकीय आणि सामाजिक व्यवस्थेमध्ये महत्वाची भूमिका बजावते.

**शेतीचे प्रकार :** कर्नाटकात जमिनीच्या वापरानुसार विविध पिके ही जमिनीची उपलब्धता सुपिकता, पाण्याची उपलब्धता पाऊस, हवामान नैसर्गिक वातावरण आणि बाजारपेठ इ. नुसार पिकविली जातात. यानुसार शेताच्या प्रकारांचे पुढील प्रमाणे वर्गीकरण केले जाते. उपजिविकेसाठी लागणारी पिके, कोरडवाहु पिके, मिश्र पिके, बदलती शेती, व्यापारी पिके, मळ्याची शेती, पाण्यावरची शेती इ.

कालवे, विहिरी, तलाव इ. पाणीपुरवठा करुन काढल्या जाणाऱ्या पिकांना बागायती पिके असे म्हणतात. भात आणि ऊस ही पाण्यावर काढली जाणारी मुख्य पिके आहेत. पावसावर अवलंबून असणाऱ्या शेतीला कोरडवाहू असे म्हणतात.

काही वार्षिक पिके पैसे मिळवण्याकरिता सुपिक जमिनीतून काढली जातात. यामध्ये कॉफी, चहा, रबर, कोको इ. पिके घेतली जातात. याला 'मळ्यांची शेती' म्हणतात. काही पिकांचे उत्पादन केवळ स्थानिक बाजारपेठेसाठीच नव्हे तर आंतरराष्ट्रीय बाजारपेठेसाठी केली जाते. ही व्यापारी पिके होय. उदा. तंबाखू, कापूस, ताग इ. पिके शेतकऱ्यांचे पोट भरण्यासाठी म्हणून पिकविली जातात त्यांना 'उपजिविकेची पिके' म्हणतात. ही प्राचिन पध्दतीची शेती होय.

आजकाल मिश्रशेतीला चालना मिळाली आहे. शेतीला पूरक व्यवसाय म्हणून दुग्धोत्पादन, रेशमी किडे पाळणे, मेंढ्यापाळणे, कुक्कुट पालन, मधमाशापालन, मत्स्यशेती इ. व्यवसाय केले जातात.

**कर्नाटकाची मुख्य पिके :**

आता आपण विविध प्रकारच्या शेती व्यवसायाची माहिती घेतली. त्यानंतर आपण विविध प्रकारच्या पिकांची माहिती घेऊया. वेगवेगळ्या प्रकारची माती, हवामान, भौगोलिक घटक, पाणीपुरवठा, शेतकऱ्यांची परंपरा आणि कृषी उत्पादने हे सर्व घटक पिकांच्या उत्पादनाला कारणीभूत ठरतात.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

**कर्नाटकातील पिकांचे वर्गीकरण खालील प्रमाणे :**

धान्य पिके - भात, नाचणी, मका, डाळी, ज्वारी इ. व्यापारी पिके - ऊस, कापूस, तंबाखू , तुती इ. गळिताची पिके (तेलबिया)- भुईमूग, तीळ, जवस, सूर्यफूल इ. मळ्यातील पिके - कॉफी, नारळ, सुपारी, रबर, केळी इ. याचबरोबर वेगवेगळ्या प्रकारची बागायती आणि फुलशेतीही केली जाते. आता आपण कर्नाटकातील मुख्य पिकांची माहिती करुन घेऊया.

| *कर्नाटकातील प्रसिद्ध पिके :* | | |
|---|---|---|
| *नंजनगुड* | - | *केळी* |
| *ब्याडगी* | - | *मिरची* |
| *तिपटुरु* | - | *नारळ* |
| *मैसूरु* | - | *विड्याची पाने* |
| *बेंगळूरु* | - | *काळी द्राक्षे* |
| *देवनहळ्ळी* | - | *बंपर* |
| *इरनगेरे* | - | *वांगी* |
| *निपाणी* | - | *तंबाखू* |
| *कमलापूर* | - | *लालकेळी* |

**खाद्य पिके :**

**1. भात :** हे कर्नाटकातील प्रमुख खाद्य पिक आहे. या राज्यातील लोकांचे मुख्य अन्न भात आहे. एकूण शेतीच्या प्रदेशापैकी शे. 28.2% जमीन भातशेतीकरिता वापरली जाते. पाण्याची मुबलकता,रासायनिक खते आणि बी बियाणे यामुळे भातशेतीमध्ये सुधारणा झाली आहे.

***तुम्हाला माहित असू दे :***

*भात हे तृणधान्य आहे (पोएसी जातीतील)त्याचे वैज्ञानिक नाव ओरैसा सटैवा आहे.*

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

भात हे उष्णकटिबंधातील पिक आहे. भरपूर पाऊस आणि उष्ण तपमान या पिकाला आवश्यक असते. अपुऱ्या पावसाच्या प्रदेशात भातपिकाला पाणीपुरवठ्याची गरज असते. मैदानी प्रदेशातच याची लागवड केली जाते. चिकण मातीनी युक्त सुपिक जमीन आणि गाळाच्या जमीनीमधे याची वाढ चांगली होते. सेंद्रिय खत, कुजलेला पालापाचोळा आणि भरपूर कामगार वर्गाची आवश्यकता असते. साधारण जून ते ऑगस्ट या महिन्या दरम्यान 70% भाताची पेरणी केली जाते. नोव्हेंबर डिसेंबर महिन्यामध्ये कापणी केली जाते. हे खरीप पिक आहे. उन्हाळ्यातही पाणीपुरवठ्याची सोय आहे. तेथे(फेब्रुवारी ते जून) भाताचे पिक घेतले जाते. हे रब्बी पिक होय. मलनाडू प्रदेशात



भाताचे पिक बियाने विखरुन केले जाते. मैदानी प्रदेशात बी पेरणी करुन लागवड केली जाते.

> ***हे तुम्हाला माहिती असू द्या :***
> *कलबुर्गी हे तुरीचे कोठार म्हणून ओळखले जाते*

**भात पिकविणारे प्रदेश :** कर्नाटकातील सर्वच जिल्ह्यात भाताचे पिक घेतले जाते. कृष्णा, तुंगभद्रेचे खोरे, कावेरी नदीचे खोरे आणि किनारपट्टीचे जिल्हे हे भात उत्पादनासाठी प्रसिध्द आहेत. भात उत्पादनामधे रायचूर जिल्हा प्रथम आहे. यानंतर दावणगेरे, म्हैसूर, मंड्या, शिमोगा, बळ्ळारी, कोप्पळ, उत्तर कॅनरा, उडपी, दक्षिण कॅनरा आणि कलबुर्गी होय. कर्नाटकातील भात पिकविणारे उत्तरेकडील प्रदेश म्हणजे तुमकूर, हासन, चिक्कमंगळूर, कूर्ग आणि बेळगांव होय. भाताचे पिक पाणीपुरवठा पध्दतीने जास्त घेतले जाते.




**2. ज्वारी :** कर्नाटकातील दुसरे महत्वाचेखाद्य पिक म्हणजे जोंधळा. पूर्वी भातापेक्षा ज्वारीचे पिक घेणारे प्रदेश जास्त होते. पण आता हे प्रमाण कमी झाले आहे. एकूण प्रदेशापैकी 26% भूमीमध्ये ज्वारीचे पिक घेतले जाते. ज्वारी उत्पादनात महाराष्ट्रानंतर कर्नाटकाचा दुसरा नंबर लागतो.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

ज्वारी हे उत्तर कर्नाटकातील लोकांचे मुख्य आहार पिक आहे. भाकरी बनविण्यासाठी ज्वारीच्या पिठाचा वापर केला जातो. या पिकांच्या देठांचा उपयोग जनावरांना चारा (कडबा) म्हणून केला जातो.

**मक्का :** जागतिक स्तरावर मक्का पिकाला 'आहार धाण्याची राणी' म्हणुन ओळखले जाते. दक्षिण कर्नाटकात मक्का भरपूर प्रमाणात पिकविला जातो. हे धान्य प्रामुख्याने मानवासाठी अन्न आणि जनावरासाठी चारा म्हणून वापरला जातो. हे पिक तृणधान्य आहे. हे उष्णकटिबंधतिल पिक आहे. साधारण पाऊस आणि साधारण तपमान, काळी-लालमिश्रित माती आणि गाळाची माती या पिकाला योग्य आहे. याची बियाणे पेरली जातात. पावसाच्या पाण्यावर वाढवले जाणारे हे पिक आहे. प्रामुख्याने मान्सूनवर हे पिक अवलंबून आहे.

**ज्वारी पिकविणारे प्रदेश :** काही प्रदेश वगळता कर्नाटकातील सर्वच जिल्ह्यात हे पिक घेतले जाते. विजापूर, कलबुर्गी, बागलकोट, रायचूर, बेळगांव, बीदर, बळ्ळारी, दावणगिरी, कोप्पळ आणि गदग जिल्ह्यात हे पिक जास्त प्रमाणात पिकते. राज्यात विजापूर जिल्हा ज्वारीच्या उत्पादनात प्रथम क्रमांकावर आहे. चित्रदूर्ग, शिमोगा, चामराजनगर, हासन, तुमकूर आणि मंड्या या जिल्ह्यातही ज्वारी पिकविली जाते.

**3. नाचणा :** असंख्य पोषकमूल्यानी युक्त असे हे पिक आहे. नाचण्याच्या पिठाचे (गोळे) आंबिल अथवा लापशी, अंकुरित नाचण्याचे पीठ, सत्व, आंबोळे इ. पदार्थ बनविण्यासाठी याचा उपयोग आहारात केला जातो. भात आणि ज्वारीनंतर कर्नाटकातील हे तिसरे महत्वाचे खाद्यान्न आहे. हे अत्यंत कमी दरात उपलब्ध आहे. या धान्याचा उर्वरित भाग जनावरांच्या चाऱ्यासाठी उपयोगात आणला जातो. नाचण्याचा साठा फार काळापर्यंत सुरक्षित ठेवला जाऊ शकतो.




नाचणा हे उष्णकटिबंधीय पिक आहे. उच्च तपमान, साधारण पाऊस, लाल माती, वाळुमिश्रित माती ही या पिकाला योग्य आहे. दुष्काळातही हे पिक येते. काही ठिकाणी पाणीपुरवठा करुन हे पिक घेतले जाते. या पिकाची पेरणी करणे, तण काढणे, कापणी करणे, साठा करणे इ. सारख्या कामाला मजूरांची गरज असते. नैऋत्य मान्सून पावसावर अवलंबून असलेले हे पिक आहे. पाणीपुरवठा करुन उन्हाळ्यातही हे पिक घेतले जाते.

**नाचणा पिकविणारे प्रदेश :** कर्नाटक नाचण्याचे पिक काढण्यात पहिल्या क्रमांकावर आहे. पण अलीकडे याचा वापर कमी होऊ लागला आहे. त्यामुळे उत्पादनही कमी झाले आहे. एकूण शेतीच्या क्षेत्रापैकी 14% भागात नाचणा पिकविला जातो. दक्षिणेकडील मैदानी

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

प्रदेशातील जिल्ह्यामध्ये नाचणा पिकविला जातो. म्हैसूर प्रांताचे हे एक पारंपारिक पिक आहे. उत्तर कर्नाटकाचे मुख्य पिक ज्वारी तर दक्षिण कर्नाटकाचे मुख्य पिक नाचणा आहे. तुमकूर जिल्ह्यात सर्वात जास्त नाचण्याचे पिक घेतले जाते. त्याच्या खालोखाल बेंगळूर दक्षिण (रामनगर), बेंगळूर ग्रामीण, हासन, मंड्या, कोलार, चिक्कबळ्ळापूर, शिमोगा, चिक्कमंगळूर, चामराजनगर आणि दावणगिरी या जिल्ह्यात हे पिक पिकते.

**व्यापारी पिके :**

**1) ऊस :** हे कर्नाटकातील महत्वाचे व्यापारी आणि औद्योगिक पिक आहे. ऊसाच्या उत्पादनात कर्नाटकाचा चौथा क्रमांक लागतो आहे. हे उष्णकटिबंधीय पिक आहे. भरपूर पाऊस अथवा पाणीपुरवठ्याची चांगली सोय आणि उष्ण तपमानाच्या ठिकाणी ऊसाचे पिक मोठ्या प्रमाणात येते. वाळुमिश्रित माती आणि लाल मातीत हे पिक जोमाने येते. दळणवळणाची उत्तम सोय असल्यामुळे ऊसाची तोडणी होताच तो कारखान्यांना ताबडतोब पोहचवला जाऊ लागला आहे.

ऊस हे पिक तृणपिकाच्या वर्गवारीतील आहे. याची उंची तीन मीटरपर्यंत वाढते. यामध्ये साखरेचे प्रमाण असल्यामुळे याच्यापासून गूळ आणि साखर बनविली जाते. पाण्याची सोय असल्यास वर्षभरात दोनदा पिक घेतले जाऊ शकते.

**ऊसपिकाचे प्रदेश :** बेळगांव हे आपल्या राज्यातील सर्वात जास्त ऊस पिकविणारे ठिकाण आहे. बागलकोट हे दुसऱ्या नंबरवर आहे. आलमट्टी धरणातून बागलकोटला पाणीपुरवठा केला जातो. मंड्या म्हैसूर, विजयपूर, बिदर, बळ्ळारी, शिवमोगा, दावणगिरी, हासन, कोप्पळ, हावेरी या जिल्हात ऊस पिकविण्यात वरचढ आहे. स्वातंत्र्यपूर्ण काळापासूनच मंड्या जिल्हा ऊस पिकविण्यात वरचढ आहे. त्यामूळे त्याला 'साखर जिल्हा' म्हटले जाते.

**2) कापूस :** हे तंतूयुक्त पिक आहे. वस्त्रोद्योग किंवा कापडगिरण्यांना लागणारा कच्चा माल म्हणजे कापूस होय. शिवाय यापासून रजई, गाद्या आणि उशी बनविल्या जातात. सरकी (कापसाची बी) पासून खाद्यतेल काढले जाते. सरकीची पेंड जनावरांचे खाद्य म्हणून वापरली जाते.

***उपक्रम :***

*तुमच्या जिल्हयातील अहारधान्य पिकांची व व्यापारी पिकांची यादी करा.*

**कापूस** हे पिक उष्ण आणि उपउष्ण कटिबंधातील आहे. साधारण पाऊस, उच्च तपमान आणि काळी माती ही याच्या वाढीला योग्य ठरते. फार पूर्वीपासून कर्नाटकामध्ये रोजच्या वापरासाठी कापूस लागतो. लांब, मध्यम आणि

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

आखूड धाग्याचा कापूस हे त्याचे प्रकार आहेत कर्नाटकामध्ये मध्यम आणि आखूड धाग्याचा कापूस पिकविला जातो. हे नैऋत्य मान्सून पिक आहे. याची पेरणी ऑगस्ट, सप्टेंबर या कालावधीत केली जाते. पावसावर अवलंबून असलेले हे पिक आहे. हे पिक पाणीपुरवठा करुनही घेतले जाते.

**कापूस पिकविणारे प्रदेश :** कापूस पिकविणारे कर्नाटकातील प्रमुख जिल्हे म्हणजे हावेरी, धारवाड, गदग, म्हैसूर, बळ्ळारी, रायचूर, कलबुर्गी, बेळगांव, दावणगेरे, चित्रदूर्ग, कोप्पळ आणि विजापूर होय. या राज्यामध्ये कापूस पिकविण्यात हावेरी हा पहिल्या तर धारवाड हा दुसऱ्या क्रमांकावर आहे.

कापूस शेतीमध्ये कीड आणि रोग नियंत्रण ही मोठी समस्या आहे. रोग नियंत्रण आणि कृषि संशोधनामुळे प्रतिरोधक आणि प्रगत जाती विकसित झाल्या आहेत. त्यामूळे अलीकडच्या काळात उत्पन्न आणि उत्पादनात सुधारणा झाली आहे.

**3) तंबाखू :** हे पिक निकोशिया या वर्गातील आहे. यामध्ये निकोटीन नांवाचा मादक अंश आहे. तंबाखू हा बिडी, सिगारेट, चिलीम आणि तपकीर बनविण्यासाठी वापरला जातो. 17 व्या शतकात पोर्तुगीजांनी हे पिक भारतात आणले. त्यानंतरच हे पिक येथे पिकविले जाऊ लागले. सध्या आपल्या राज्यातील हे प्रमुख व्यापारी पिक आहे. याची वाढ सुपिक चिकणमाती, साधारण पाऊस आणि उष्ण तपमानात होऊ शकते.

आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत उच्च प्रतिच्या व्हर्जिनिया या तंबाखूच्या मुख्य प्रकाराला जबरदस्त मागणी आहे. बिडी आणि चघळण्याचा तंबाखू (गुटखा) याच्या उत्पादनास अनुकुलता लाभल्याने कर्नाटकामध्ये मोठ्या प्रमाणात याची लागवड केली जाते. राज्याला यापासून अबकारी जकात, विदेशी चलन आणि उत्पन्न मिळते.

**तंबाखू पिकविणारे प्रदेश :** तंबाखू उत्पादनात कर्नाटकाचा भारतात चौथा नंबर लागतो. म्हैसूर हे पिक घेण्यात प्रथम क्रमांकावर आहे. हासन, शिमोगा, कोडगू, बेळगांव, बेळ्ळारी, चित्रदूर्ग, रायचूर, दावणगेरे, तुमकूर आणि गदग जिल्ह्यातही तंबाखू पिकविला जातो. बेळगांव जवळील निपाणी हे बिडीच्या उत्पादनासाठी प्रसिध्द आहे. कर्नाटकातील तंबाखू आंतरराष्ट्रीय दर्जाचा आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात त्याची निर्यात होते.

**4) कॉफी :** कर्नाटक कॉफी मळ्यासाठी प्रसिध्द आहे. ते एक पेय पिक आहे. आपल्या देशात कॉफीचे सर्वात जास्त उत्पादन कर्नाटकमधे घेतले जाते. त्यामुळे तो पहिल्या स्थानावर आहे. इ. स. 1670 मध्ये चिक्कमंगळूर टेकड्यामधे कॉफीची रोपे सर्व प्रथम एका मुस्लिम फकीर (priest) बाबाबुडन कडून लावली गेली. त्यामुळे या टेकड्याना 'बाबाबुडनगिरी'

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

असे संबोधले जाते. 1826 मधे ब्रिटिशांच्या देखरेखीखाली कॉफीची लागवड संघटीतपणे केली गेली आणि आज कर्नाटकामध्ये मोठ्या प्रमाणात कॉफीचे मळे दिसून येतात.

कर्नाटकामध्ये दोन प्रकारची कॉफी पिकविली जाते. अरेबिका कॉफी आणि रोबूस्ट कॉफी. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत सर्वोत्तम अरेबिका कॉफीला मोठी मागणी आहे. उष्ण कटिबंधातील डोंगराच्या उतारावर या पिकाची उत्तम वाढ होते. या पिकाला चिकणमातीनी युक्त अशी जमीन लागते. या पिकाला सूर्यकिरणांच्या झोताची गरज नसते. त्यामुळे या पिकाला सावली पुरविणारी झाडे अवतीभोवती लावली जातात. कॉफी पिकाला लागणारी सर्व अनुकूलता मलनाडू मध्ये आहे. त्यामुळे तेथे हे पिक काढले जाते.

**कॉफी पिकविणारे प्रदेश :** भारतातील एकूण उत्पन्नापैकी 70% कॉफी कर्नाटकामधे पिकविली जाते. कोडगू जिल्ह्यात कमाल पिक घेतले जाते. कोडगूच्या खालोखाल चिक्कमंगळूर आणि हासन ही कॉफी पिकविणारी प्रमुख ठिकाणे आहेत. शिमोगा, चामराजनगर आणि दक्षिण कॅनरा येथे कॉफी पिकविली जाते.

**_कृती_**

*शेतकऱ्यांना तुमच्या शाळेत बोलावून घेऊन ते लागवड करत असलेल्या लागवडीच्या पध्दती आणि विक्री पध्दती बदल त्यांच्याशी चर्चा करा.*

कर्नाटकामधे पिकवली जाणारी कॉफी उच्च दर्जाची असून त्याची चव आणि ताजेपणाबद्दल प्रसिध्द आहे. ते एक आल्हाददायक पेय आहे. देशविदेशामधील बाजारपेठांमधे याची प्रचंड मागणी आहे. म्हणूनच कर्नाटकाला ही कॉफीची भूमी म्हणून ओळखले जाते.

**_कृती_**

*जैविक शेती विषयक माहिती संग्रहित करा*

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

## स्वाध्याय

**I. खालील रिकाम्या जागा योग्य शब्दांनी भरा :**

1. विविध उद्देशाने केलेल्या शेतीला ________ असे म्हटले जाते.
2. सर्वात जास्त सुपीक जमीन ________ मध्ये आहे.
3. कर्नाटकातील जास्त ऊस पिकविणारा जिल्हा ________ हा आहे.
4. तंबाखूमध्ये ________ नावांचा मादक पदार्थ आहे.

**II. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा :**

5. कर्नाटकातील जमीनीचा विविध प्रकारे कसा वापर केला जातो ते सांगा.
6. कर्नाटकातील शेतीचे महत्व यावर माहिती लिहा.
7. कालवे म्हणजे काय? कालव्यावर काढलेली पिके कोणती?
8. मिश्र शेती म्हणजे काय?
9. ज्वारी आणि मक्का पिका बद्दल टिपा लिहा ?

**III. खालील जोड्या जुळवा :**

| अ | ब |
|---|---|
| i. कॉफी | a) विजयपूर |
| ii. कापूस | b) तुमकूरु |
| iii. भात | c) बेळगावी |
| iv. नाचणी | d) रायचूर |
| v. ज्वारी | e) हावेरी |
| | f) कोडगू |

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**IV. उपक्रम :**

1. कर्नाटकात पिकविली जाणारी विविध प्रकारची खाद्यपिके आणि डाळीचे नमुने गोळा करा.
2. कर्नाटकाच्या नकाशामधे ज्वारी, नाचणी आणि इतर पिके पिकवले जाणारे प्रदेश दाखवा.

**V. प्रकल्प :**

1. तुमच्या भागात पिकविल्या जाणाऱ्या पिकांच्या नावांची नोंद करा. त्याची चित्रे गोळा करा.

***

अर्थशास्त्र

प्रकरण - 14

# आर्थिक रचना

Z8K4Z6

**या प्रकरणातून आपण खालील गोष्टी जाणून घेऊ**

- *प्राचीन आणि पारंपारिक अर्थव्यवस्थेची वैशिष्ट्ये आणि परिवर्तनाचे स्वरूप.*
- *उत्पन्न आणि रोजगाराचे स्रोत.*
- *स्थिर आणि गतिमान अर्थव्यवस्थेची वैशिष्ट्ये*
- *स्वावलंबी अर्थव्यवस्थेत भारताची प्रगती.*

**रचनात्मक परिवर्तन (Structural Transformation) :**

आम्हाला मागील वर्गातील आर्थिक घडामोडीची माहिती आहे. आर्थिक क्रियांचे वर्गीकरण कृषी, औद्योगिक, आणि सेवा क्षेत्रामध्ये केले आहे. अर्थव्यवस्थेच्या या तीन क्षेत्रामध्ये उत्पादन आणि रोजगाराचे स्वरूप, उत्पन्नाची पातळी, तंत्रज्ञानाचा वापर आणि जीवनशैलीतील बदल म्हणजेच आर्थिक रचना होय.

सर्वसाधारणपणे, प्रत्येक अर्थव्यवस्थेची रचना सतत बदलत असते. जमीन, श्रम, भांडवल आणि उत्पादन कार्यात वापरल्या जाणाऱ्या संस्था सारख्या उत्पादक उद्योगाची कार्यक्षमता उत्पादनास अनुकूल करू शकते. उत्पादनात नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानाचा वापर, रोजगाराचे स्वरूप आणि उत्पादनाचे प्रमाण बदलत राहते.

प्राचीन भारताची अर्थव्यवस्था जगातील इतर प्राचीन अर्थव्यवस्थांप्रमाणेच शेतीची मुख्य अर्थव्यवस्था होती. देशाचा बहुतांश भाग शेतीवर अवलंबून होता. तेव्हा शेती हेच उदरनिर्वाहाचे साधन होते. उदरनिर्वाहाच्या शेतीत ते त्यांना आवश्यक तेवढेच अन्न पिकवत होते. लोकांच्या इच्छा कमी होत्या, आणि त्यांचे जीवन साधे होते त्यामुळे श्रम विभागणीचा फारसा उपयोग झाला नाही. पण वस्तुविनिमय पद्धत प्रचलित होती शेतीचे जसजसे व्यापारीकरण होत गेले, तसतसे प्राचीन अर्थव्यवस्था आधुनिकतेकडे येऊ लागली शेतकऱ्यानी आपल्या गरजेपुरते पीक घेण्याऐवजी बाजारात पैशासाठी विकता येईल अशी पिके घेण्यास सुरूवात केली, नाचणी, भात, ज्वारी, गहु या सारख्या पारंपारिक पिकाबरोबर

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

नारळ, उस, ताग, भुईमुग आणि मसाले ही अधिक फायदेशीर अशी व्यावसायिक पिके घेऊ लागले कापूस, साखर आणि इतर व्यावसायिक पिकें मोठ्या प्रमाणात घेतल्याने कृषी उद्योगाची ही भरभराट झाली.

*तुम्हाला माहित असेल : आपल्या गावातील लोकसंख्या आणि आज अस्तित्वात असलेली लोकसंख्या आणि कृषी क्षेत्रातील बदल याविषयी. जाणून घ्या.*

17 व्या आणि 18 व्या शतकातील ब्रिटनची औद्योगिक क्रांती हळु हळु इत्तर भागात पसरली. या आणि बदललेल्या औद्योगिक क्रांतीमुळे समाजात एक नवीन वर्ग उदयास आला. त्याला भांडवलदार वर्ग म्हणतात. गावे, जमिनी, जंहागीर ज्यांच्याकडे होती. ते आपला पैसा उद्योगामध्ये गुंतवण्यासाठी पुढे आले. त्यामुळे ते गुंतवणूकदार म्हणून ओळखले जाऊ लागले. हळूहळू शेतीसह सर्वच क्षेत्रात नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर होऊ लागला. यामुळे उत्पादकता, नोकरीच्या संधी आणि उत्पादनात सुधारणा झाली. लोकांच्या राहणीमानात बदल झाले. अशा प्रकारे कृषी अर्थव्यवस्थेने, औद्योगिक अर्थव्यवस्थेला मार्ग दिला, या प्रक्रियेत काही अर्थव्यवस्थानी इतरापेक्षा खूप वेगाने प्रगती केली, अशाप्रकारे आज विविध अर्थव्यवस्था विकासाच्या वेगवेगळ्या टप्यावंर आहेत.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

भारतीय शेतीमध्येही आधुनिक शेतीचा अवलंब करण्यात आला. त्याचाच एक भाग म्हणून जास्त उत्पादन देणारे बियाणे, यांत्रिक शेती रासायनिक खते, आणि कीटकनाशकांचा वापर वाढला आहे. शेती आणि उत्पादन आणि शेतीमधील अनेक नवकल्पंनासोबत, प्रजनन आणि सिंचन वापरात तंत्रज्ञानाचा अवलंब, यासारख्या अनेक उपायांमुळे उत्पादनात लक्षणीय वाढ झाली आहे पण अत्याधुनिक रासायनिक खते, कीटकनाशकांचा वापर यामुळे पर्यावरण प्रदूषित झाले जमिनीची धूप वाढल्याने सुपीक जमीन नष्ट झाली. पाण्याच्या अतिवापरामुळे भुजल कमी झाले. पाण्याचे काही स्रोत कीटकनाशकांनी दूषित झाले आहेत. परिणामी शाश्वत कृषी विकासासाठी सेंद्रिय शेती आणि नैसर्गिक शेती पुन्हा महत्वाची बनली आहे.

या सगळ्याचा परिणाम भारताच्या आर्थिक रचनेत लक्षणीय बदल झाला आहे. पूर्वीच्या तूलनेत शेतीवर उदरनिर्वाहाचे साधन कमी असले तरी ते अजूनही मोढया प्रमाणात शेतीवर अवलबूंन आहेत. परंतू राष्ट्रीय उत्पन्नातील त्यांचे योगदान लक्षणीय रित्या कमी होत आहे. सेवाक्षेत्र सध्या राष्ट्रीय उत्पन्नात योगदान देत आहे. हे कृषीक्षेत्रानंतर अधिक रोजगार उपलब्ध करून देत आहे. औद्योगिक क्षेत्र हळुहळू विकसित होत आहे. आणि राष्ट्रीय उत्पन्नात अधिक योगदान देत आहे.

**उत्पन्नाचे स्त्रोत (Sources of Income)**

साध्या अर्थव्यवस्थेत उत्पन्नाचे स्त्रोत दोन स्त्रोतांमधून उपलब्ध असतात, म्हणजे. 1) घरगुती युनिट आणि 2) व्यवसाय युनिट, यातून आदलाबदलीद्वारे उत्पन्न मिळते.

साध्या अर्थव्यवस्थेत घरगुती यूनिट्स आणि व्यवसाय यूनिट्स यांच्यातील परस्परावलंबन आणि खालील चित्रात उत्पन्नाचा प्रवाह लक्षात घ्या.




@KTBS
NOT TO BE REPUBLISHED

गृह यूनिट्सची मालकी उत्पादक कंपन्यांच्या मालकीची आहे. जसे की जमीन, कामगार, भांडवल आणि संस्था, त्यांचा उद्योग युनिट्सना पुरवठा करणे. या बदल्यात व्यावसायिक घटकांना. जमीन, श्रम, भांडवलावरील व्याज आणि संस्था यांचा फायदा होतो.

व्यावसायिक यूनिट्स उत्पादन उपकरणे वापरून वस्तू आणि सेवांचे उत्पादन करतात आणि धरगुती युनिट्सना विकतात. यासाठी कुटुंबे जे पैसे देतात ते व्यावसायिक घटकांचे उत्पन्न असते.

आधुनिक राष्ट्रे ही कल्याणकारी राज्ये आहेत. त्यामुळे सरकार लोकांच्या कल्याणासाठी उत्पन्न गोळा करण्यासाठी गृहनिर्माण आणि व्यावसायिक घटकावर कर आकारते. या बदल्यात, गृहनिर्माण यूनिट सेवा आणि संरक्षण प्रदान करतात जसे की. शिक्षण, आरोग्य, गृहनिर्माण वाहतूक, पिण्याचे पाणी त्याचप्रमाणे सरकार उद्योगाना वाहतूक, दळणवळण, संरक्षण आणि विज यासारख्या सेवा पुरवतात हे पुढील चित्रात पाहू.




**रोजगाराचे स्त्रोत (Sources of Employment):**

व्यक्ती आपल्या उपजीविकेसाठी अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रात काम करतात जसे की कृषी आणि सेवा क्षेत्र, जसजशी भारतीय अर्थव्यवस्था विकसित होत गेली, तसतशी कृषी क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब, आणि. कौशल्यावर आधारित शेती यामुळे शेतीतील अतिरिक्त कामगार (Surplus, Labour force) दलाचा मोठ्या प्रमाणात छुपा रोजगार वाढला

तो पर्यंत भारतातील उद्योग आणि सेवा क्षेत्राचा विस्तार होत होता. श्रमशक्ती आता कृषी. क्षेत्रातून उद्योग आणि सेवा क्षेत्राकडे स्थलांतरीत झाली आहे. परंतू उद्योग आणि सेवा क्षेत्रातील बहुतेक नोकऱ्यांना अकुशल मनुष्यबळाची आवश्यकता होती जी अकुशल कामगार शक्तीला कृषी क्षेत्रातून औद्योगिक आणि सेवाक्षेत्रातील अकुशल कृषी काम गारांकडे हस्तांतरित करण्याचा एक मोठा अडथळा होता. त्यांच्यापैकी काहींनी प्रशिक्षणाद्वारे आवश्यक कौशल्ये मिळवली, परंतु बहुतेक ते शेतीवर अवलंबून होते. काही शेतकरी कुटुंबांना शेतीच्या कौशल्यातून चांगले उत्पन्न मिळू शकले आहे, तर काहींनी देशाच्या विकासात महत्वाची भूमिका बजावली आहे. भारतातील सकल देशांतर्गत उत्पादनात (Gross Domestis Product) कृषी क्षेत्राचे योगदान कमी होत असले तरी, शेतीवर अवलंबून असलेल्या कामगारांची संख्या जास्त आहे. अकुशल शेतमजुरांसाठी आवश्यक कौशल्ये विकसित करण्यासाठी सरकारने अनेक पावले उचलली आहेत.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

**स्थिर आणि गतिमान अर्थ :** स्टॅटिक (Static) हा शब्द ग्रीक स्टॅटिके (Statike) मधून आला आहे. याचा अर्थ स्थिर उभे राहणे, अर्थशास्त्रात ते अशा परिस्थितील सुचित करते जिथे कोणताही बदल होत नाही, स्थिर अर्थव्यवस्था ही कालबाह्य अर्थव्यवस्था आहे. जिथे कोणतेही बदल नाहीत. लोकसंख्येचा आकार, भांडवलाची उपलब्धता, उत्पादन पद्धती, संस्थेचे स्वरूप आणि लोकांच्या इच्छा यासारखे अर्थव्यवस्थेचे मूलभूत घटक कोणत्याही बदलाशिवाय स्थिर राहतात. त्यामुळे आर्थिक विकास खुंटला आहे.

ब्रिटीश राजवटीत भारतीय अर्थव्यवस्था ही स्थिर अर्थव्यवस्था होती. इंग्रजाच्या दीर्घकाळ चाललेल्या आर्थिक शोषणामुळे भारत गरीब राष्ट्र बनला होता. पोषक आहाराच अभाव आणि आरोग्य सुविधांचा अभाव यामुळे मृत्यूचे प्रमाण वाढले आहे. गरिबीचा परिणाम म्हणून भांडवलाची प्रचंड टंचाई होती. शेती आणि उद्योगात कालबाहय उत्पादनात प्रक्रिया चालू राहिली, त्यामुळे स्वातंत्र्यपूर्व काळात भारतीय अर्थव्यवस्था स्थिर होती.

डायनॅमिक (dynamic) हा शब्द ग्रीक डायनामिकोस (dynamikos) या शब्दापासून आला आहे. ज्याचा अर्थ शक्तिशाली बदल किंवा सतत बदल असा होतो. किंवा अर्थव्यवस्थेत होणाऱ्या बदलांचा अभ्यास होय. गतिमान अर्थव्यवस्थेत, लोकसंख्येचा आकार भांडवल पूरवठा, उत्पादकता, व्यावसायिक संस्थांचे स्वरूप आणि लोकांच्या इच्छा वेळोवेळी बदलत असतात. आर्थिक वाढ वर्षानुवर्षे सतत बदलत असते. त्यामुळे अर्थव्यवस्था आधुनिकतेकडे वळत आहे. नवनवीन तंत्रज्ञानाच्या वापरामुळे उत्पादन आणि उत्पादनाची पद्धत बदलते. त्यामुळे लोकांची जीवनशैली बदल आहे.

स्वातंत्र्यानंतर भारताची अर्थव्यवस्था गतिमान अर्थव्यवस्था बनली आहे. आरोग्य सुविधांच्या विस्तारामुळे मृत्युदर कमी झाला आहे. आणि आयुर्मान वाढले आहे. पंचवार्षिक योजनेद्वारे भांडवली गुंतवणूक वाढविणे, नवनवीन तंत्रज्ञानाच्या वापराने कृषी आणि औद्योगिक क्षेत्रातील उत्पादन पद्धती झपाट्याने बदलत आहेत. आणि त्याच्या गरजाही बदलत आहे. त्यामुळे उत्पादनात वाढ झाली आहे. लोकांचे जीवन बदलत आहे. आणि त्यांच्या गरजाही बदलत आहेत इ.स. 1991 पासून लागू झालेल्या नवीन आर्थिक धोरणांनी बदल, खाजगीकरण आणि, जागतिकीकरणाच्या प्रक्रियेला गती दिली आहे. हे अर्थव्यवस्थेच्या रचनेतील बदलामूळे त्यांचा कृषी क्षेत्रावर नकारात्मक परिणाम होत असेल तर सेवाक्षेत्रावर त्याचा सकारात्मक परिणाम होतो. औद्योगिक क्षेत्र हळूहळू वाढले आहे. नवीन आर्थिक धोरणामुळे प्रभावित झालेल्या लोकांसाठी 'सुरक्षा जाळे' (Safety Net) तयार करण्यासाठी सरकार काम करत आहे. सर्वसामावेशक (Inclusive Growth) विकासासाठी प्रयत्नशील आहे.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

## स्वाध्याय

**I. खालील रिकाम्या जागा योग्य शब्दानी भरा :**

1) रचनात्मक बदल _______ क्रियेशी संबंधित आहे.

2) प्राचीन अर्थव्यवस्थेत _______ हा एक मुख्य घटक होता.

3) साध्या अर्थव्यवस्थेत _______ क्षेत्रे आहेत

4) स्थिर अर्थशास्त्र _______ या शब्दापासून आला आहे.

5) औद्योगिक क्रांती प्रथम _______ या देशात घडली.

**II. खालील प्रश्नांची गटामंध्ये चर्चा करा आणि उतरे लिहा :**

6) रचनात्मक बदल म्हणजे काय ?

7) प्राचीन अर्थप्रणालीची वैशिष्ट्ये सांगा ?

8) भांडवलदार वर्गाचा उदय कसा झाला ?

9) उत्पन्नाचे स्त्रोत कोणते आहेत ?

10) रोजगाराचे स्त्रोत कोणते आहेत?

11) स्थिर आणि गतिमान अर्थशास्त्रातील फरक स्पष्ट करा ?

**III. उपक्रम :**

1) तुमच्या पालकांचा सल्ला घ्या आणि तुमच्या गावातील/शहरातील शेतकऱ्यांनी 20 वर्षापूर्वी घेतलेल्या पिकांची नावे द्या. आता घेतलेल्या पिकांशी त्यांची तुलना करा. या 20 वर्षाच्या कालावधीत तुमच्या/शहरातील पिकांमध्ये झालेले बदल ओळखा या विकासावर एक छोटासा निबंध लिहा.

**IV. प्रकल्प :**

1) सरकारच्या उत्पन्नाचे स्त्रोत दर्शविणारी आकृती काढा आणि ते स्पष्ट करा.

***

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

प्रकरण- 15

# भारतीय अर्थव्यवस्थेचे क्षेत्र

F4C6V1

**प्रस्तुत पाठात या गोष्टी शिकणार आहात.**

- *भारतीय अर्थव्यवस्तील प्रमुख क्षेत्रे.*
- *प्राथमिक क्षेत्राचा अर्थ आणि महत्व*
- *दुय्यम क्षेत्राचे महत्व आणि वर्गीकरण*
- *सार्वजनिक क्षेत्र आणि खाजगी क्षेत्राची भूमीका*
- *तृतीय  क्षेत्राचे महत्व*
- *कर्नाटकाची अर्थव्यवस्था*

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

तुम्ही मागील वर्गात शिकलेला आहात. आर्थिक क्रियावर आधारीत भारतीय अर्थव्यवस्थेचे तीन क्षेत्रांमध्ये वर्गीकरण केले आहे ते म्हणजे.

1) **प्राथमिक क्षेत्र :** शेती, पशुसंवर्धन, वनीकरण, वृक्षतोड आणि मासेमारी यांचा समावेश होतो.

2) **दुय्यम क्षेत्र :** ज्यामध्ये उत्पादन, खाणकाम, उत्खनन, गॅस पाणी पुरवठा बांधकाम, वीज यांचा समावेश होतो.

3) **तृतीय क्षेत्र :** शिक्षण, वाहतूक साठ गृहे यांचा समावेश होते दळणवळण, पर्यटन, हॉटेल आणि रेस्टॉरंट, विमा, स्थावरमालमत्ता व्यवसाय सेवा, सार्वजनिक प्रशासन आणि इतर सेवा.

**प्राथमिक क्षेत्र (Primary Sector) :**

प्राथमिक क्षेत्रामध्ये कृषी आणि त्यांच्याशी संबंधित कार्यावर जसे कि रेशीम किडे पालन, फलोत्पादन, पशुपालन कुक्कुटपालन, मत्स्यपालन, फ्लोरिकल्चर इ जे कृषी आधारीत उद्योगांना कच्चामाल पुरवतात.

**कृषी क्षेत्राचे महत्वः** भारतातील शेती हा प्रमुख व्यवसाय आहे तरी ही तो आपल्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. त्याचे महत्व पुढील प्रमाणे सांगता येईल.

1. जास्त लोक अजुनही शेतीवर अवलंबून आहेत. प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे त्यांच्या उपजिविकेसाठी उपयोग होतो.

2. हे कृषी-आधारित उद्योगांसाठी कच्चा माल पुरवते
3. कृषी हे मानवांसाठी अन्न आणि जनावरांसाठी चारा पुरवते
4. शेतकऱ्यांच्या बचतीतून भांडवल निर्मीतीमध्ये मदत होते.

शेती हा मुख्य व्यवसाय असला तरी शेतकऱ्यांची अवस्था समाधानकारक नाही. खालील कारणासाठी.

1) बहुसंख्य शेतकरी अल्प व अत्यल्प भुधारक आहे.
2) पिक क्षेत्राचा मोठा भाग पावसा वरती अवलंबुन असतो.
3) शेतीतील उत्पादन खुपच कमी आहे.
4) बहुसंख्य शेतकरी आधुनिक अवजारे आणि नविन तंत्रज्ञानाबाबत अनभिज्ञ आहे.
5) मध्यस्थामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या मालाला योग्य भाव मिळत नाही.

सरकारने शेतीची 'उत्पादकता' सुधारण्यासाठी तसेच देशातील शेतकऱ्याची परिस्थीती सुधारण्यासाठी विविध उपाय योजना केल्या आहे.



शेती

**उपक्रम :**

*1. तुमच्या गावतील एका शेतकऱ्या ला भेटा आणि खालील माहिती गोळा करा.*

*अ) त्यांनी या वर्षी कोणती पिके घेतली आहेत.*

*ब) पिकांच्या उत्पादनानंतर विक्री व्यवस्था कशी असते.*

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

**दुय्यम क्षेत्र (Secondary Sector):** दुय्यम क्षेत्राला उत्पादन क्षेत्र देखील म्हणतात जेथे कच्चा माल पक्क्या मालामध्ये रूपांतरित केला जातो उद्योगांचे तीन गटामध्ये वर्गीकरण करता येईल ते म्हणजे.

अ) कृषी आधारित उद्योग
ब) वन-आधारित उद्योग
क) खनिज - आधारित उद्योग

**उपक्रम :**

*कृषी क्षेत्रातील अलिकडच्या घडामोडी जाणून घ्या*

उद्योगांच्या मालकीच्या आधारावर त्यांचे दोन गटांमध्ये वर्गीकरण केले जाते.

1) सार्वजनिक क्षेत्रातील उद्योग आणि 2) खाजगी क्षेत्रातील उद्योग या मालकीच्या आधारावर उद्योगांचे दोन गटांमध्ये वर्गीकरण केले जाते.


उद्योग

**सार्वजनिक क्षेत्रातील** उद्योग हे सरकारच्या मालकीचे आहेत हे केंद्रीय सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम (CPSE) आणि राज्य सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम (SPSE) म्हणुन वर्गीकृत आहेत. खाजगी क्षेत्रातील उद्योग खाजगी लोकांच्या मालकी खाली आहेत. त्यात भांडवली गुंतवणूक आणि यंत्रसामग्रीच्या आधारे बहुराष्ट्रीय कंपन्या आणि इतर खाजगी उद्योगांचा समावेश होतो त्यांचे वर्गीकरण मोठ्या प्रमाणात मध्यम उद्योग लघु उद्योग आणि सूक्ष्म प्रकारचे उद्योग (MSME's) म्हणून केले जाते.

©KTBS NOT TO BE REPUBLISHED

**भारतातील सार्वजनिक क्षेत्र:** स्वातंत्र्यपूर्व काळात आर्थिक कार्यामध्ये सार्वजनिक क्षेत्राचा सहभाग अनुपस्थित होता. रेल्वे, किल्ला संरक्षण संस्था, पोस्ट आणि तार सेवा विमान सेवा आणि संरक्षण कारखाने या केवळ व्यवस्थापन आणि सरकारी नियंत्रणाखाली असलेल्या संस्था होत्या.

त्याच बरोबर औद्योगिक धोरण 1956च्या प्रारंभापासून स्वतंत्र भारतात सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांचा प्रचंड विस्तार झाला आहे सार्वजनिक क्षेत्रातील विभाग सध्या त्यांच्या कार्य प्रणाली, व्याप्ती तांत्रिक कौशल्य आणि रोजगार निर्मितीच्या दृष्टीने प्रमुख राष्ट्रीय क्षमता आहे. HMT, BHEL, ITI हिंदुस्तान शिप बिल्डिंग यार्ड, इत्यादी भारतातील महत्वाचे सार्वजनिक उपक्रम आहेत.

**खाजगी क्षेत्र:** खाजगी क्षेत्र सर्व प्रकारच्या व्यक्तींना सूचित करते आणि आर्थिक कार्य क्षेत्रात सहकारी उपक्रम. या क्षेत्रात विविध उत्पादक प्रकल्पामधील उत्पादनाचे वेगवेगळे घटक खाजगी सहकारी संस्थाच्या वैयक्तीक मालकिचे उद्योगधंदे व्यवस्थापित केले जातात उदा- टाटा, बिर्ला, जिंदाल, महिंद्रा, अंबानी, किर्लोस्कर इत्यादी. बहुराष्ट्रीय कंपन्या (MNC's) एक उद्योग जो देशातून व्यवस्थापन केला जातो आणि विविध देशांमध्ये कार्यरत शाखा आहे त्याला बहुराष्ट्रीय कंपनी म्हणतात. कोणतीही कंपनी किंवा समुह जी आपल्या देशाबाहेरील कामकाजातून जास्त महसूल मिळवते त्याना MNC's (बहुराष्ट्रीय कंपनी) देखील म्हणतात.

आर्थीक सुधारणानंतर अनेक MNC's ने भारतात त्यांचे उद्योग सुरू केले आहेत उदा-सोनी (जपान), सॅमसंग (दक्षिण कोरीया) हिंदुस्थान लिव्हर (इंग्लंड) इ.

1991 चे नविन आर्थिक सुधारणा केली भारत सरकारने विविध पायाभूत सुविधा प्रकल्पांमध्ये सार्वजनिक खाजगी, भागीदारी (Public Private Partnership) आणली आहे. 1991च्या नविन आर्थिक धोरणा नंतर मोठी चालना मिळाली आहे.

**औद्योगिक क्षेत्राचे महत्व :** औद्योगिक क्षेत्र मजबूत होते. अर्थव्यवस्था म्हणून खालील घटक महत्वाचे आहे.

1 औद्योगीक क्षेत्रामुळे राष्ट्राला अधिक उत्पन्न मिळते.

2. औधोगीक क्षेत्रातून लोकांना रोजगार मिळतो

3. औद्योगीक क्षेत्रामुळे लोकांचे जीवनमान उंचावते.

4. शेतीच्या आधुनिकीकरणास मदत होते कारण ट्रॅक्टर, यंत्रसामुग्री खते इत्यादी.

5. शेतीवरील लोकसंख्येचा अतिरिक्त तान कमी होतो अनेक लोकांची शहरे आणि गांवामध्ये विभागणी करून शेत जमिनीवरील तान कमी होतो.

6 औद्योगीक क्षेत्रामुळे परकिय चलन मिळण्यास मदत होते.

7. औद्योगिक क्षेत्रात देखील व्यापार, शिक्षण, वाहतूक बॅकिंग इत्यादी केंद्रांमध्ये विकसीत होत आहेत

**तृतीय क्षेत्र :**

तृतीयक क्षेत्राला सेवा क्षेत्र म्हणून ओळखले जाते. जागतिक अर्थव्यवस्थेवर सध्या सेवा क्षेत्राची सत्ता आहे. बँकिंग, विमा, व्यवसाय, वाहतूक आणि दळण वळण, आरोग्यसेवा, शिक्षण आणि प्रशिक्षण हे सेवा क्षेत्राचे प्रमुख घटक आहेत.

**बँका :** बँका अशा वित्तीय संस्था आहेत ज्या लोकांकडून विविध प्रकारच्या ठेवीमधून पैसे स्वीकारतात. बँका बचत कर्ता आणि गुंतवणूकदार यांच्यात मध्यस्थ म्हणून काम करत आहेत. ज्यांना वित्तीय गरज आहे त्यांना देखील ते कर्ज देतात.

**विमा :** विमा हे आर्थिक नुकसानी पासून संरक्षणाचे साधन आहे. हे अपघाती घटनांपासुन संरक्षण प्रदान करते ज्यामुळे मानवी जीवन आणि मालमत्तेचा नाश होऊ शकतो उदा:- मृत्यु, अपघातामुळे अपंगत्व, म्हातारपण, आजारपण, चोरी, आग दुर्घटना, भुकंप, जहाज

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

आदळणे : विज पडणे, जाळपोळ, जहाज बुडणे इ. विम्याचे दोन प्रकार आहेत सामान्य विमा आणि जीवन विमा.

**वाहतूक :** वाहतूक ही एक अशी व्यवस्था आहे जी प्रवासी आणि माल एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी घेऊन जाते जमिन वाहतूक, जलवाहतूक आणि हवाई वाहतूक हे वाहतूकिचे वेगवेगळे मार्ग आहेत, जे आर्थिक विकासात महत्वाची भूमिका बजावतात ते वस्तू आणि सेवांसाठी विस्तृत बाजार पेठ आणतात.



**वाहतुक व्यवस्था**

**प्रसारमाध्यमे :** कल्पना, विचार, संदेश एका व्यक्ती कडून दुसऱ्या ठिकाणी आणि एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी संदेश पोहचविण्याचे कार्य करते. पोस्टल सेवा, दूरसंचार, फॅक्स, ईमेल, वृत्तपत्रे, इंटरनेट या सर्व गोष्टी जगाच्या एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी लोकांशी संवाद साधण्यासाठी मदत करतात.



**प्राथमिक आरोग्य केंद्र**

**आरोग्य :** 'आरोग्य हिच संपती' आहे सुदृढ शरिरात सुदृढ मन-या विधानने एखाद्याच्या जीवनात अरोग्याचे महत्व दर्शवितात जागतिक आरोग्य संघटनेच्या मते - आरोग्य म्हणजे शारीरीक, मानसीक सामाजिक आणि बौद्धिक विकारांपासून मुक्त असलेली व्यक्ती.

भारतातील आरोग्य सेवा हळूहळू सुधारत आहे. शिशू मृत्यू दर 7.2 प्रति हजारावर घसरला आहे. बालमृत्यू दर प्रति हजार जिवंत जन्मांमागे 47 आणि बालमृत्यू दर हजारी 15 आहे. 2011 मध्ये सरासरी आयुर्मान 66.9. वर्षापर्यंत वाढले आहे वैद्यकिय जागरूकता कार्यक्रमांमुळे क्षयरोग (टिबी), कॉलरा आणि मलेरीया यासारख्या घातक रोगांवर नियंत्रण ठेवण्यास मदत झाली आहे सरकारच्या दृढ इच्छाशक्तीमुळे भारतातून पोलिओचे समूळ उच्चाटन झाले आहे.

**शिक्षण :** शिक्षण हा शब्द लॅटिन भाषेतील 'educare' पासुन आला आहे ज्याचा अर्थ प्रकाशाकडे नेणे' असा होतो. गांधीजीच्या मते, शिक्षणामुळे मुलाच्या व्यक्तीमत्वाचा सर्वागीण विकास होतो.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

साक्षरता वाढवण्यासाठी सरकारने 1988 मध्ये राष्ट्रीय साक्षरता मिशन आणले आहे (SSA)'सर्व शिक्षण अभियान 2001, मध्यान्ह आहार योजना 1995, आणि मार्च 2009 मध्ये 'राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान (RMSA) राबविले आपल्या देशातील माध्यमिक शिक्षणाची गुणावत्ता  आणि साक्षर भारत' कार्यक्रम सप्टेंबर 2009 मध्ये लागू करण्यात आला आहे.

| राष्ट्रीय उत्पन्नात विविध क्षेत्रांचे योगदान | | | | |
|---|---|---|---|---|
| विभाग | 1950-51 (%) | 1990- 91 (%) | 2000-01 (%) | 2011-12 (%) |
| 1. प्राथमिक क्षेत्र | 59 | 35 | 27 | 14 |
| 2. दुथ्थय क्षेत्र | 13 | 24 | 25 | 27 |
| 3. तृतीय  क्षेत्र | 28 | 41 | 48 | 59 |

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

वरील आकडे तीन क्षेत्रांचे राष्ट्रीय उत्पन्न आणि तृतीयक क्षेत्राचे विविध घटकांद्वारे योगदान दर्शवितात.

**कर्नाटकाची अर्थव्यवस्था :**

कर्नाटक 1,91,791 चौ कि.मी. क्षेत्र व्यापते हे भौगोलिक दृष्ट्या, भारतातील 8वे सर्वात मोठे राज्य आहे. प्रशासकिय कारणासाठी याचे चार महसूल विभाग, 31 जिल्हे आणि 239 तालूक्यांमध्ये विभागले गेले आहे. पश्चिम घाटातील सदाहरीत जंगले, किनारपट्टीचा प्रदेश, समृद्ध वनस्पती, प्राणी आणि खनिज साठे या सारख्या समृद्ध नैसर्गिक संसाधनांमध्ये संपन्न आहे. ही संसाधने अनेक प्रकारे आर्थिक विकासाला हातभार लावत आहेत.

**शेती:** कर्नाटकातील 52% पेक्षा जास्त कष्टकरी लोक शेतीवर अवलंबुन आहेत. राज्यात कृषी क्षेत्रात विविध प्रकारची पीके आहे. कर्नाटकाने अन्नधान्य उत्पादनात स्वावलंबी झाले आहे मात्र डाळीच्या उत्पादनात तुटवडा भासत आहे.

सिंचनाखालील सुमारे 30% क्षेत्र सिंचनाखाली आहे आणि 70% शेती पावसावरती आवलंबुन आहे. मोठे आणि छोटे सिंचन प्रकल्प उभारून सिंचन क्षमता वाढविली जाते. उदा- घटप्रभा, मलप्रभा, नारायणपुरा, अलमट्टी धरण, तुंगभद्रा, हेमावती, हरगी कृष्णराज सागर इ.

कर्नाटकात, भात, ज्वारी, नाचणा, गहु, बाजरी ही महत्वाची अन्नधान्ये आहेत. कापूस, ऊस, तंबाखू, बटाटे, तेलबिया, कॉफी, चहा, ही सुद्धा आणखी काही महत्वाची पिके आहेत वेलदोडे, मिरी, नारळ, सुपारी, केळी या सारखी महत्वाची पिके राज्यात पिकविली जात आहेत.



बागायत चित्र

**फलोत्पादनः** कर्नाटक हे फलोत्पादनत अग्रेसर राज्य आहे. राज्य सरकारने बागायती पिकांची लागवड सुधारण्यासाठी अनेक प्रोत्साहनात्मक उपाय योजना केल्या आहेत यामध्ये क्षेत्र विस्तार शेतकऱ्यांना मदत बियाणे आणि रोपांचा पुरवठा सूक्ष्म सिंचन, किड आणि रोग नियंत्रण, काढणीनंतरचे व्यवस्थापन आणि वितरण यांचा समावेश आहे उद्यान आणि रोपवाटिका अधिक शास्त्रोक्त पध्दतीने विकसीत करण्यासाठी कर्नाटक राज्य फलोत्पादन विकास संस्थेची स्थापना करण्यात आली आहे बागायती पिकांच्या विस्तारासाठी 'NABARD' नाबार्ड संघटनेच्या माध्यमातून कर्ज सुविधा उपलब्ध करून देत आहे.



फुलबाग

**कर्नाटकातील फ्लोरिकल्चर :** (फ्लोरीकल्चर) फुलशेती असे म्हणतात त्यात वाढणारी फुले बांगासाठी वाढणारी शोभेची झाडे आणि फुलांचे उद्योग यांचा समावेश होतो फूलांच्या बाबतीत कर्नाटक आघाडीवर आहे राज्यात देवनहळ्ळी आणि चिक्कबळ्ळापूर तालूक्यातील हदगली, सावनूर या गावात फुल शेती. केली जाते आहे भारतातून फूलांची निर्यात वाढत आहे त्यातील बहुतांश फूले कर्नाटकातून निर्यात केली जात आहे कर्नाटक ॲग्रिकल्चरल इंडस्ट्रिंज कार्पोरेशन (KAIC) ने सांगीतले कि राष्ट्रीय फ्लोरिकल्चर कौन्सिल कर्नाटकातील कारागीर आणि उद्योजकाना उद्योगालाचालणा देण्यासाठी सबसिडी व शित साठा गृहे आहेत यामुळे फूलशेती व्यवसायाला प्रोत्साहन मिळत आहे. राज्याच्या अर्थव्यवस्थेला मदत झाली आहे.

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

## पशुपालन आणि दुग्ध व्यवसायाचा विकास



पशुपालन

भारतात दुध उत्पादनान कर्नाटकाचा दुसरा क्रमांक लागतो पशुधनात राज्याचा हिस्सा 6.20% आणि कुक्कुट पालनात 6-48% आहे 2008-09 मध्ये राज्यातील दुग्धोत्पादन 4.5 दशलक्षटन होते. ते 2021-22 मध्ये वाढून 1180 दशलक्ष टन इतके झाले. संपूर्ण कर्नाटकात पशुवैद्यकांच्या जाळ्यामधून पशुधन आणि कोंबड्यांचे आरोग्य सांभाळले जाते कर्नाटकात दूधाचे उत्पादन वाढण्यासाठी राज्यात सहकारीतत्वावर कर्नाटकात मिल्क फेडरेशन (KMF) ची स्थापना केली आहे. या मार्फत ग्राहकांना दुध आणि दुग्धजन्य पदार्थाची विक्री केली जाते.

**मासेमारी :** कर्नाटकाला 27,000 चौ. कि.मी. चा उपखंडीय विभाग मासेमारीसाठी उपलब्ध आहे शिवाय 320Km समुद्रकिनारा 6 लाख हेक्टरहून आधिक जल स्त्रोत असल्याने म त्स्यपालन विकासासाठी भरपूर संधी आहे राज्यात 9.61 लाख मच्छीमार आहेत त्यापैकी 3.28 लाख समुद्र किणाऱ्यावर तर 6.33 लाख मच्छीमार देशाअंतरगत मासे पकडतात 2021-22 वर्षातील मासळीचे सरासरी उत्पादन सुमारे 10.74 लाख टन होते राज्यात सात मासेमारी बंदरे आहेत कारवार, तादरी, होन्नावर, भटकळ गंगोळ्ळी, माल्पे आणि मंगलोर या सागरी उत्पादनांच्या निर्यातीमूळे भारतीय अर्थव्यवस्थेला मौल्यवान परकिय-चलन मिळत आहे.

**उधोगधंदे:** भारतातील सर्वात मोठ्या सार्वजनिय क्षेत्रातील उद्योगधंद्याचे केंद्र कर्नाटकात आहे भारतीय वायुदलासाठी लढाऊ विमाने बनवणे, संशोधन व विकास प्रकल्प राबवणारा उद्योग म्हणजे हिंदुस्थान एरॉनॉटिक्स लि. (HAL) हा एक फारच मोठा सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगसमूह कर्नाटकात आहे कि जेथे 9500 कर्मचारी काम करतात. सार्वजनिक क्षेत्रातील आणखी काही महत्वाचे उद्योगधंदे या प्रमाणे- नॅशनल एअरोस्पेस लॅबोरेटरीज (NAL), भारत हेवी इलेक्ट्रीकल्स लिमिटेड (BHEL), इंडियन टेलिफोन इंडस्ट्रिज (ITI), भारत अर्थ मूव्हर्स लिमिटेड (BEML)) भारत इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेड (BEL), हिंदुस्थान मशिन टूल्स (HMT)

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

इ. कर्नाटकातील काही सरकारी क्षेत्रातील महत्वाचे उद्योग म्हणजे म्हैसूर मधील टिव्ही. एस मोटरसायकल उत्पादन करणारा उद्योग, धारवाड मधील टाटा मोटर्स, इलेक्ट्रिक उपकरणे बनवणारे किर्लोस्कर एबीबी काविका लार्सन अँड टर्बो (L&T) इ. कर्नाटकातील माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील महत्वाच्या कंपन्या म्हणजे इन्फोसीस आणि विप्रो -TCS

जैवतंत्रज्ञान उद्योगातही कर्नाटक आघाडीवर आहे. त्याने संसाधने आणि कौशल्ये तयार केली आहेत औद्योगिक आधारीत जैवतंत्रज्ञान धोरण स्वीकारणारे कर्नाटक हे पहिले राज्य होते. औद्योगीक क्षेत्रामुळे राज्यातील लोकांना रोजगार मिळतो. त्यामुळे अर्थ व्यवस्था वाढण्यास मदत होईल.




**बँकिंग :** भारताचे सर. एम. विश्वेश्वरय्या यांनी 1913 साली म्हैसूर बँकची स्थापन केली. तेव्हा पासून कर्नाटक बँकिंग क्षेत्रात सर्व श्रेष्ठस्थानी आहे दक्षिण कन्नड आणि उडूपी यांना बॅकिंग क्षेत्रातील पाळणा म्हणून ओळखले जाते. सार्वजनिक क्षेत्रातील बँका कॅनरा बँक, सिंडीकेट बँक कापौरेशन बँक, विजयबँक, इ. आज या दोन जिल्हात या बँकांची मुळे खोलवर रूजलेली आहेत. राज्यातील प्रादेशीक ग्रामीण बँकांना (RRB) पत पुरवठा करणारी पहिली बँक म्हणून कॅनरा बँक ओळखली जाते. आता राज्यात अस्तित्वात असणाऱ्या खाजगी क्षेत्रातील बँका, व्यापारी बँका 16, प्रादेशिक ग्रामीण बँका 12, सार्वजनिक क्षेत्रातील 27 बँका आहेत राज्यात आणखीही काही 16 खाजगी बँका कार्यरत आहेत उदा. आयडीबीआय,ऑक्सिस बँक आयसी आयसी आय बँक, इंड्स बँक इ.

NOT TO BE REPUBLISHED

**पर्यटन :** कर्नाटकाला फार मोठा वारसा आणि सांस्कृतिक पार्श्वभूमी लाभलेली आहे. त्यामुळे राज्यात पर्यटन उद्योग कायमस्वरुपी चालू राहतो आहे 1988 पासून पर्यटन उद्योगाला चालना मिळाली. सामाजिक आर्थिक विकास व्हावा आणि राज्यातील कुशल, अकुशल कामगारांना रोजगार मिळवा यासाठी पर्यटन उद्योग महत्त्वाचा आहे.

वाहतूक, व्यापार, आरोग्य, बागकाम, फूलशेती यांची वाढ व विकास होण्यासाठी सुद्धा पर्यटनाची मदत होते.

**विज :** कर्नाटकात पाच वेगवेगळ्या प्रकारची विज निर्माण केली जात आहे या मध्ये जल विद्युत, औष्णिक उर्जा, अणू ऊर्जा, पवन ऊर्जा, सौर ऊर्जा, जल उर्जा, हे राज्यातील विज निर्मीतीचे मुख्य स्त्रोत आहे. उर्जा निर्मितीची अनेक केंद्रे आहेत कर्नाटक इलेक्ट्रिक सिटी कार्पोरेशन लिमिटेड (KPCL) सरकारच्या मालकीचे असून वीज उत्पादन करत आहे. कर्नाटक पॉवर ट्रान्समिशन कार्पोरेशन लिमिटेड (KPTCL) कडे संपूर्ण राज्यात विजेचे वितरण करण्याची जबाबदारी आहे.



**पवन उर्जा**

**वाहतूक :** वाहतूक हे राज्याच्या अर्थव्यवस्थेचे प्राण आहे शेती, उद्योग, खाणकाम आणि व्यापार या सारख्या आर्थिक घडामोडी, वाहतूक व्यवस्थेवर अवलंबुन असतात योग्य वाहतूकीशिवाय आर्थिक विकास शक्य नाही. त्यामुळे वाहतुक ही विकासाची गुरुकिल्ली आहे. आर्थिक विकासासाठी रस्ते वाहतूक, रेल्ववाहतूक, जलवाहतूक, हवाई वाहतूक या सर्व महत्त्वाच्या आहेत.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS



**सौर उर्जा**



**जल विद्युत शक्ती केंद्र**

**रस्ते वाहतूक :** कर्नाटकात विस्तृत रस्त्यांचे जाळे आहे. राज्यात कानाकोपऱ्याला रस्ते जोडत आहेत. ते ग्रामीण आणि शहरी दोन्ही भागासाठी पायाभूत सुविधा म्हणून काम करतात. खाजगी भांडवलदाराच्या संगन मताने (सहकार्याने) मोठे रस्ते आणि पूल विकसीत केले जात आहेत. 'प्रधानमंत्री' ग्राम योजने अंतर्गत गांवाना मुख्य रस्त्यांद्वारे जोडले जात आहे.

कर्नाटक राज्य मार्ग परिवहन महामंडळ (KSRTC) हा सरकारी मालकिचा उपक्रम आहे आणि कार्यक्षम वाहतूकीसाठी ओळखला जातो. कार्यक्षम कार्यासाठी शासनाने महामंडळाची

विभागणी केली आहे 1. राज्य मार्ग परिवहन महामंडळ (KSRTC) 2. बेंगळूरु महानगर मार्ग परिवहन (BMTC) 3. उत्तर पश्चिम कर्नाटक राज्य रस्ते वाहतूक (NWKRTC) 4. इशान्य कर्नाटक वाहतुक निगम (NEKRTC)

**रेल्वे वाहतूक :** कर्नाटकांच्या सामाजिक आणि आर्थिक विकासात आणि राज्याच्या अखंडतेमध्ये रेल्वे वाहतूकीचे योगदान मोठे आहे. बेंगळूर हे राज्याच्या बहुतांश राजधान्याशी रेल्वेने जोडले आहे. रेल्वे स्थानकांची सुधारणा केली जात आहे. गाडयांची सुरळीत हालचाल सुलभ करणारी इलेक्ट्रॉनिक सिग्नलिंगयंत्रणा स्थापण केली आहे. हुबळी हे नैऋत्य रेल्वेचे मुख्यालय आहे आणि राज्यातील बहुतांश रेल्वे त्यांच्या अधिकारक्षेत्रात येतात या वाहतूकीतून केवळ लोकांचीही नाहीतर मालाची ही वाहतूक होते.

**जलवाहतुक :** कर्नाटक राज्यात 320 कि.मी. लांबीची किनारपट्टी आहे या किणारपट्टीवर एक मोठे बंदर व 12 लहान बंदराचा समावेश आहे. नवे मंगळूरु हे सर्वात मोठे बंदर असुन ते केंद्र सरकारच्या मालकिचे आहे. व उर्वरीत राज्य सरकारच्या मालकिची आहेत. कारवार, बेलीकेरी, माल्पे, आणि मंगळूर बंदरे मोठ्या प्रमानात मालवाहतूक करतात राज्यातील जलवाहतूकिमुळे. जगातील अनेक देशाशी संपर्क साधने सोईचे झाले आहे.

**हवाई वाहतूक :** हवाई वाहतूक हि सर्वात वेगवान वाहतूक आहे. ते माणसे(प्रवाशी) आणि साहित्य (माल) एक ठिकाणाहुन दुसऱ्या ठिकाणी वेगाने ने आग करू शकतात राज्याच्या अतंर्गत आणि अंतरराष्ट्रीय व्यापारासाठी ते अतिशय उपयुक्त आहे.

देशातील पहिले हरित क्षेत्र (हिरवेगार) आंतरराष्ट्रीय विमानतळ बेंगलोर जवळील देवनहळ्ळी येथे आहे. राज्याच्या कृषी, उद्योग, जैवतंत्रज्ञान आणि माहिती तंत्रज्ञान क्षेत्राच्या विकासात त्याचे मोठे योगदान आहे. मंगळूर, हुबळ्ळी आणि म्हैसूरसह कर्नाटकातील इतर शहरांमध्ये विमानतळ आहेत. या विमानतळचा खासगी सहभागातून विकास करण्याचा सरकाचा प्रयत्न आहे.

**दळणवळण:** दूरसंचार यंत्रणा राज्यातील खाजगी आणि सार्वजनिक दोन्ही क्षेत्राद्वारे चालविला जातो भारत संचार निगम, लिमीटेंड (BSNL) या व्यतीरिक्त, व्होडाफोन, एअरटेल आणि रिलायन्स जियो या राज्यात दुरसंचार सेवा पुरवणाऱ्या खाजगी क्षेत्रातील काही कंपन्या आहेत.

**आरोग्य आणि शिक्षण :** कर्नाटकाने आपल्या नागरिकांच्या आरोग्यची स्थिती सुधारण्यात लक्षणीय प्रगती केली आहे. हे ग्रामीण आणि शहरी भागात आरोग्य सेवा प्रदान करण्यात उत्तम प्रगती करत आहे. किमान गरजा कार्यक्रमाद्वारे ग्रामीण भागात पुरवल्या जाण्याऱ्या

NOT TO BE REPUBLISHED ©KTBS

प्राथमिक आरोग्य सुविधा लोकांच्या गरजा पूर्ण करत आहेत. 2021-22 साली 2396 कर्नाटकात एकूण 2310 प्राथमिक आरोग्य केंद्र. 9476 उपकेंद्र आणि 202 सामूदाईक आरोग्य केंद्रे आहेत.

आरोग्य आणि कुटुंब कल्याण विभागाने सार्वजनिक महत्त्वाच्या अनेक राष्ट्रीय आणि राज्य आरोग्य कार्यक्रमांची अंमलबजावणी केली आहे आणि विविध आरोग्य आणि वैद्यकीय संस्थाद्वारे राज्यातील लोकांना पद्धतशीर आरोग्य सेवा देखील प्रदान केली आहे उदा: जननी सुरक्षा योजना, ताई भाग्य योजना यशस्विनी योजना इ.

**शिक्षण :** कर्नाटकाचा, आर्थीक विकास मुख्य ज्ञानावरती आधारीत समाजावर अवलंबून आहे. दर्जेदार शिक्षणाच्या आश्वासनासह सार्वजनिक गुंतवणूक वाढवण्यासोवतच राज्य शैक्षणिक क्षेत्रात लक्षणीय सुधारणा करत आहे. राज्यातील प्राथमिक शाळा, उच्च माध्यमिक शाळा, पदवीपूर्व महाविद्यालये आणि विद्यापीठे व्यवस्थीत आहेत आणि दर्जेदार शिक्षण देतात.

कर्नाटक हे देशातील सर्वात वेगाने विकसीत होणाऱ्या राज्यापैकी एक आहे 2011 मध्ये त्याने 75.36% साक्षरता दर गाठला आहे. कर्नाटक सरकारणे 'कर्नाटक ज्ञान आयोगाची' स्थापना केली आहे. त्यांचे ध्येय केवळ उच्च शिक्षणाचा विस्तार करणे नाही तर वाढत्या उद्योग आणि सेवा क्षेत्राच्या गरजा पूर्ण करणे तसेच जागतिक आव्हानांना तोंड देणे हे आहे. वरील सर्व क्षेत्रे देखील कर्नाटकाच्या आर्थिक विकासावर परस्पर सहकार्य आणि विसंबून राहण्यास हातभार लावत आहे.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

## स्वाध्याय

**I. खालील रिकाम्या जागी योग्य शब्दाने भरा :**

1. भारताचा प्रमुख व्यवसाय _____ आहे
2. आरोग्य आणि शिक्षण _____ क्षेत्रात समाविष्ट होतात.
3. कर्नाटकाचे एकूण भौगोलिक क्षेत्र _____ आहे.
4. स्टेट बँक ऑफ म्हैसूरची स्थापना _____नी केली
5. उत्पादनातील घटक क्रिया या _____ व्यवसायाशी संबंधित आहेत.
6. कर्नाटकाला _____ इतका समुद्र किनारा लाभला आहे

7. कर्नाटक सरकारने उच्च शिक्षणाचा विस्तार व्हावा म्हणून _____ आयोग स्थापन केला आहे.

8. नवीन आर्थिक सुधारणा धोरण _____ मध्ये लागु करण्यात आले.

**II. खालील प्रश्नांची गटात चर्चा करा आणि उत्तरे लिहा :**

9. प्राथमिक व्यवसायाची व्याख्या लिहा.

10. भारतीय अर्थ व्यवस्थेतील विविध क्षेत्रे सांगा?

11. औद्योगिक विभागाचे महत्व स्पष्ट करा?

12. बँकेचा पाळणा असे कर्नाटकातील कोणत्या शहराला म्हटले जाते.

13. गांधीजीच्या मते शिक्षण म्हणजे काय ?

14. औद्योगीक संघटना सांगा ?

15. कर्नाटकातील महत्त्वाच्या पाणी पुरवठ्याच्या सोईची यादी करा?

16. W.H.O नुसार आरोग्य म्हणजे काय ?

**III. उपक्रम :**

1. तिसरे क्षेत्र हे जगातील अग्रगण्य आहे' या विधाना साठी पुरक माहिती गोळा करा आणि वास्तववादी चित्र द्या.

2. तुमच्या वातावरणातील उद्योगांची यादी करा आणि त्यांना प्रोत्साहन द्या.

**IV. योजना :**

1. कर्नाटकाच्या अर्थव्यवस्थेच्या विविध क्षेत्रांच्या कामाचा अहवाल तयार करा.

***

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

I1X3R4

## प्रकरण 16

# उद्योगधंद्यांचे व्यवस्थापन

**प्रस्तुत प्रकणातून या गोष्टी शिकणार आहात.**

- *व्यवस्थापनाचा अर्थ.*
- *व्यवस्थापनाची तत्वे.*
- *निर्णय कौशल्य आणि प्रक्रिया.*
- *व्यवस्थापन क्षेत्र आणि व्याप्ती*

**व्यवस्थापनाचा अर्थ आणि व्याख्या :** साधारणपणे व्यवस्थापन हा शब्द एखाद्या संख्येच्या क्रियाशिल व्यवस्थापन करण्याच्या प्रक्रियेसाठी वापरला जातो. जे एल हेन्सच्या मते - व्यवस्थापन कलाम्हणजे इतर लोकांकडून कामे करवून घेणे.

व्यवस्थापन म्हणजे संस्थेची पूर्व परिभाषित उद्दीष्टे पूर्ण करण्यासाठी लोकांच्या प्रयत्नांचे समन्वय साधून इतर कोणाशी तरी कार्य करण्याची प्रक्रिया आहे. व्यवस्थापन म्हणजे नियोजन, संघटना, कर्मचारी, दिशा समन्वय, आणि नियंत्रण या सारख्या प्रमुख कार्याची बेरीज होय.

NOT TO BE REPUBLISHED © KTBS

**व्यवस्थापनाचीतत्वे (Principles of Management) :**

एखाद्या व्यवसायातील निर्विघ्न आणि कार्यक्षम व्यवस्थापनेसाठी कांही गरजेची तत्वे वापरली जातात हन्री फायोल (Fayal) यांनी सांगीतलेलीतत्वे पुढील प्रमाणे.

1. **श्रम विभागणी :** त्यांनी आवश्यक असलेली कार्ये कर्मचारी किंवा कामगारामध्ये पद्धतशीरपणे विभागली गेली पाहिजे त्यामुळे उत्पादन वाढून अधिक नफा मिळेल हे तत्व संस्थेच्या सर्व विभागांना लागू केले जाऊ शकते.
2. **अधिकार आणि जबाबदारी :** कार्यालयीन अधिकार आणि व्यक्तीची जबाबदारी अशा अर्थाने हे तत्व वापरले जाते. बुध्दीमत्ता, मागील अनुभव, नैतिकता इ. गुणांनी युक्त असे हे तत्व आहे.

3. **शिस्त :** हे तत्व सर्व स्तरावरील कर्मचारी आणि कर्मच्याऱ्याचे कार्यात्मक गुण प्रतिबिंबित करते हे गुण संस्थेच्या यशाची सेवा करतात वरिष्ठ आधिकाऱ्यामध्ये शिस्त प्रिय स्पष्ट आणि नि:पक्षपती असणे आवश्यक आहे ती वैद्य कला देखील असली पाहिजे.

4. **आज्ञापालन :** या तत्वानुसार एकाच अधिकाऱ्यामार्फत कामगाराना आज्ञा केल्या जातात.

5. **दिशा दिग्दर्शन :** या तत्वानुसार प्रत्येक सांघिक घडामोडींसाठी सारखीच उद्दिष्ट्ये, एकच अधिकारी आणि एकच योजना असते.

6. **व्यक्तीगत आवड ते सांघिक आवड :** हे तत्व असे सांगते की एखाद्या उद्योगात व्यक्तीची आवड फारशी महत्वाची असत नाही. त्याऐवजी समान ध्येय निश्चितीसाठी सांघिक आवड महत्वाची आहे.

7. **कामगारांचे वेतन :** कामगारांचे वेतन आणि ते पुरवण्याची पध्दत रास्त असावी. त्यातून कामगारांचे जास्तीत जास्त समाधान व्हावयास हवे.

8. **केंद्रीकरण :** सत्तेचे, अधिकाराचे केंद्रीकरण जर झालेले असेल तर त्याचा फायदा सर्वानाच होतो.

9. **श्रेणीबद्ध पध्दत :** या तत्वाचा अर्थ असा की प्रत्येक उद्योगात अधिकार हे ज्या त्या दर्जाच्या अधिकाऱ्याकडे सोपवलेले असतात, म्हणजे वरचे अधिकारी आणि त्यांच्या हाताखालील लोक यांच्यातील अधिकार पुरेसे स्पष्ट हवेत.

10. **नि:पक्षपातीपणा :** वरिष्ठ अधिकाऱ्यांनी आपल्या कनिष्ठांशी योग्य प्रकारे व्यवहार केला पाहिजे. व्यक्तीगत सहकार्याची भावना त्यांनी ठेवली पाहिजे.

11. **कामगारांच्या नोकरीची हमी :** व्यक्तीच्या नोकरीची स्पष्ट खात्री व्यवस्थापनाने दिलीच पाहिजे. नोकरीतील अस्थिरता हे कमकुवत व्यवस्थापनेचे लक्षण आहे. कामगारांच्या जलद कपातीमुळे वाईट परिणाम होतात.

12. **पुढाकार घेणे :** संघटनेचे नेतृत्व समाधानकारक असावे एकदा तयार केलेली योजना पूर्ण सावधगिरीने राबवली पाहिजे.

13. **एकी हेच बळ :** या तत्वानुसार सर्व कामगारांनी एकत्र येऊन स्वत:चेच काम समजून संघटनेच्या कार्याशी एकरूप होऊन तन्मयतेने काम करावे.

14. **निर्णय प्रक्रिया :** व्यवस्थापन क्षेत्रात निर्णय घेणे ही एक मानसिक प्रक्रिया आहे. अनेक गोष्टींमधून अत्युत्तम गोष्ट घेणे किंवा निवडणे म्हणजे निर्णय घेणे.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

**निर्णय घेण्याचीगरज प्रक्रिया (Need of Dicision Making) :**

प्रत्येक उद्योगाचे स्वत:चे ध्येय आणि उद्दिष्ट असतात. अनेक लहान गोष्टींमध्ये सुध्दा अनेक पर्याय उपलब्ध असतात. समजा, एखाद्या व्यापाऱ्याला कांही वस्तूंची वाहतूक करायची आहे, तर कोणत्या प्रकारची वाहतूक व्यवस्था निवडायची ? असा प्रश्न सुरवातीला त्याला पडेल. त्या वस्तू ट्रकने, टेंपोने, रेल्वेने की हवाई मार्गाने पाठवायच्या? या अनेक विकल्पातून एकच पर्याय त्याला निवडावा लागेल. हा निवडलेला पर्याय योग्य असेल आणि आर्थिकदृष्ट्या परवडणारा असेल पण तो कोणता विकल्प निवडतो यावर त्याचा निर्णय ठरणार म्हणून निर्णय प्रक्रिया ही उद्योगातील एक महत्वाची भूमिका आहे.

**आज भारतात भिन्न - औद्योगीक संस्था :**

भिन्न प्रकारच्या यशस्वी औद्योगिक संस्था आहेत. येत्या काही वर्षात भारत संस्थात्मक योजना पध्दतीतील निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत अग्रस्थानी असेल. ही निर्णय घेण्याची संस्कृती सर्वत्र पसरलेली दिसेल. निर्णय घेण्याच्या प्रक्रियेचे दोन प्रकार पडतात. ते असे-

1. वैयक्तिक निर्णय
2. सांघिक निर्णय

लहान आस्थापनांमध्ये जसे की, एकमेव व्यापाराशी संबंधित उद्योगात तो एकटा मालकच निर्णय घेतो. यालाच वैयक्तिक निर्णय म्हणतात. व्यक्तीच्या निर्णय घेण्याच्या क्षमतेवर हे निर्णय अवलंबून असतात.

भागीदारी संस्था आणि एकत्रित सांघिक कंपन्या किंवा सहकारी सोसायट्यांमध्ये लोकांच्या संघाकडून निर्णय घेतले जातात. तेंव्हा त्यास सांघिक निर्णय म्हणतात. येथे अनेक लोक निर्णय घेतात.

**निर्णय घेण्याचे महत्व :** निर्णय घेण्याने व्यवसाय संस्थेतील अनेक समस्यांचे निवारण होते योग्य निर्णयामूळे संस्थेलानफा मिळू शकतो. परंतू चुकिच्या निर्णयामूळे नुकसान होऊ शकते निर्णय घेताना खालील गोष्टी लक्षात ठेवाव्यात.

1) वेळ घटक 2) अनुभव

3) शहाणपना 4) ठामनिर्धार

5) धैर्य 6) स्पष्ठता.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

समस्या सोडविण्याचा थेट संबंध निर्णयाशी असतो निर्णय घेताना खालील घटक लक्षात घेतले पाहिजे.

- समस्येचे पृथ:करण
- आवश्यक कार्ययोजना
- धैर्य व सहनशीलता
- दूरदृष्टीपणा
- जलद आणि सुज्ञ निर्णय घेण्याची क्षमता

**व्यवस्थापन कार्याची व्याप्ती** (Functional Areas of Management ):

इतरांच्या प्रयत्नाने कामे पूर्णत्वास नेणे म्हणजे व्यवस्थापन. पध्दतशीर मार्गांनी अनेक गोष्टी व्यवस्थापनाला पार पाडाव्या लागतात. या पध्दतशीर मार्गानाच व्यवस्थापकीय कार्य म्हणतात.

व्यवस्थापकीय कार्ये अनेक भागात वर्गीकृत केलेली आहेत. त्यातील कांही -

1) योजना (Planning)

2) संघटन (Organising)

3) कर्मचारीवर्ग (Staffing)

4) दिग्दर्शन (Directing)

5) सुसंगतपणा (Co-ordinating)

6) नियंत्रण करणे (Controlling)

**1. योजना करणे :** हे एक महत्वाचे अंग आहे. दिलेल्या वेळेचा उपयोग करुन निर्दिष्ट गोष्टी कोणत्या हे ठरवणे, योजना धोरणे, डावपेच, कार्यक्रम, कामकाजाच्या पध्दती आणि वेळापत्रकानुसार कामाची यादी करणे इ. गोष्टींचा अंतर्भाव होतो.

**2. संघटन :** मानवी शक्ती आणि भौतिक साधने यांचा एकत्रित मिलाफ. यातील भौतिक साधने म्हणजे यंत्रे आणि कच्चा माल. उद्दीष्टपूर्ती गाठण्यासाठी मानवी साधने आणि भौतिक साधने यांचा मेळ घातला जातो. यासाठी व्यवस्थापकांना पुरेशा अधिकारांचे प्रतिनिधित्व दिले जाते आणि ध्येय निश्चितीसाठी वेगवेगळ्या स्तरातील लोकांकडून सहकार्याने कामे करुन घेतली जातात.

@KTBS NOT TO BE REPUBLISHED

**3. कर्मचारी वर्ग:** उद्योगाची स्थापना करताना लोकांची आवश्यकता असते. त्यासाठी नवीन भरती, निवड प्रक्रिया, रिक्त जागा भरणे, प्रशिक्षण आणि नैपुण्य वाढवणे आवश्यक ठरते.

**4. दिग्दर्शन :** उद्योगाची उद्दिष्टपूर्ती करण्यासाठी सूचना करणे, मार्गदर्शन करणे, देखरेख ठेवणे, लोकांचे नेतृत्व करणे इ.करावे लागते. यासाठी हाताखालील लोकांना योग्य त्या सूचना द्याव्या लागतात. त्या सूचनांचे पालन होते की नाही ते पहावे लागते आणि योजना यशस्वी करावी लागते.

**5. सुसंगतपणा :** इच्छित ध्येय गाठण्यासाठी निरनिराळ्या विभागांकडून सुसंगतपणे आणि एकत्रितरित्या कामे करवून घ्यावी लागतात. ध्येय निश्चितीचा पाठलाग करण्यासाठी सांघिक प्रयत्न आवश्यक असतात.

**6. नियंत्रणे :** नियंत्रित करण्याचे मुख उद्दीष्टे आहेत. अ) उपक्रमांचे योग्य समन्वय सुनिश्चित करण्यासाठी संस्थेमध्ये सुव्यवस्था आणि शिस्तीचे वातावरण निर्माण करणे. ब) सह वास्तविक कामगिरीची ध्येय सुनिश्चित करण्यासाठी पूर्व योजना आखणे.

NOT TO BE REPUBLISHED @KTBS

## स्वाध्याय

**I. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा :**

1. व्यवस्थापन म्हणजे काय?
2. निर्णय घेणे म्हणजे काय?
3. वैयक्तिक निर्णय आणि सांघिक निर्णय म्हणजे काय?
4. व्यवस्थापकीय दृष्टीतून अधिकार आणि जबाबदारीचे तत्व म्हणजे काय?

**II. खालील प्रश्नांची चार ते पाच वाक्यात उत्तरे लिहा :**

5. हेन्री फायोल यांनी सुचवलेली व्यवस्थापकीय तत्वे सांगा?
6. व्यवस्थापन कार्याचे घटक कोणकोणत्या क्षेत्राशी संबंधित आहेत?
7. व्यवस्थापकीय तत्वांमधील अधिकार आणि जबाबदारी श्रेणीबद्ध पध्दत आणि केंद्रीकरण म्हणजे काय?

8. औद्योगिक व्यवस्थापनात निर्णय घेण्याची गरज का भासते?

9. निर्णय घेण्याच्या प्रक्रियेतील महत्वाचे घटक कोणते?

10. निर्णय घेताना कोणत्या गोष्टी आपण लक्षात ठेवल्या पाहिजेत?

11. व्यवस्थापकीय व्याप्तिच्या कार्यातील योजना आणि एकत्रिकरण करणे म्हणजे काय?

12. व्यवस्थापकीय व्याप्तितील कार्यात नियंत्रण हा घटक कसा महत्वाचा आहे?

13. नियंत्रण करण्याच्या प्रक्रियेत महत्वाचे घटक कोणते?

14. ''दिग्दर्शन आणि सुसंगतपणा हे औद्योगिक व्यवस्थापनातील महत्वाचे घटक आहेत'' कसे?

**III. प्रकल्प :**

1. तुमच्या भागातील एखाद्या व्यापाऱ्यास भेट द्या. व्यापार करताना दैनंदिन घडामोडीत निर्णय कसे घेतले जातात हे सांगण्याची विनंती करा व निबंध लिहा.

2. तुमच्या ठिकाणा जवळील सहकारी संख्येला भेट द्या आणि बैठकिचे तपशिल, त्याचा नफा तोटा समुजून द्या.

© KTBS NOT TO BE REPUBLISHED

***